


धोकादायक गुलमोहरांच्या ३५ झाडांवर चालवणार कुऱ्हाड « नाशिक आज

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी



पेन्शनसाठी अर्धवेळ ग्रंथपालांची सेवा ग्राह्य « नाशिक आज

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : २१२ ■ नाशिक, मंगळवार, दि. २९ एप्रिल २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा


## महत्त्वाचे ▶▶▶▶

### अझरबैजानचा मैत्रीचा हात

**नवी दिल्ली :** तुर्कस्तानने पाकला मदत केली असली तरी पाकिस्तानच्या मित्र देशांपैकी एक असलेल्या अझरबैजान या देशाने भारतासमोर मैत्रीचा हात समोर केला आहे. अझरबैजानने अहमदाबादला थेट विमानसेवा सुरु केली आहे. अझरबैजानची राजधानी असलेल्या बाकू येथून आता अहमदाबादला थेट विमान जाईल. ४ जुलैपासून ही विमान-सेवा सुरु होईल. आठवड्यातून चार वेळा बाकूहून अहमदाबाद-ला विमान जाईल.

### मुंबईत लवकरच वॉटर मेट्रो

**मुंबई :** महाराष्ट्र सरकार लवकरच मुंबईत वॉटर मेट्रो सेवा सुरू करणार आहे. मुंबईतील वाहतूक सुधारण्यासाठी आणि पर्यटनाला चालना देण्यास-ाठी सरकार वॉटर मेट्रो सेवा सुरू करण्याच्या तयारीत आहे. शहरातील जलमार्गांचा वापर करून रस्ते आणि उपनगरीय रेल्-वेवरील ताण कमी करणे हा या प्रकल्पाचा उद्देश आहे. राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदर विकास मंत्री नितेश राणे यांनी याबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले की, 'केरळच्या कोची वॉटर मेट्रोला या प्रकल्पासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची विनंती करण्यात आली आहे. या महिन्याच्या अखेरीस हा डीपीआर तयार होण्याची शक्यता आहे.'

### स्पेन, पोर्तुगालमध्ये वीजपुरवठा खंडित

**नवी दिल्ली :** युरोपातील स्पेन आणि पोर्तुगालमध्ये राजधान-ींसह अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात वीज पुरवठा खंडित झाल्याने देशांतील इंटरनेट सेवा बंद पडली. परिणामी विमानसेवा आणि भूयारी मार्गही बंद पडले. दोन्ही दोन देशांची एकत्रित लोकसंख्या ही पाच कोटींहून अधिक आहे. त्यामुळे मोठ्या लोकसंख्येला याचा फटका बसला आहे. हा वीजपुरवठा नेमका कोणत्या कारणामुळे खंडीत झाला याची मात्र अद्याप माहिती नाही.

### जम्मू-कश्मीरमध्ये तीन संशयितांचा शोध

**नवी दिल्ली :** जम्मू-कश्मीरमधील राजौरी जिल्ह्या-तील सुंदरबनी सेक्टरमध्ये तीन संशयास्पद व्यक्तींचा वावर आढळून आला आहे. संशयितांना पकडण्यासाठी आणि परिसरात सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी सुरक्षा संस्था आणि लष्कराचे कर्मचारी परिसरात शोधमोहीम राबवली जात आहे. उत्तर काश्मीरमधील कुपवाडा जिल्ह्यातील मुश्ताकाबाद माछिल परिसरातील सेदोरी नाल्याच्या जंगलात शोध मोहीम राबवण्यात आली. या कारवाईदरम्यान, सुरक्षा दलांना दहशतवाद्यांचा एक अड्डा सापडला आणि तो यशस्वीरित्या उद्ध्वस्त करण्यात आला. यासोबतच लपण्याच्या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला आहे.

### तहव्वूर राणाला एनआयए कोठडी

**नवी दिल्ली :** पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांनी मुंबईत २६ नोव्हेंबर २००८ रोजी हल्ला केला होता. या प्रकरणात तहव्वूर राणा याला दिल्लीच्या एनआयए न्यायालयाने बारा दिवस-ांची एनआयए कोठडी दिली आहे. तहव्वूर राणा हा मूळचा पाकिस्तानचा नागरिक आहे. त्याने पाकिस्तानच्या लष्करात डॉक्टर म्हणून काम केले होते. कॅप्टन पदापर्यंत त्याला बढती मिळाली होती. पुढे तो भारतात व्यवसायाच्या निमित्ताने येऊन त्याने मुंबईची पाहणी केली. नंतर तहव्वूर राणाने दिलेल्या माहितीचा वापर करुन पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांनी मुंबईत २००८ हल्ला केला होता.

# भारत-फ्रान्समध्ये राफेल करार

## अणुबॉम्ब डागण्याची क्षमता असलेली २६ सागरी विमाने खरेदी

**नवी दिल्ली : भारताने फ्रान्ससोबत २६ राफेल मरीनसाठी करार केला. दोन्ही देशांच्या संरक्षण मंत्र्यांच्या उपस्थितीत हा करार झाला. या करारानुसार, भारत फ्रान्सकडून २२ सिंगल सीटर विमाने आणि ४ डबल सीटर विमाने खरेदी करणार आहे. ही विमाने अणुबॉम्ब डागण्याची क्षमता असलेली असतील. फ्रान्ससोबतचा हा करार सुमारे ६३ हजार कोटी रुपयांना होत आहे. शस्त्रास्त्र खरेदीच्या बाबतीत भारताचा फ्रान्ससोबतचा हा आतापर्यंतचा सर्वात मोठा करार आहे.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली २३ एप्रिल रोजी झालेल्या सुरक्षा विषयक मंत्रिमंडळ समितीच्या (सीसीएस) बैठकीत या विमानाच्या खरेदीला मंजुरी देण्यात आली. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर ही बैठक बोलावण्यात आली होती. भारत आयएनएस विक्रांतवर राफेल सागरी विमान तैनात करणार आहे. विमान उत्पादक कंपनी डसॉल्ट एव्हिएशनने भारताच्या गरजेनुसार या विमानांमध्ये अनेक बदल केले आहेत. यामध्ये जहाजविरोधी हल्ला, अण्वस्त्रे डागण्याची क्षमता आणि १० तासांपर्यंत उड्डाण रेकॉर्डिंग यासारख्या वैशिष्ट्यांचा समावेश आहे. याशिवाय, कंपनी भारताला शस्त्र प्रणाली, सुटे भाग आणि विमानांसाठी आवश्यक साधने देखील पुरवेल. या विमानांची डिलिव्हरी २०२८-२९ मध्ये सुरू होईल आणि सर्व विमाने २०३१-३२ पर्यंत भारतात पोहोचतील.

राफेल मरीनपूर्वी भारताने फ्रान्सकडून हवाई दलासाठी ३६ राफेल जेट विमाने देखील खरेदी केली आहेत. २०१६ मध्ये झालेल्या या करारातील सर्व विमाने २०२२ मध्ये भारतात पोहोचली. ही विमाने हवाई दलाच्या अंबाला आणि हशिनारा हवाई तळांवरून चालवली जातात. हा करार ५८ हजार कोटी रुपयांना झाला. राफेल मरीन विमानाची वैशिष्ट्ये /-...४

### तुर्कस्तानकडून पाकिस्तानला दारुगोळ्याची रसद

काश्मिरमधील पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्ष टोकाला पोहोचला आहे. त्यामुळे पाकिस्तानने अन्य देशांकडे मदतीची मागणी केली होती. या मदतीच्या हाकेला प्रतिसाद देत तुर्कस्तानने पाकिस्तानला दारुगोळा पाठवला आहे. तुर्कस्तानची ए १३० विमाने दारुगोळा घेऊन पाकिस्तानात पोहोचली आहेत. तुर्कस्तान पाकिस्तानला काही लढाऊ विमाने देणार आहे. तुर्कस्तानने यापूर्वीही अनेकदा संयुक्त राष्ट्रसंघात काश्मीरचा मुद्दा उपस्थित केला आहे. तर गेल्या काही वर्षांमध्ये चीन आणि पाकिस्तान यांच्यात लष्करी, आर्थिक आणि व्यापारी हितसंबंध तयार झाले आहेत.

### कार्ल गुस्ताफ रॉकेट लाँचर

भारतीय सैन्याला स्वीडनने कार्ल गुस्ताफ रॉकेट लाँचर देण्यात आले आहे. सर्जिकल स्ट्राइक हे कार्ल गुस्ताफ रॉकेट लाँचरने केली जातात, हे या शस्त्राचे वैशिष्ट्य आहे. स्वीडनच्या साब कंपनीने सर्जिकल स्ट्राइकसाठी भारताला हे शस्त्र पुरवले आहे. साब कंपनीच्या या शस्त्राचा वापर शत्रूचे बंकर आणि दहशतवाद्यांचे लॉन्च पॅड नष्ट करण्यासाठी केला जाईल. कार्ल गुस्ताफ रॉकेट लाँचर हे एक अँटी आर्मर शस्त्र आहे. कुठल्याही प्रकारच्या शस्त्राविरोधात हे अँटी आर्मर शस्त्र वापरले जाते. शत्रूकडून रणगाडे किंवा तोफा मैदानात उतरवल्या जातात, तेव्हा त्या उद्ध्वस्त करण्यासाठी प्रामुख्याने या शस्त्राचा वापर केला जातो.



# १४ वर्षाच्या वैभव सूर्यवंशीचे वादळ

## गुजरात विरुद्ध ३५ चेंडूत शतक!

**नवी दिल्ली :** आयपीएलच्या इतिहासातला आजवरचा सर्वात युवा खेळाडू वैभव सूर्यवंशीनं आपल्या तिसऱ्याच सामन्यात नवा इतिहास रचला. जयपूरच्या मैदानात गुजरातविरुद्धच्या सामन्यात चौकार षटकारांची आतषबाजी करत वैभव सूर्यवंशीनं अवघ्या ३५ चेंडूत शतक ठोकलं. आयपीएलमध्ये शतक ठोकणारा तो सर्वात कमी वयाचा खेळाडू ठरलाय. तर आयपीएलमधलं हे दुसरं सर्वात वेगवान शतक ठरलं. त्याच्या या शतकी खेळीत ७ चौकार आणि ११ षटकारांचा समावेश होता. याआधी बंगलुरुकडून खेळणाऱ्या ख्रिस गेलनं पुणे वॉरियर्सविरुद्ध ३० चेंडूत शतक ठोकलं होतं.

१४ वर्षांच्या वैभव सूर्यवंशीने त्याच्या तिसऱ्या आयपीएल सामन्यात इतिहास रचला आहे. वैभवने त्याच्या कारकिर्दीच्या सुरुवातीला ज्या पद्धतीने फलंदाजी केली होती, त्याच पद्धतीने गुजरातविरुद्धच्या सामन्यात फलंदाजी केली. आधी वैभवने १७ चेंडूत /-...४

# क्रिकेटपटू आर. अश्विनला पद्मश्री, हॉकीपटू श्रीजेशला पद्मभूषण

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केला सन्मान

**नवी दिल्ली :** आर अश्विन : आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झालेल्या आर. अश्विनला देशातील चौथा सर्वोच्च नागरी सन्मान पद्मश्रीने सोमवारी (दि. २८) सन्मानित करण्यात आले. राष्ट्रपती भवनात झालेल्या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना हा पुरस्कार प्रदान केला. तर हॉकीपटू श्रीजेशला पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या खास प्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदींसह अनेक मोठ्या व्यक्ती देखील उपस्थित होत्या. अश्विन हा पुरस्कार मिळवणारा ४० वा भारतीय क्रिकेटपटू ठरला आहे. त्यांच्या आधी सचिन तेंडुलकर, झहीर खान आणि गौतम गंभीर सारख्या दिग्गजांनाही हा सन्मान मिळाला आहे. आर. अश्विनला भारतीय क्रिकेट इतिहासातील सर्वोत्तम फिरकी गोलंदाजांपैकी एक मानले जाते. त्याने दीर्घकाळ आपल्या चमकदार कामगिरीने टीम इंडियाला अनेक संस्मरणीय विजय मिळवून दिले. अश्विनने गेल्या वर्षी मेलबर्न क्रिकेट ग्राउंडवर ऑस्ट्रेलियाविरुद्ध बॉक्सिंग डे कसोटीत शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला होता, त्यानंतर त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला.

तथापि, निवृत्तीनंतरही अश्विन आयपीएलमध्ये क्रिकेट खेळत आहे. तो सध्या आयपीएल २०२५ मध्ये चेन्नई सुपर किंग्जचा भाग आहे आणि लीगमध्ये त्याचा अनुभव दाखवत आहे. आर अश्विनने आयपीएल २०२५ मध्ये आतापर्यंत खेळलेल्या ७ सामन्यात ५ विकेट्स घेतल्या आहेत. आयपीएल २०२५ मध्ये अश्विनची आतापर्यंतची कामगिरी चांगली राहिलेली नाही. तो सीएसकेसाठी फारसे काही करू शकलेला नाही.

# पाकव्याप्त काश्मीरमध्ये पाकिस्तानविरोधात एल्गार

## हजारो नागरिक रस्त्यावर; मुर्दाबादच्या घोषणा

**कराची :** पाकिस्तानमध्ये स्वतंत्र बलुचिस्तानच्या मागणीसाठी गेल्या काही दिवसांपासून पाकिस्तानची सैन्यांवर हल्ले सुरू आहेत. आता पाकव्याप्त काश्मीरमध्ये सुद्धा असंतोष उफाळून आला आहे. हजारो नागरिक पाकिस्तान सरकार विरोधात रस्त्यावर उतरले आहेत. त्यांच्याकडून पाकिस्तान सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

भारताने दहशतवादी हल्ल्यानंतर एक प्रकारे पाकिस्तानला दणका देत सिंधू जलकरार रद्द केला आहे. भारतातील पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्याचे आदेश दिले आहे. व्हिसा सुद्धा रद्द केला आहे. दुसरीकडे, पाकिस्तानकडूनही प्रत्युत्तरात कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे दोन्ही देशांमध्ये परिस्थिती तणावाची निर्माण झाली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आता पाकव्याप्त काश्मीरमध्ये असंतोष उकळून आल्याने एक प्रकारे पाकिस्तान सरकारसमोर आव्हान निर्माण झाले आहे. भारताकडून सातत्याने पाकव्याप्त काश्मीर भारतामध्ये घ्यावे, अशी मागणी केली जात आहे. पाकिस्तानचे दोन तुकडे यापूर्वी झाले असून आता पाकिस्तानचे तीन तुकडे केल्याशिवाय पाकिस्तानची मस्ती कमी होणार नाही, असा सूर भारतातील संरक्षण /-...४

# 'शरिया कोर्ट', 'कोर्ट ऑफ काजी'ला कायदेशीर मान्यता नाही

## महिलेच्या अपीलावर सर्वोच्च न्यायालयाकडून निर्वाळा

**नवी दिल्ली :** काझी न्यायालय, दारुल काझा काझियत न्यायालय, शरिया न्यायालय इत्यादी कोणत्याही नावाने ओळखले जात असले तरी, त्यांना कायद्याने मान्यता नाही आणि त्यांनी दिलेले कोणतेही निर्देश कायद्यात लागू करण्या योग्य नाहीत, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

न्यायमूर्ती सुधांशू धुलिया आणि न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्ला यांच्या खंडपीठाने २०१४ च्या विश्व लोचन मदन विरुद्ध भारत संघ या खटल्यातील निकालाचा हवाला देत हा निकाल दिला. शरियत न्यायालये आणि फतव्यांना कायदेशीर मान्यता नसल्याचेही निकालात सांगण्यात आले. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या एका महिलेच्या अपीलावर खंडपीठाने हा निर्णय दिला. ज्याने कुटुंब न्यायालयाच्या वादाचे कारण असल्याच्या आधारावर तिला पोटगी न देण्याचा निर्णय कायम ठेवला होता. कौटुंबिक न्यायालयाने अशा निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी काझीच्या न्यायालयात दाखल केलेल्या तडजोड करारावर अवलंबून होते.

कौटुंबिक न्यायालयाच्या निकालावर बोलताना न्यायमूर्ती अमानुल्लाह यांनी म्हटले /-...४

# सिडकोत युवकाचा डोक्यात दगड घालून खून

## जुन्या वादातून पाच ते सहा जणाचा हल्ला

**सिडको : विशेष प्रतिनिधी :** अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील



कामटवाडे परिसरात करण उमेश चौरे (वय १७, रा. संत कबीर नगर) या युवकाची सोमवारी (दि. २८) दुपारी दोनच्या सुमारास पाच ते सहा जणांच्या टोळक्याने डोक्यात दगड व फर्शी घालून निर्घृण हत्या केली. जुन्या वादातूनच ही हत्या झाली असल्याचा प्राथमिक संशय आहे. गुन्हे शोध पथकाच्या युनिट-१ ने याप्रकरणी सहा संशयितांना ताब्यात घेतले असून त्यांची चौकशी सुरू आहे.

मयत करण चौरे याच्यावर गंगापूर हद्दीतील अरुण बंडी याच्या खुनाच्या गुन्ह्यात सामील असल्याचा संशय होता. त्यामुळे त्याला बालसुधारगृहात ठेवण्यात आले होते. आठवडाभरापूर्वी तो सुधारगृहातून बाहेर आला होता. स्वतःच्या जीवाला धोका असल्याची माहिती त्याने आपल्या पालकांना दिली होती. त्यामुळे तो सिडकोतील कामटवाडे येथे एका मित्राकडे राहायला गेला होता.

सोमवारी दुपारच्या दरम्यान स्मशानभूमी रोडने जात असताना, पाच ते सहा संशयितांनी त्याचा पाठलाग करत रस्त्यात अडवून बेदम मारहाण केली. या हल्ल्यात त्याच्या डोक्यात दगड व फर्शी मारण्यात आल्याने गंभीर इजा होऊन जागीच त्याचा मृत्यू झाला. यावेळी अरुण /-...४

### ७० दिवसांत तीन खून

अंबड पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक राकेश हांडे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या काही दिवसांत होळी पौर्णिमेच्या रात्री शुभम पार्क येथील चर्चसमोर एका महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा धारदार कोयत्याने वार करुन खून करण्यात आला होता. त्यानंतर राजे संभाजी स्टेडियमजवळ अवघ्या एक रुपयासाठी खून करण्यात आला आणि आता तिसरा खून मागील भांडणाची कुरापत काढून करण्यात आला.

# मेट्रोसाठी शहरात अकरा प्रकारचे सर्वेक्षण

## मुख्य भागात पाहणी; पोलिसांचीही मदत

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिकसाठी जेव्हा मेट्रो प्रकल्पाची घोषणा केली. त्यानंतर काही दिवसांनी नियो मेट्रो नाशकात धावणार असल्याचे सांगण्यात आले. पुढे त्यातही बदल होऊन कॉम्पॅक्ट मेट्रो होणार असल्याचे सांगितले जाऊ लागले. मात्र आता शहरात मेट्रोसाठी आवश्यक घटकांचे सर्वेक्षण सुरु करण्यात आले आहे. एकुण अकरा प्रकारचे सर्वेक्षण केले जाणार असून त्यावरच नाशिकसाठी नियो की कॉम्पॅक्ट मेट्रो हे पंतप्रधान कार्यालयाकडून ठरवले जाणार आहे.

दरम्यान सध्यास्थित मेट्रोसाठीचे सवेक्षण सुरु असून नागरिकांचे अभिप्राय घेण्याबरोबरच कोणते मार्ग असावेत याबाबतचे सखोल सर्वेक्षण महारेल व मनपाच्या वाहतूक सेलकडून सुरु आहे. यासाठी पोलीस प्रशासनाचीही मदत घेतली जात आहे. मेट्रोच्या मार्गात ४० स्थानके असून याद्वारे शहरातील महत्वाची मार्ग जोडली जाणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नशिकसाठे मेट्रोची घोषणा केली आहे. मनपाचा वाहतूक सेल व महारेलसह इतर संस्थांकडून शहरात सर्वेक्षण सुरु आहे. मार्ग निश्चित करण्याबरोबरच नागरिकांचे अभिप्राय जाणून घेतले जात आहेत. मुंबई-नाशिक-पुणे असा सुवर्ण त्रिकोण तयार होत असल्याने



मेट्रोमुळे नाशिकचा विस्तार अधिक झपाटयाने वाढणाअ आहे. २०११ च्या जनगणनेत शहराची लोकसंख्या १४ लाख ८५ हजाराच्या आसपास होती. ती २५ लाखांच्या घरात पोहोचली आहे. याआधी नियो मेट्रोची घोषणा तत्कालीन युती सरकारने केली होती, मात्र प्रवासी संख्या कशी असेल हे निश्चित नसल्याने कॉम्पॅक्ट मेट्रो परवडू शकते का ? याची तपासणी केली जाणार आहे. कॉम्पॅक्ट मेट्रोची सेवा सध्या तैवान येथील ताईपाई येथे सुरू असली /-...४

### प्रस्तावित मार्ग

नाशिकरोड रेल्वे स्टेशन ते द्वारका, गंगापूर ते मुंबई नाका, शामिलार ते नाशिकरोड, द्वारका ते नवीन नाशिक, द्वारका ते पंचवटी असा मार्ग असण्याची शक्यता आहे. सध्या ज्या प्रमाणे सर्व्हेक्षण सुरू आहे त्यानंतर अंतीम मार्ग निश्चित होणार आहे.

### खालील प्रकराचे होणार सर्वेक्षण

▶▶ ओरिजिन डेस्टींनशन सर्वेक्षण ▶▶ ट्रॅफिक व्हॅल्यूम ▶▶ टर्निंग व्हॅल्यूम काउंट ▶▶ स्पीड डिले ▶▶ पब्लिक ट्रान्स्पोर्ट बोर्डिंग ▶▶ एनएमपी नॉन मोटयाइझ ▶▶ सोशो इकॉनॉमिक ▶▶ पेडेस्टेन (पादचारी) ▶▶ पार्किंग ▶▶ पॉल्युशन ▶▶ ब्लॅक स्पॉट

# एनसीईआरटीच्या पुस्तकातून मुघलांचा इतिहास हद्दपार

**नवी दिल्ली :** एनसीईआरटीच्या सामाजिक शास्त्र विषयाच्या इयत्ता सातवीच्या पुस्तकातून मुघल आणि दिल्ली राजवटीचे सर्व संदर्भ हटवण्यात आले आहेत. याबदल्यात या पुस्तकांमधून विद्यार्थ्यांना सरकारी योजना तसेच महाकुंभासारखे विषयांवर धडे गिरवावे लागणार आहेत.

प्रकाशित झालेले पुस्तक- 'एक्सप्लोरिंग सोसायटी : इंडिया अँड बियाँड' हे सुधारित अभ्यासक्रमाचा केवळ पहिला भाग आहे. तर दुसरा भाग आगामी महिन्यांत प्रकाशित होण्याची अपेक्षा आहे. मात्र, वगळलेला मजकूर दुसऱ्या भागात समाविष्ट केला जाईल का, यावर अद्याप कोणतीही टिप्पणी केलेली नाही. पाठ्यपुस्तकात आता भारतीय राजवंशांवरील प्रकरणे, 'पवित्र भूगोल' आणि इतर अनेक संदर्भ जोडले गेले आहेत.

यामध्ये प्रयागराजचा महाकुंभमेळा आणि मेक इन इंडिया आणि बेटी बचाओ, बेटी पढाओ, अटल बोगदा (टनल) सारख्या सरकारी योजनांचा समावेश करण्यात आला आहे. या आठवड्यात प्रकाशित झालेली ही पाठ्यपुस्तके नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम फ्रेमवर्क २०२३ च्या अनुषंगाने तयार करण्यात आली आहेत.

## महत्त्वाचे

### नात्यातील तरुणाकडून ज्येष्ठ नागरिकास ९ लाखाला गंडा

**लासलगाव :** खेडलेझुंगे येथील ७८ वर्षाचे शिवाजी दामोदर सदाफळ यांच्या अडाणीपणाचा फायदा घेत त्यांच्याच नात्यातील तरुणाने त्यांना नऊ लाखाला गंडा घातल्याची घटना घडली आहे. खेडलेझुंगे येथील संशयित सागर संजय सदाफळ अक्सिस बँक शाखा लासलगाव येथे नोकरीस आहे. फिर्यादी शिवाजी सदाफळ (वय ७८) यांच्या वयोवृध्द आणि अडाणीपणाचा फायदा घेत दि.२३ नोव्हेबर २०२४ ते २६मार्च २०२५ दरम्यान वेळोवेळी घरी जाऊन तुमची बँकेत जास्त पैशाची एफडी असून तीन लाखांपेक्षा जास्त पैशाच्या एफडीला तुम्हाला तीन टक्याप्रमाणे इन्कम टॅक्स लागू शकतो. मी सर्व व्यवस्थित करून देतो असे सांगून फिर्यादीचा विश्वास संपादन केला. फिर्यादीचा मोबाईल त्याचेकडे वेळोवेळी हातात घेऊन त्या मोबाईलमध्ये काहीतरी करून फिर्यादीचे ॲक्सिस बँक लासलगाव शाखा येथील बँक खातेतील ११ लाख रुपयांपैकी एकूण रक्कम ९,०७,०४७.८०/- रुपये हे आरोपीने त्याचे स्वतःचे एस बँकेतील खाते क्रमांकावर परस्पर वर्ग करुन फिर्यादीची आर्थिक फसवणूक केली. यापकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात संशयित सागर सदाफळ याच्या विरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणी पुढील तपास सपोनि भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उप.निरी.आप्पासाहेब हंडाळ करीत आहेत.



### सादिया शेखचे स्कॉलरशिप परीक्षेत यश

**कसबे सुकेणे :** पिंपळस रामाचे येथील के. के. वाघ माध्यमिक विद्याभवन ची विद्यार्थिनी कुमारी सादिया रशीद शेख हिने स्कॉलरशिप परीक्षेमध्ये यश मिळवले आहे. सादियाच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त शकुंतलाताई वाघ, जनसंपर्क प्रमुख अजिंक्य वाघ, सचिव के. एस. बंदी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्राध्यापक शिवाजी नाठे, मुख्याध्यापिका संगीता नाईक, उज्वला दिवे, स्वाती सांगळे, क्रीडाशिक्षक दीपक कुंभार, छाया पवार, जगदीश देशमुख, योगेश सोनवणे आदींनी अभिनंदन केले.



### सुरगाणा येथे कडकडीत बंद

**सुरगाणा :** पहलगाम येथे झालेल्या दहशदवादी हल्ल्याच्या निषेधार्थ सुरगाणा येथे कडकडीत बंद पाळण्यात आला होता. यावेळी सर्व दुकाने, व्यापारी प्रतिष्ठाने बंद ठेवण्यात आली होती. व्यापारी, तरुणवर्गाने एकत्र येत रॅली काढत हम सब एक है च्या घोषणा दिल्या. रॅलीच्या माध्यमातून सर्वांनी दहशतवादी हल्ल्याचा निषेध करीत पीडित कुटुंबाना न्याय द्यावा, अशी मागणी केली.



### नैताळे येथे माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

**पिंपळगाव बसवंत :** येथील जनता विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा मेळावा हॉटेल देवेंद्र नैताळे येथे झाला. अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक रामदास कुशारे होते. व्यासपीठावर सेवानिवृत्त मुख्याध्यापक वसंत शिंदे, कार्यरत मुख्याध्यापक सुरेश राख, सुभाष शिंदे, संजय कदम, पर्यवेक्षक नंदकुमार न्याहारकर, मुख्याध्यापिका श्रीमती राख, डीवायएसपी संजय खताळे उपस्थित होते. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. सर्व माजी शिक्षकांनी आपले विचार मांडले. अध्यक्षस्थानावरून बोलताना मुख्याध्यापक रामदास कुशारे यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. सूत्रसंचालन बाजीराव जेऊघाले यांनी तर आभार बाळासाहेब म्हस्के यांनी मानले.



### जाधव यांना आदर्श संस्थाचालक पुरस्कार

**पिंपळगाव बसवंत :** शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती प्रित्यर्थ नासिक जिल्हा शिवसेनतर्फे दिला जाणारा शैक्षणिक क्षेत्रातील आदर्श संस्थाचालक हा सन्मानाचा पुरस्कार पिंपळगाव बसवंत येथील निफाड तालुका एज्युकेशन सोसायटीच्या चेअरमन मंगलाताई जाधव यांना नाशिक येथे खा. भास्करराव भगरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी निफाड एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव अरुण महाले, संचालक उद्धवराव निरगुडे, सोमनाथ मोरे, रामराव मोरे, बी. आर. पाटील, पंढरीनाथ संधान, समीर जाधव आदींसह शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते. मंगलाताई जाधव या दिवंगत माजी खासदार माधवराव जाधव यांच्या स्नूषा असून निफाड एज्युकेशन सोसायटीचे दिवंगत चेअरमन बाळासाहेब जाधव यांच्या पत्नी आहेत.

### उमराळे परिसरात दोन घरांवर दरोडे

**उमराळे बु.।** दिंडोरी तालुक्यातील नाळेगाव परिसरात चोरट्यांनी दि. २७ एप्रिल रोजी संजय सदाशिव थेटे व बाळू सुखदेव धात्रक यांच्या घरांवर दरोडा टाकत नऊ लाखाची चोरी केली. यावेळी घरातील माणसावर चोरटयांनी झोपण्याचा स्प्रे मारला असल्याचे समजते. चोरट्यांनी घरातील तीन तोळ्याची सोन्याची पोत, सोन्याचे तीन तोळ्याचे गाठले तसेच घरातील ७५००० तसेच मोटरसायकल, पिकअप, दोन ट्रॅक्टरच्या चाव्या असा सात लाख रुपये किमतीचे ऐवज चोरून नेला. तसेच उमराळे बु. (नालेगाव शिवार) येथील बाळू सुखदेव धात्रक यांच्या



घराचे कुलूप तोडून पेटीमध्ये असलेले एक लाख रुपये व कपड्यांची व कागदपत्रांची उचकण करून घरामधून पसार झाले. बाळासाहेब धात्रक यांना याची माहिती लागताच त्यांनी मुलांना बोलावले. ही माहिती दिंडोरी पोलिसांना कळवताच पोलीस घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा केला.

# गोदावरी नदीतून पानवेली हटविण्यासाठी समिती

## १ मेपासून मोहिमेचा शुभारंभ; गोदाकाठच्या नागरिकांच्या पाठपुराव्याला यश



**निफाड : चांदोरी येथे पानवेलीची पाहणी करतांना डॉ. शशिकांत मंगरुळे, विशाल नाईकवाडे, भूषण मटकरी, संजय दाते, विनायक खरात, प्रकाश ढेमसे, कृष्णा आघाव, सागर गडाख, शितल कुयटे आदी.**

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

.गोदावरी नदीतील पानवेलीच्या संकटावर तातडीने उपाययोजना करण्यासाठी रविवार दि २७ एप्रिल रोजी चांदोरी ग्रामपालिका येथे नवनियुक्त प्रांतधिकारी डॉ शशिकांत मंगरुळे,तहसीलदार विशाल नाईकवाडे, भारतीय जैन संघटनेचे नंदू साखला यांच्या उपस्थिती विशेष बैठक यशस्वीरीत्या संपन्न झाली.या बैठकीत पानवेली निर्मूलनासाठी विशेष कृती समिति स्थापन करण्यात आली असून,प्रत्यक्ष मोहीम येत्या १ मेपासून सुरू होणार असल्याची माहिती अधिकृतरीत्या देण्यात आली आहे.

चांदोरी,सायखेडा व नांदूर मधमेश्वर या मंडळातील गोदाकाठच्या गावांचा प्रत्यक्ष आढावा घेतल्यानंतर, वाढत्या पानवेलीने निर्माण केलेल्या संकटाचे गांभीर्य अधोरेखित करण्यात आले.मंडळ अधिकारी, तलाठी, सरपंच, पोलीस पाटील, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे प्रतिनिधी,भारतीय जैन संघटना व पानवेली निर्मूलन कृती समितीचे सदस्य यांच्या समन्वयातून पुढील कारवाईची दिशा ठरवण्यात आली.याप्रसंगी चांदोरी सरपंच विनायक खरात, भूषण मटकरी, जगन्नाथ कुटे,संजय दाते,अशपाक शेख, कृष्णा आघाव, सुनिता राजोळे, अरुण पाटील बोडके, सागर गडाख ,मंडळ अधिकारी शितल कुयटे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गोदाकाठच्या लोकप्रतिनिधीना सातत्यपूर्ण पाठपुराव्याला प्रतिसाद देत प्रशासनाने हा ठोस निर्णय घेतला आहे.गोदावरीला परत नवे जीवन देण्यासाठी १ मेपासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे,स्थानिक आपती व्यवस्थापन समिती आणि भारतीय जैन संघटनेची मदत घेतली जाणार असून महसूल प्रशासनाच्या वतीने नोडल अधिकारी म्हणून एका नायब तहसीलदार यांची नियुक्ती केली जाणार आहे.अशी माहीती बैठकीत देण्यात आली. पाण्यातून पानवेलीचे व्यवस्थीत निर्मूलन,पर्यावरण साक्षरता मोहिम व स्थानिकांच्या सहभागाने नदीचे पुनरुज्जीवन करण्याचे उद्दिष्ट मोहिमेच्या केंद्रस्थानी ठेवत प्रांत डॉ शशिकांत मंगरुळे यांच्या अध्यक्षते खाली समिती नियुक्त करण्यात येणार असून यात सरपंच व क्रियाशील सामाजिक कार्यकर्ते यांचा समावेश करण्यात येणार आहे.



# उमराळे-पेठ महामार्गावर पहाटे गुटखा जप्त

## ३७ लाख ९२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**दिंडोरी : प्रतिनिधी**

नाशिक-पेठ महामार्गावरील उमराळे बु. चौफुलीवर अवैधपणे सुगंधी गुटखा विक्रीसाठी पहाटेच्या सुमारास घेऊन जात असतांना दिंडोरी पोलिसांनी सापळा रचत गुटखा व वाहतूक करणारे वाहन असा एकूण ३७ लाख ९२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

उमराळे बु. चौफुलीवर अवैध सुगंधी गुटखा विक्रीसाठी जात होता. त्याचवेळी पहाटे पोलीस गस्त घालत असतांना सफेद रंगाची अशोक लेलॅन्ड कंपनीच्या (एमएच ०४ एलवाय ८०३०) वाहनामध्ये अवैध गुटखा आढळून आला. २ लाख १७ हजार ८०० रुपयांचे १.१०० विमल पान मसाल्याचे पिवळ्या रंगाचे पॅकेट प्रत्येकी किंमत १९८ रुपये प्रमाणे आहे. २४ हजार २०० रुपये किमतीचे सुगंधीत तंबाखूचे पिवळ्या रंगाचे पॅकेट प्रत्येकी किंमत २२ रुपये प्रमाणे, ५ लाख १७ हजार रुपयांचे विमल पान मसाल्याचे हिरव्या रंगाचे पॅकेट प्रत्येकी किंमत ४७० रुपये आहे. ३३ हजार किंमतीचे सुगंधीत तंबाखू पॅकेट प्रत्येकी किंमत ३० रुपये प्रमाणे, ३ लाख रुपये किंमतीची सफेद रंगाची अशोका लेलॅन्ड कंपनीची गाडी असा एकूण ३७ लाख ९२ हजार रुपयांचे मुद्देमाल जप्त केला आहे.

याबाबत पोलिस शिपाई मधुकर बेंडकोळी यांनी दिंडोरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे,आरोपी योगेश देवगीर गोसावी (वय ३८) रा. अवनखेड याच्यावर गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे, अधिक तपास पोलीस निरीक्षक रघुनाथ शेगर यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडोरी पोलीस करीत आहे,



**लासलगाव : येथे सत्ता ब प्रकार मिळकत धारकांच्या बैठकीत मार्गदर्शन करतांना विशाल नाईकवाडी. (छाया : समीर पठाण)**

# सत्ता ब प्रकार मिळकत धारकांची बैठक

**लासलगाव : वार्ताहर**

शहरातील सर्वे नंबर ९३ व परिसरात असलेल्या सत्ता ब प्रकार मिळकतबाबत बाजार समिती सभागृहात बैठक झाली. निफाडचे तहसीलदार विशाल नाईकवाडी, भूमिअभिलेखचे जिल्हा अधीक्षक भावड यांनी उपस्थित जागाधारकांना मार्गदर्शन केले. याच अनुषंगाने पुढील बैठक ५ मे रोजी लासलगाव येथे होणार आहे.

लासलगाव बाजार समितीच्या सभागृहात झालेल्या बैठकीस लासलगाव बाजार समिती सभापती डी. के. जगताप, मुंबई बाजार समिती संचालक जयदत्त होळकर, राजेंद्र डोखळे, मंडल अधिकारी, तलाठी उपस्थित होते. यावेळी सातबारा आणि सिटीसर्वे क्षेत्र दुरुस्तीसह विविध प्रशासकीय मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.

सातबारा व सिटी सर्वे क्षेत्र दुरुस्ती या विषयावर वरिष्ठ अधिकारी यांच्याशी संपर्क साधून पुढील दिशा ठरवतील व समितीतर्फे पाठपुरावा केला जाईल. विनाशर्थभंग प्रकरणांची छाननी संदर्भात प्रकरणांचे संपूर्ण प्रस्ताव तपासून ५ मे रोजी निर्णय घेतला जाईल. अशा प्रकारची माहिती वरिष्ठांनी यावेळी दिली.

शर्थभंग प्रकरणांची पूर्तता: योग्य पूर्तता करून जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत संबंधित प्रस्ताव मंत्रालयात पाठवण्यात येतील. याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. दि. ५ मे च्या बैठकीपूर्वी सर्वांनी कागदपत्रे समितीचे अध्यक्ष शैलेश ठाकरे यांच्याकडे जमा करावी, असे आवाहन करण्यात आले. यावेळी उपस्थित जागा मालकांनी विविध शंका आणि माहिती अधिकारी वर्गाकडून जाणून घेतली.

# भेनशेत येथे पाणी योजनेचे लोकार्पण

**सुरगाणा : प्रतिनिधी**

सुरगाणा तालुक्यातील टंचाईग्रस्त गाव असलेले भेनशेत येथे मार्च महिन्यापासून पाणी समस्या भेडसावत होती. गावाने एकत्र येत जलपरिषदेच्या माध्यमातून पाणी समस्या मिटवावी म्हणून प्रयत्न सुरू केले आहेत.

खिर्डी ग्रामपंचायत सरपंच शिवराम वळवी, ग्रामविकास अधिकारी गिरिधर भरसट यांनी गावाला एकत्र करीत जलपरिषदेकडे पाठपुरावा केला. यावेळी जलपरिषद मित्र परिवार अध्यक्ष देवीदास कामडी यांनी ऑनलाईन सर्व्हे करुन साईट व्हिजिट केल्या. गावात आदर्श स्वयंसहाय्यता बचतगट स्थापन करुन या योजनेसाठी श्रमदान करण्याची जबाबदारी गावावर सोपवली. यासाठी आर्थिक व तांत्रिक बाब ग्रामीण पुढाकार ग्रुप, आयआयटी बॉम्बे माजी विद्यार्थी संघटना, व्ही. जे. या संस्थानी घेतली. पाणी वापर योजनेची सुरवात ४ जून २०२४ रोजी मोजमाप करुन ऑगस्टला सोलर फिटिंग करण्यात आले.

भेनशेत गावाने लोकार्पण सोहळा आयोजित करुन योगेश कर्णिक यांचे हस्ते उदघाटन करण्यात आले. लोकार्पण सोहळ्यास वि. जे. टी. आय चे प्रा. प्रवीण चौधरी, प्रमुख अतिथी म्हणून आय. आय. टी. बाँबेचे प्रसाद बोडस, वि. जे. टी. आय. विद्यार्थी उपस्थिती होते.



**महिलांचा पाण्याचा प्रश्न मिटला**

माझं लग्न झाल्यापासून पाण्याचा हंडा घेऊन वणवण फिरावे लागत होते. माझी सासू व गावातील महिला विहीरिला पाणी कमी झाल्यावर खोल दरीत जाऊन पाणी डोक्यावर आणत होते. ते हाल सामाजिक संस्था यांनी कायमचेच दूर केले.

**– छाया पवार, मंगला खुरकुटे**, भेनशेत

# मोहाडी ग्रामपालिकेवरील आरोप खोटे

## सरपंच, उपसरपंच व सदस्याचा दावा

**दिंडोरी : प्रतिनिधी**

दिंडोरी तालुक्यातील मोहाडी ग्रामपालिकेत विरोधकांनी केलेला आरोप खोटा असून प्रसिध्दीसाठी विरोधक निवेदने देऊन बदनामी करत असल्याचा आरोप सरपंच, उपसरपंच व सदस्यांनी केला आहे,

याबाबत दिंडोरी पंचायत समिती गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे. मोहाडी ग्रामपालिका सभेत सुचविलेली विकासकामे कृती आराखड्यानुसार मासिक बैठकीमध्ये विकासकामांबाबत चर्चा करून केली जात आहे, विरोधकांनी आरोप केल्यापैकी सोलर साहित्य खरेदीचे मटेरिअल याची प्रत्यक्षात माहिती देऊन साहित्य त्यांना दाखविलेले आहे, तसेच शौचालय दुरस्तीचे काम पुर्ण आहे,

विहिर खोदाई व आडवे बोअर ही विकासकामे एक माहिन्यापूर्वी पुर्ण झाले असून, जिओ टॅगिंगचे फोटो इ-ग्रामला अपलोड केल्यानंतरच विकासकामाची बिले ठेकेदाराला अदा केली आहे. भ्रष्टाचाराचा कुठल्याही प्रकारचा पुरावा नसतांना दि. २० जून २०२३ रोजी आपल्या कार्यालयाकडे अशाच प्रकारची लेखी तकार केली होती. त्यावेळी चौकशी केली असता आरोप सिद्ध झाले नसून अशाच प्रकारे वारंवार चुकीच्या बातम्या अथवा निवेदने देऊन आमची बदनामी केली जात आहे. योग्य ती चौकशी करून न्याय द्यावा, अशी मागणी सरपंच आशा लहांगे, उपसरपंच भाग्यश्री जाधव, सदस्य बाकेराव भवर, मच्छिंद्रनाथ महाले, घनश्याम नेहरे, कैलास कळमकर, शैला निकम, शुकंतला जाधव, छाया निकम, रुपाली सुर्ववंशी आदीनि केली आहे.

# शिंगवे-डोणगाव शिवरस्ता अखेर खुला; शेतकऱ्यांची २० वर्षांची गैरसोय टळली

**चांदवड : वार्ताहर**

तालुक्यातील पूर्व भागातील शिंगवे आणि डोणगाव या दोन गावांमधील शिवरस्ता तब्बल १५ ते २० वर्षांनंतर महसूल विभागाच्या प्रयत्नांमुळे अखेर खुला झाला आहे. त्यामुळे रस्त्यालगतच्या सुमारे २५ ते ३० शेतकऱ्यांची गैरसोय आता दूर होणार आहे.

जवळपास वीस वर्षांपासून हा शिवरस्ता बंद होता. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतात ये-जा करण्यासाठी आणि शेतीमाल वाहतुकीसाठी मोठी अडचण येत होती. दोन्ही गावांतील शेतकऱ्यांनी एकत्र येत रस्ता पुन्हा सुरू करण्यासाठी महसूल विभागाकडे मागणी केली होती. शिंगवे आणि डोणगाव या दोन गावांतील सीमारेषेवरून हा रस्ता जात असल्याने, दोन्ही बाजूंच्या गावांतील समान जागा घेऊन तो खुला करण्यात आला आहे. या कामी शिंगवेचे सरपंच आत्माराम खताळ आणि डोणगावचे सरपंच गोकुळ वाघ यांच्यासह इतर शेतकऱ्यांनी विशेष प्रयत्न केले.

यावेळी मंडळाधिकारी अभिजीत पाटील, तलाठी प्रियंका वाघ राजपूत, शिंगवेचे सरपंच आत्माराम खताळ, डोणगावचे सरपंच गोकुळ वाघ, पोलीस पाटील मनीलाल जेजुरे, कोतवाल बाळू सोनवणे, मार्गीलाल खताळ, प्रमोद आहेर, बाळू गुंड, विनय आहेर यांच्यासह शिंगवे आणि डोणगाव येथील अनेक शेतकरी उपस्थित होते. या रस्त्यामुळे आता शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात सहजपणे पोहोचता येणार आहे.

# डोंगरची काळी मैना बाजारात दाखल

## आदिवासी बांधवाच्या उपजीविकेला हातभार

**दिंडोरी : प्रमोद ठेपणे**

आदिवासी बांधवांच्या उपजीविकेला हातभार लावणाऱ्या तसेच उष्णतेचा दाह कमी करण्यासाठी परिचित असलेल्या डोंगरची काळी मैना अर्थात आंबट-गोड करवंद बाजारपेठेत दाखल झाले आहेत.

पळसाच्या पानाच्या द्रोणाबरोबर ग्लासमध्ये करवंद टाकून मापाच्या आधारे सप्तशृंगी गड, वणी येथील जगदंबा माता मंदिर व मार्कंटेय ऋषी मंदिर परिसरात तसेच तेथे येण्या-जाण्याच्या मार्गावर भाविक करवंद फळाचा आस्वाद घेतल्याशिवाय जात नाहीत. साधारणतः मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात गरिबांचा मेवा म्हणून परिचित असलेल्या करवंदाचे आगमन बहुतेक ग्रामीण भागात व जंगल परिसरात होत असते, दिंडोरी तालुक्यातील अहिवंत किल्ला, सुर-



गाणा तालुक्यातील केमचा डोंगर व कळवण तालुक्यातील रावळा जावळा डोंगराबरोबर सप्तशृंगीच्या पर्वतरांगात करवंदाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन आढळून येते.

करवंदाचे लाकूड दमदार असल्याने बहर संपल्यानंतर सरपण म्हणूनही त्याचा वापर ग्रामीण भागातील लोक करीत असतात. आदिवासी बांधव करवंदे विक्री करून संसारास हातभार लावतात. पळसाच्या पानाचे आकर्षक द्रोण तयार करून गावोगाव फिरून त्याची विक्री केली जाते.

फाल्गुन महिना सुरू झाल्यानंतर प्रथम दर्शन होते ते डोंगराच्या कुशीत याच्या काटेरी जाळ्यात पसरलेल्या करवंदाच्या फुलांचे. डोंगरावर सध्या पांढऱ्या फुलांनी झाडे सर्वांना आकर्षित करीत असून फुले गळून पडल्यावर हिरव्या रंगाचे करवंद बहरतात. पिकल्यावर त्यांचा रंग काळा होतो. आदिवासी बांधव पहाटे लवकर करवंदे तोडण्यासाठी रानात पायपीट करीत असतात.

या भागातील करवंदे नाशिक, मालेगावपासून तर जळगावपर्यंत पाठविली जातात, मात्र हक्काची बाजारपेठ नसल्याने व्यापारी वाट्टेल त्या भावात करवंदे खरेदी करून स्वतःचे उखळ पांढरे करून घेतात.

लहान बालके व वृद्ध महिला पळसाच्या पानांचे द्रोण भरून दिवसभर रस्त्याच्या कडेला बसून करवंदे तसेच आंबे (साका) विक्री करतात. आंब्याचा मोसम सुरू होण्यापूर्वीच करवंदाचा मोसम सुरू होत असल्याने कच्च्या करवंदापासून चांगल्या प्रतीचे लोणचे तयार करता येत.

**हक्काच्या बाजारपेठेचा अभाव**

काही वर्षांपूर्वी श्रावण येथील महिला बचतगटाने करवंदापासून लोणचे तयार करण्याचा गृहउद्योग सुरू केला होता. मात्र पाहिजे त्या प्रमाणात बाजारपेठ उपलब्ध न झाल्याने बाळसं धरण्यापूर्वीच हा उद्योग डबघाईस आला. आदिवासी बेरोजगार तरुण व महिलांना करवंदापासून विविध खाद्यपदार्थ बनविण्याचे तंत्रज्ञान अवगत आहे. हा तयार केलेला माल विक्रीसाठी शासनाने बाजारपेठ उपलब्ध करून दिल्यास हक्काचा रोजगार मिळू शकतो,

# के. के. वाघ फार्मसीला 'राष्ट्रीय मानांकन'

**कसबे सुकेणे : वार्ताहर**

निफाड तालुक्यातील पिंपळस रामाचे येथील के. के. वाघ इंस्टीट्युट ऑफ फार्मसी महाविद्यालयास राष्ट्रीय मान्यता मंडळाकडून तीन वर्षासाठी मानांकित करण्यात आले आहे. सदर मानांकन हे राष्ट्रीय स्तरावर जाहीर केले जात असून गुणवत्तापूर्ण परिणाम अविरत शिक्षण, शैक्षणिक सुविधा यांचा उत्कृष्ठ दर्जा म्हणून मान्यता दिली जाते. विशेष म्हणजे गुणवत्तेच्या बळावर स्थापनेपासून अवघ्या ६ व्या वर्षीच महाविद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे.

निफाड तालुक्यातील चांदोरी व पिंपळस सारख्या ग्रामीण भागात २०१८-१९ पासून या अभ्यासक्रमाची घोडदौड सुरु आहे. दि. २८ ते ३१ मार्च २०२५ दरम्यान राष्ट्रीय मान्यता मंडळाच्या परीक्षण मंडळाने महाविद्यालय भेट देऊन परीक्षण केले. यात प्रामुख्याने महाविद्यालयीन शिक्षणाचा दर्जा, शैक्षणिक सुविधा, रोजगाराच्या संधी, अनुभवी प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी केंद्रित इतर सर्व सुविधांचे परीक्षण करण्यात आले. ग्रामीण भागात कार्यरत असलेले व पहिल्याच प्रयत्नात मानांकन प्राप्त केलेले के. के. वाघ इंस्टीट्युट ऑफ फार्मसी, पिंपळस हे जिल्ह्यातील पहिले महाविद्यालय ठरले आहे.

संस्थेचे संचालक मंडळ, महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, आजी माजी विद्यार्थी यांच्या सहकार्य व परिश्रमाचे फलित असून गुणवत्ता शिक्षण हा ध्यास जोपासत असल्याचे प्रमाण आहे असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वैभव भामरे यांनी नमूद केले. प्रा. प्रतिक केदार यांनी समन्वयक म्हणून काम पहिले. फार्मसी महाविद्यालयाचे समन्वयक मा. डॉ. एन. एस. पाटील, के. के. वाघ कॉलेज ऑफ फार्मसी, नाशिकचे प्राचार्य डॉ. के. एस. साळुंखे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

## महत्त्वाचे

### चुंचाळेत तरुणाचा मारहाणीनंतर उपचारादरम्यान मृत्यू

**सिडको :** अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वृंदावननगर परिसरात राहणाऱ्या दीपक माधव जोंगदंड (वय २३) या तरुणाचा मारहाणीनंतर उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना २४ एप्रिल रोजी रात्री शांतीनगर, चुंचाळे शिवार येथे घडली. दीपक माधव जोगदंड याला त्याच्या मेहुण्यासह इतर काही व्यक्तींनी वैयक्तिक कारणावरून मारहाण केली. या मारहाणीत दीपकच्या डोक्याला तसेच बरगडीस गंभीर इजा झाली. गंभीर जखमी अवस्थेत त्याची आई कल्पना जोंगदंड यांनी त्याला जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. प्राथमिक उपचार झाल्यानंतरही दीपकची प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला २६ एप्रिलच्या पहाटे अधिक उपचारांसाठी आडगाव येथील मेडिकल कॉलेजमध्ये हलवण्यात आले. मात्र २७ त्याचा मृत्यु झाला. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास पोलीस नाईक चव्हाण करीत आहेत.

### गंगापूररोडला दीड लाखांचा मुद्देमाल लंपास

**सिडको :** गंगापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एस. बी.आय. बँकेच्या मागे अज्ञात चोरट्याने बंद घराचा सेफ्टी डोअर व मुख्य दरवाजाचा लॉकतोडून सुमारे १ लाख ६४ हजार ५०० रुपयांचा ऐवज व रोख रक्कम चोरी केली. या प्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत किशोर भगवान पाटील (वय ६१) यांनी तक्रार दाखल केली आहे. फिर्यादी हे काही दिवस घराबाहेर असताना अज्ञात चोरट्याने घरातील कपाट व लॉकर फोडून दागिने आणि रोख रक्कम असा मिळून एकूण १ लाख ६४ हजार रुपयांचा मुद्देमालऐवज चोरून नेला. चोरीचा प्रकार २७ एप्रिल रोजी संध्याकाळी उघडकीस आला. त्यानंतर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी भेट देत पंचनामा केला. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक आहिरराव करीत आहेत.

### होरायझन अकॅडमीत विज्ञान मेळावा



**नाशिक :** मविप्र संचलित गंगापूर रोड येथील होरायझन अकॅडमी (आयसीएसई) मध्ये 'द सायन्स : सागा नॉलेज इन मोशन' या विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचे, कल्पनाशक्तीचे दर्शन घडविले. मविप्र संचालक ॲड. लक्ष्मण लांडगे, डॉ. भाऊसाहेब रायते व शिक्षणाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांच्या हस्ते प्रेरणादायी ऊर्जेचे मिश्रण असलेल्या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे सादर केलेले अप्रतिम प्रकल्प आणि मॉडेल्स पाहून मान्यवरांनी कौतुक केले. येथील विद्यार्थ्यांनी रोमांचक सायन्स क्विझमध्ये आपल्या ज्ञानाची चाचणी घेतली. मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, शिक्षणाधिकारी डॉ. कैलास शिंदे, मुख्याध्यापिका डॉ. निधी मिश्रा यांनी विद्यार्थ्यांना तसेच विज्ञान विभागप्रमुख व शिक्षकांना प्रोत्साहन दिले.

### वणीत फिरत्या विज्ञान प्रदर्शनाची सवारी




**नाशिक :** मविप्र संचलित वणी येथील आदर्श इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये नेहरू विज्ञान केंद्रातर्फे फिरत्या विज्ञान प्रदर्शनाच्या बसचे आगमन झाले. सर्वप्रथम मुख्याध्यापिका एस. डी. काळे, सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी या बसचे स्वागत केले. मुख्याध्यापिका एस. डी. काळे, समन्वयक सुजाता देशमुख यांच्या हस्ते पुस्तकाची प्रत देऊन शेखर मर्कट, अनिकेत ढोके व पाटील यांचे स्वागत करण्यात आले. फिरती विज्ञान बस कशी असेल, याविषयीची उत्सुकता असलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी या बसमधील प्रदर्शनाचा लाभ घेतला. या बसद्वारे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विज्ञानाबद्दल अधिक माहिती व्हावी, विज्ञानाबद्दल आवड निर्माण व्हावी, विविध वैज्ञानिक उपकरणांचा परिचय व्हावा, विज्ञानाचा प्रत्यक्ष त्यांनी अनुभव घ्यावा, हा त्यामागील महत्त्वाचा उद्देश होता. सर्वप्रथम विज्ञान बससोबत आलेले शेखर मर्कट व त्यांच्या टीमने विद्यार्थ्यांना विविध वैज्ञानिक उपकरणांचा व त्यांच्या कार्याचा परिचय करून दिला. प्रत्यक्ष ते उपकरण कसे काम करतात, याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. या बसमध्ये ग्रॅव्हिटी फोर्स, वर्ल्ड क्लॉक, फ्रिक्शन इलेक्ट्रो मॅग्नेटिक इंडक्शन, एसी अँड डीसी जनरेटर, न्यूटन्स लॉ अशा विविध प्रात्यक्षिक उपकरणांचा अंतर्भाव होता. विद्यार्थ्यांनी शेखर मर्कट व त्यांच्या टीमने केलेले मार्गदर्शन अतिशय मन लावून ऐकले. त्या उपकरणांचे काम व्यवस्थित समजावून घेतले. त्यानंतर विद्यार्थ्यांना त्यांनी विविध प्रयोगांचे प्रात्यक्षिक करून दाखवले. जादूगार कोणतेही जादू करत नसतो तर त्यामागे विज्ञान असते, हे विद्यार्थ्यांना त्यांनी समजावून सांगितले. सहशिक्षक शार्दुल यांनी सूत्रसंचालन केले. या उपक्रमासाठी संस्थेचे सरचिटणीस मा. ॲड. नितीन ठाकरे, दिंडोरी पेठ तालुक्याचे मविप्र संस्थेचे संचालक प्रवीण जाधव, शिक्षणाधिकारी डॉ. के. एस. शिंदे व मुख्याध्यापिका एस. डी. काळे या सर्वांचे मार्गदर्शन लाभले.

### आरोग्य विद्यापीठाच्या परीक्षा ३ मे पासून

**नाशिक :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या हिवाळी सत्र-२०२४ च्या पाचव्या टप्प्यातील व उन्हाळी सत्र-२०२५ च्या पहिल्या टप्प्यातील लेखी परीक्षेचे संचलन दि. ०३ मे ते १७ मे दरम्यान



महाराष्ट्र राज्यातील एकूण ४६ परीक्षा केंद्रावर संचलीत होणार आहे. पदवी, पदव्यूत्तर अभ्यासक्रमांचे खालील परीक्षा संपन्न होणार आहेत. या परीक्षेत पदवी अभ्याक्रमाच्या तसेच आयुर्वेद, युनानी, होमिओपॅथी पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा घेण्यात येणार आहेत. यामध्ये एकूण अंदाजे २,७२२ विद्यार्थी संपूर्ण महाराष्ट्रातून प्रविष्ठ होणार आहे. प्रश्नपत्रिका ऑनलाईन पद्धतीने पाठविण्यात येणार आहे. परीक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिकांचे त्याच दिवशी संबंधीत परीक्षा केंद्रांवर स्कॅनिंग करुन केंद्रीय मुल्यांकन केंद्रांवर ऑनलाईन पद्धतीने मुल्यामापन केले जाणार असल्याचे परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू यांनी स्पष्ट केले.

### ओझरला दुकानातून कपडे चोरणारा अटकेत

**ओझर :** येथील एका होलसेल मार्केट शोरुम दुकानातुन ४६३५ रुपये किमतीचे ३ कुर्तीज व ४ लेगीज चोरी करुन घेऊन जात असताना एका महिलेला तेथील कर्मचाऱ्यांने रंगेहात पकडले. शनिवारी सांयकाळी सातवाजेच्या सुमारास ओझर टेक्सटाईल शोरुममध्ये कुर्तीज व लेगीज खरेदी करण्याच्या बहाण्याने आलेल्या एका महिलेने कुर्तीज व लेगीज घेत चेजिंग रुममध्ये नेले तेथे ४६३५ रूपये किमतीचे ३ कुर्तीज तिने तिच्या कुर्तीच्या आतमध्ये चोरी करण्याच्या उद्देशाने लपविले व ४ लेगीज पर्स मध्ये टाकुन चोरी करुन घेवुन जात असतांना दुकानातील कर्मचाऱ्यांने रंगेहात पकडले या महिले विरूद्ध ओझर टेक्स्टाईल मार्केटचे संचालक प्रसाद येवले यांनी ओझर पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविल्यावरून ओझर पोलिसांनी ओझर येथे राहाणाऱ्या महिले विरूद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला असुन अधिक तपास हवालदार एम के कराड हे करत आहे.

# वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी कल्याणकारी मंडळ लवकरच : मंत्री फुंडकर

## राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेस आश्वासन

**नाशिक : प्रतिनिधी**

महाराष्ट्रवृत्तपत्रविक्रेत्यांच्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या स्वतंत्र वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळाची रचना व आर्थिक तरतुदीबाबत कार्यवाही सुरू असून लवकरच राज्यातील वृत्तपत्र विक्रेत्यांच्यासाठीचे स्वतंत्र कल्याणकारी मंडळ कार्यरत करू असे आश्वासन राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी दिले.

वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे मार्गदर्शक, ठाणे येथील आ. संजय केळकर यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या शिष्टमंडळाने कामगार मंत्री फुंडकर यांची मुंबईत भेट घेतली. त्यावेळी फुंडकर यांनी हे आश्वासन दिले. शिष्टमंडळात राज्य संघटनेचे अध्यक्ष सुनील पाटणकर वर्धा, कार्याध्यक्ष बालाजी पवार नांदेड, सरचिटणीस विकास सूर्यवंशी सांगली, कोषाध्यक्ष राजेंद्र टिकार बुलढाणा व व्यवस्थापन समिती सदस्य दत्तात्रय घाडगे ठाणे यांचा सहभाग होता.



वृत्तपत्र विक्रेत्यांच्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मागील सरकारच्या काळात मंत्रिमंडळ बैठकीत स्वतंत्र वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळाला मान्यता देण्यात आली आहे. मात्र अद्याप पुढील कारवाई झालेली नाही. याबाबत राज्य संघटनेच्या शिष्टमंडळाने केळकर यांच्या समवेत कामगार मंत्री फुंडकर यांची भेट घेतली. वृत्तपत्र विक्रेता हा दुर्लक्षित घटक असून अनेक अडचणींवर मात करत व्यवसाय करत आहे.

सध्या वृत्तपत्र व्यवसायातील अडचणी बरोबरच या वृत्तपत्र विक्रेत्यांनाही लढावे लागत आहे. त्यामुळे वृत्तपत्र विक्रेत्यांच्यासाठीचे कल्याणकारी मंडळ लवकरात लवकर कार्यरत करावे. या मंडळासाठी लागणारा निधी उभा करण्याचे मार्ग राज्य शासनाने नेमलेल्या अभ्यास समितीने सुचवलेले आहेत.

सन २०१९ मध्ये या अभ्यास समितीने आपला अहवाल राज्य शासनास दिला असून त्यातील सुचवलेल्या मार्गापैकी काही मार्गांचा अवलंब करून निधीचा स्त्रोत नक्की करावा. त्या माध्यमातून वृत्तपत्र विक्रेत्यांच्यासाठी पेन्शन, व्यवसायासाठी मदत, व्यवसायासाठी साधनसामग्रीची पुरवठा, आरोग्य सुविधा, वृत्तपत्र विक्रेत्यांच्या मुलांच्या उच्च शिक्षणासाठी योजना आदी योजना लागू कराव्यात अशी विनंती आ.संजय केळकर यांनी वृत्तपत्र विक्रेत्यांच्यावतीने कामगार मंत्र्यांच्या वेळी केली. राज्य संघटनेचे अध्यक्ष पाटणकर, कार्याध्यक्ष पवार, सरचिटणीस सूर्यवंशी, कोषाध्यक्ष टिकार व सदस्य घाडगे यांनी यावेळी झालेल्या चर्चेत सहभाग घेतला. कामगार मंत्री फुंडकर यांनी यावेळी वृत्तपत्र विक्रेत्यांच्या व्यवसाय एकूण कामाची पद्धत याबाबत सविस्तर चर्चा केली.




## चार श्रम संहितांचे नियम तात्काळ रद्द करावेत

### एमएसएमआरएचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**नाशिक : प्रतिनिधी**

चार श्रम संहितांचे नियम तात्काळ रद्द करावेत अशी मागणी करणारे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना एमएसएमआरएचे (महाराष्ट्र सेल्स ॲन्ड मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह असोसिएशन) शाखा सचिव अमोल पाटील यांनी दिले.

**या प्रमुख मागण्या**

राज्य शासनाने तयार केलेले चार श्रम संहितांचे नियम तात्काळ रद्द करावेत. या संदर्भात सर्व संबंधित कामगार संघटनांशी चर्चा करून निर्णय घ्यावा. केंद्र सरकारकडे चार श्रम संहितांमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांबाबत पाठपुरावा करून त्या मागे घेण्याची मागणी करावी विद्यमान जुने कामगार कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी. ''महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक'' तात्काळ मागे घ्यावे.

महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीमंडळाने केंद्र सरकारने केलेल्या चार श्रम संहितांच्या अनुषंगाने राज्यातील नियमांना मंजुरी दिली आहे. हे चार श्रम संहितेचे नियम देशातील विद्द्यमान २९ प्रमुख कामगार कायदे रद्द करून तयार करण्यात आले आहेत. याला देशातील सर्व केंद्रीय कामगार संघटना व फ`डरेशन्सने तीव्र विरोध नोंदवला आहे.

सदर श्रम संहितांचे नियम हे पूर्णतः कामगारविरोधी असून, मालक धार्जिणे आहेत.

## कडवा पाटावर पुल बांधण्याची मागणी

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

नाशिक सहकारी साखर कारखाना ते बंगाली बाबा या रस्त्यावरील सौमय्या नगर जवळील कडवा पाटावर असलेल्या पुल हा तिरपा असुन या पुलावरती दैनदिन अपघात होऊन अनेकांना आपल्या जिवाला मुकावे लागले आहे. सदर पुल हा पूर्वी पाटबंधारे विभागाने बांधलेला असून चुकीच्या पध्दतीने बांधला गेला आहे. मात्र आठ वर्षापूर्वी हा रस्ता आपल्या बांधकाम विभागाकडे वर्ग झाला असून तो पुल जिर्ण झाल्याने तातडीने नविन पुलाचे बांधकाम करुन वाहन धारकांचा जीव वाचवावा अशी मागणी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता अभिजात शेलार यांच्या कडे पळसेच्या सरपंच ताराबाई गायधनी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख सुनील गायधनी याच्यासह पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

कडवा वरती नवीनपुल मंजूर करून दक्षिण उत्तर या रस्त्याप्रमाणे सरळ रेषेत फुलाचे बांधकाम करावे,व याच रस्त्यावरील सरोदे - गायखे मळ्याच्या शिवनाल्या वर नासाकाने अनेक वर्षापूर्वी जो पुल बांधला तो आता जिर्ण होऊन मोडकळीस आल्यामुळे त्या ठिकाणी देखील नवीन पुल बांधण्यात यावे असा विविध मागण्याचे निवेदन सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात आले.यावेळी माजी सरपंच देविदास गायधनी,भाजपाचे नंदु नरवडे,राजेंद्र सरोदे आदीसह नागरिकांनी केली आहे.



**नवीन पुलासाठी ३५ लाखाची तरतूद...**

कडवा कँनल १९ कि.मीच्या अंतरावर पूर्वी चा असणारा लोखंडी पुल हा शंभर टक्के जीर्ण झाला असुन त्याठिकाणी नवीन पुलास देखील मान्यता मिळालेली असताना आज पर्यंत पुलाचे कृती आराखडा तयार नसुन तो तातडीने तयार करुन त्यसाठी अदांजे. ३५ लाखाची तरतूद देखील आहे.मात्र आज पर्यंत कृती आराखडा तयार नसुन तो तयार करुन तातडीने त्याकामास निधी उपलब्ध करुन काम सुरु होण्याची मागणी पाटबंधारे, जलसिंचन नाशिक उपविभागीय अभियंता सुभाष पगारे याच्या कडे पळसे ग्रामपंचायतीच्या वतीने पत्राद्वारे केली आहे.

## प्रवासात १ लाख ९५ हजारांचा दागिणे लंपास

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

शहरातील वयोवृद्ध दाम्पत्य पनवेलहून नाशिकला परतल्यानंर त्यांचे सुमारे १ लाख ९५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरट्याने लंपास केल्याचे त्यांच्या लक्षात आले. या प्रकरणी मुंबई नाका पोलीस ठाण्यात अज्ञात चोराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी प्रकाश मोहिते (वय ७३, रा. गुंजाळबाबा नगर, हिरावाडी, पंचवटी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि. २७ एप्रिल रोजी सकाळी ८ ते दुपारी १२.४० या कालावधीत ही घटना घडली. मोहिते दाम्पत्य पनवेलहून नाशिककडे प्रवास करून साहेबा हॉटेल, मुंबई नाका येथे उतरले.

त्यानंतर रिक्षाने घरी पोहोचले. घरात पोहोचल्यावर त्यांच्या पत्नी अरुणा मोहिते यांच्या लक्षात आले की, बरोबर आणलेल्या बॅगेतील सोन्याचे दागिने गायब आहेत. या बॅगेमध्ये एकूण १ लाख ९५ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने होते. त्यामध्ये १ लाख ३५ हजार रुपये किमतीचा तीन तोळ्यांचा सोन्याचा नेकलेस, २० हजार रुपये किमतीचे १० ग्रॅम सोन्याचे पोस्टाचे कॉईन, १० हजार रुपयांचे ५ ग्रॅम सोन्याचे कॉईन, १२ हजार रुपयांचे ३ ग्रॅमचे दोन 'ओम गोल्ड' कॉईन, तसेच ५ हजार आणि ३ हजार रुपयांच्या किमतीचे वेगवेगळ्या वजनाचे सोन्याच्या वेढ्याच्या अंगठ्या यांचा समावेश आहे. चोरीची घटना लक्षात येताच त्यांनी तात्काळ मुंबई नाका पोलिसांकडे धाव घेत माहिती दिली. त्यावरुन मुंबई नाका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. पुढील तपास हवालदार डी. एन. गोडे करीत आहेत.

## माडसांगवी शिवारातील फार्महाऊसमध्ये चोरी; ऐवज लंपास

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

आडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील माडसांगवी शिवारात असलेल्या सांगळे फार्महाऊसचे कुलूप तोडून चोरट्यांनी १ लाख ५० हजार रुपयांचा ऐवज चोरल्याची घटना उघडकीस आली आहे.

याप्रकरणी आडगांव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी प्रकाश घुगे (वय ६९ वर्ष, हनुमान नगर, पंचवटी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार माडसांगवी शिवारातील सांगळे फार्महाऊसमध्ये चोरट्यांनी प्रवेश करून लाकडी कपाटाचे लॉक तोडून त्यातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा मिळून एकूण १ लाख ५० हजारांचा मुद्देमाल लंपास केला. या चोरीत ४० ग्रॅम वजनाचे सुमारे १ लाख २० हजार रुपये किमतीचे मणी मंगळसूत्र आणि ३० हजारांची रोख रक्कम होती.

## दामोदर नगरमधील बंद घराचे कुलूप तोडून चोरी

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

पाथर्डीफाटा परिसरातील दामोदर नगर येथे बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने ८९ हजार रुपयांपेक्षा अधिक किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संदीप जाधव (वय ४०, रा. दामोदर नगर, पांडुरंग चौक, पाथर्डीफाटा, नाशिक) हे २४ एप्रिलपासून २६ एप्रिल रोजी दुपारी १२.३० वाजेपर्यंत बाहेर गेले होते. त्यावेळी त्यांच्या घराचे कडीकोयंडे तोडून चोरट्यांनी लोखंडी कपाटातील लॉकर फोडून त्यातील सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले. चोरीस गेलेल्या दागिन्यांमध्ये ३४ हजार रुपये किंमतीचे ९.०४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र, १७ हजार ५०० रुपयांचे ५ ग्रॅम सोन्याचे मणी, ३ हजार रुपयांचे २ ग्रॅम सोन्याचे अशोकचक्र, १७, हजार ५०० रुपयांचे गौतम बुद्धाचे ५ ग्रॅमचे सोन्याचे पेंडल, १ हजार ५०० रुपयांची १ ग्रॅम सोन्याची अंगठी, १२ हजार ५०० रुपयांची ३.५ ग्रॅम सोन्याची कर्णफुले आणि १ हजार ५०० रुपयांचे चांदीचे ३ भार वजनाचे जोडवे व बाजूबंद यांचा समावेश आहे. तपास इंदिरानगर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ महिला पोलिस अधिकारी तृप्ती सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संतोष फुंदे करीत आहेत.

## मांडसांगवी येथून १३ लाख ७८ हजारांचा ऐवज लंपास

**माडसांगवी : वार्ताहर**

येथिल नाशिक संभाजीनगर महामार्ग लगत जिल्हा परिषद शाळेसमोरील बंद घराचे कुलूप तोडून सुमारे १३ लाख ७८ हजारांचा ऐवज चोरून नेला. ही चोरी पाळत ठेवून झाली असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

माडसांगवी येथील रहिवासी ॲड. सचिन टिळे तसेच त्यांचे मामा भाऊसाहेब पेखळे हे परिवारासह तुळजापूर, कोल्हापूर येथे देवदर्शनासाठी गेले होते. दोघांच्याही बंद घराला कुलूप असल्याची संधी साधत चोरट्यांनी लोखंडी दरवाजाचे कुलूप तोडत घरात प्रवेश केला. घराच्या पहिल्या मजल्यावरील दोन बेडरूम मधून दागिन्यांची आणि रोख रकमेची चोरी केली. बेडरूममधील लाकडी कपाटांचे कुलूप तोडून सामान अस्तव्यस्त फेकत आणि कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने रोख रक्कम चोरून नेली आहे. यात ३ लाख रुपये किमतीची एक ३० ग्रॅम वजनाचे सोन्याचे पट्ट्याची मंगळसूत्र, २ लाख ५० हजार रूपये किमतीचे एक २.५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे नेकलेस, १ लाख ५० हजार किमतीचे १.५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातले, ७० हजार रुपये किमतीचे एक ७ ग्रॅम वजनाचे सोन्याची अंगठी, १लाख किंमती किमतीच्या १० ग्रॅम वजनाचे ओमपान व लहान बाळाचे कानातले, २ लाख रुपये किमतीचे एक २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे लॉकेट, ६ हजार रुपये किमतीचे स्मार्ट वॉच, नाईस कंपनीचे एक स्मार्ट वॉच, रोख रक्कम रुपये ५५ हजार एकूण ११ लाख ३१ हजाराचा ऐवज चोरीला गेला.



तसेच भाऊसाहेब पेखळे यांच्या घराचा कोयंडा तोडून घरात प्रवेश केला आणि लाकडी कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम एकूण २ लाख ४७ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला. यामध्ये २ लाख रुपये किमतीचे एक २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे पेंडल व मंगळसूत्र पोत तसेच ४७ हजार रुपये रोख चोरीस गेले आहे.

सदर चोरीची माहिती ॲड. सचिन टिळे यांना फोनवरून समजली. त्यांनी दुसऱ्या दिवशी आडगाव पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदविला आहे.

आडगाव पोलीस स्टेशनचे सह. पो. निरीक्षक निखिल बोंडे, पोलीस हवलदार. डी. व्ही. निंबाळकर यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली. यावेळी श्वान पथक आणि ठसे तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले होते. परंतु चोरट्यांनी कुलूप तोडताना काहीतरी लिक्विड ओतून तसेच हाताचे ठसे उमटणार नाही अशा प्रकारे काळजी घेतली होती. सदर घराच्या परिसरात सी.सी.टीव्हीचे कॅमेरे लावलेले असून चोरट्यांनी सीसीटीव्हीचा डीव्हीआर फोडला आहे. सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

## इंदिरानगरला अकरा केवी वायर तुटल्यामुळे रात्री अडीच तास विद्युत पुरवठा खंडित

**इंदिरानगर : वार्ताहर**

इंदिरानगर पाथर्डी रोडवरील सुदर्शन मंगल कार्यालयाच्या बाजूला निसर्ग छाया अपार्टमेंट समोर रात्री दोन वाजता मेन लाईनची तार तुटल्यामुळे विद्युत पुरवठा खंडित झाला. लागलीच दुरुस्तीचे काम केल्याने नागरिकांना उकाड्यापासून सुटका मिळाली.

वनवैभव कॉलनी, स्वामी कुंज कॉलनी, सुदर्शन कॉलनी, श्रद्धा विहार, श्रद्धा गार्डन, विराज सोसायटी, एलआयसी कॉलनी, रामनगर, कलानगर, पाथर्डी गाव, म्हाडा कॉलनी अशा अनेक भागात विद्युत पुरवठा खंडित झाला होता.



उन्हाळ्याच्या दिवस असल्यामुळे दिवसा ३९ ते ४० डिग्री तापमान असल्यामुळे त्याच्या परिणाम रात्रीसुद्धा जाणवतो. त्यामुळे ग्राहकांना विद्युत पुरवठा खंडित झाल्यानंतर मनस्ताप सहन करावा लागतो.

राणे नगर सब स्टेशन, इंदिरानगर व पाथर्डी या तिन्ही भागांमध्ये गेल्या दोन ते तीन वर्षांमध्ये विद्युत पुरवठा अनेकदा तासन्तास खंडित होत आहे.

लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांनी निवेदन, अर्ज, मोर्चे काढून सुद्धा महावितरणला जुन्या कामांचे मेंटनन्स करण्यात रस दिसत नाही. तसेच नवीन कामही लवकर होत नाही. त्यामुळे नागरिकांनी व ग्राहकांनी संताप व्यक्त केला आहे.

ग्राहकांचे एक महिन्याचे बिल थकीत असले तरी तत्काळ विद्युत पुरवठा खंडित केला जातो. ग्राहकांनाही २४ तास विद्युत पुरवठा मिळणे अपेक्षित आहे. रात्री दोन वाजता विद्युत पुरवठा खंडित झाल्यानंतर सामाजिक कार्यकर्ते दर्शन लड्डा व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्रजी पवार) ओबीसी जिल्हाध्यक्ष जगताप यांनी तत्काळ महावितरणशी संपर्क करून विद्युत पुरवठा सुरळीत करून घेतला.

## लक्ष्मीकांत वाघवकर यांना बापू उपाध्ये स्मृती पुरस्कार



**नाशिक :** समाज परिवर्तन केंद्र, नाशिक, ओझर या संस्थेतर्फे देण्यात येणारा समाज परिवर्तन केंद्राचे संस्थापक व पाणी वापर संस्थांचे प्रणेते स्व.बापू उपाध्ये यांच्यास्मृत्यर्थ पाणी वापर संस्था चळवळीत सातत्याने तळमळीने कार्य करणारे जलसंपदा विभागाचे निवृत्त अभियंता लक्ष्मीकांत वाघवकर यांना जाहीर करण्यात आला आहे. रू. २१ हजार मानपत्र व शाल,श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. गुरूवार, दि. १ मे रोजी सकाळी अकरा वाजता दिंडोरी रोडवरील मेरी येथील इंजि. पां.कृ. नगरकर सभागृहात इंजि.डॉ.श्री. संजय बेलसरे, सचिव, (लाक्षेवि) जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. याप्रसंगी इंजि. प्रकाश भामरे , निवृत्त सचिव जलसंपदा विभाग व इंजि. राजेंद्र शुक्ला, निवृत्त कार्यकारी संचालक विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांची विशेष उपस्थिती राहाणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहाण्याचे आवाहन समाज परिवर्तन केंद्राचे अध्यक्ष डॉ.श्रीराम उपाध्ये, कार्याध्यक्ष विठ्ठल देशपांडे, सरचिटणीस सुधा माळी, अविनाश लोखंडे यांनी केले आहे



# नाशिकरोड येथील घरफोडीप्रकरणी सराईत गुन्हेगार ताब्यात

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

नाशिकरोड येथे माजी नगरसेवकाच्या भरदिवसा झालेल्या घरफोडीच्या गुन्ह्याचा अवघ्या काही दिवसांत छडा लावत उपनगर पोलिसांनी व गुन्हे शाखा युनिट-२ च्या पथकाने पुण्यातून सराईत गुन्हेगाराला अटक केली आहे. आरोपीकडून ८ लाख ६४ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, आरोपी हा महाराष्ट्रातील ४० हून अधिक घरफोडीचे गंभीर गुन्हे त्याच्यावर दाखल आहे.

१८ फेब्रुवारी रोजी दुपारी अंगण छाया सोसायटीत माजी नगरसेवक सुनिल गोडसे यांच्या घराचा दरवाजा तोडून चोरट्याने रोख रक्कम व सोन्याचे दागिने लांबवले होते. याप्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेनंतर पोलिसांनी परिसरातील सुमारे ५० सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली आणि तांत्रिक विश्लेषण तसेच गुप्त बातमीदारांच्या मदतीने आरोपी लखनसिंग दुधानी (वय ३६, रा. रामटेकडी, हडपसर, पुणे) पोलिसांच्या हाती लागला.

सपोनि हेमंत तोडकर आणि सपोनि समाधान हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने पुण्यात सापळा रचून आरोपीला अटक केली. चौकशीदरम्यान लखनसिंग दुधानी याने गुन्ह्याची कबुली दिली असून, रविसिंग कल्याणी या साथीदारासोबत मिळून चोरी केल्याचे त्याने उघड केले. आरोपीकडून पोलिसांनी रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने असा एकूण ८.६४ लाखांचा ऐवज हस्तगत केला आहे. तपासात समोर आले की, अटक केलेले आरोपी हे महाराष्ट्रातील विविध भागांतील ४० ते ४५ घरफोडी प्रकरणांत गुंतलेले असून, पुण्यातील विश्रांतवाडी पोलीस ठाण्यातही मोटारसायकल चोरीसंदर्भात त्यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवलेला आहे. ही संपूर्ण कारवाई पोलीस उपायुक्त मोनिका राऊत सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. सचिन बारी यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे, पोलीस निरीक्षक संजीव फुलपगारे, तपासी अधिकारी पोउनि प्रभाकर सोनवणे आणि गुन्हे शाखा युनिट-२ यांच्या पथकाने केली. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

पान १ वरून....

## भारत-फ्रान्समध्ये राफेल करार

हवाई दलाच्या राफेल विमानांपेक्षा अधिक प्रगत आहेत. सध्या भारतीय हवाई दलाकडे मिग-२९ विमाने आहेत. ही विमाने आयएनएस विक्रमादित्यवर तैनात आहेत. अलिकडच्या काळात राफेल सागरी विमानांच्या देखभालीची वाढती मागणी आणि मर्यादित उपलब्धतेमुळे भारत राफेल सागरी विमाने खरेदी करत आहे. २०२२ मध्ये नौदलाने सांगितले की विक्रांत हे मिग-२९ ची जागा घेण्यासाठी डिझाइन केले होते. परंतु ते बदलण्यासाठी अधिक चांगल्या डेक-आधारित लढाऊ विमानाच्या शोधात होते. राफेल मरीनची प्रगत रडार तंत्रज्ञान, अधिक शस्त्रे वाहून नेण्याची क्षमता, चांगले सेन्सर्स यामुळे ते मिग-२९ विमानांपेक्षा चांगले बनते.भारतीय हवाई दलाकडे आधीच राफेल विमाने आहेत. अशा परिस्थितीत, त्याच्या उपकरणांचे प्रशिक्षण आणि देखभाल करण्यात फारशी अडचण येणार नाही. भारतीय नौदलाने आपली क्षमता वाढवण्यासाठी ५७ लढाऊ विमाने खरेदी करण्याची योजना आखली होती. यासाठी गोव्यात फ्रान्सच्या राफेल मरीन आणि अमेरिकेच्या बोईंग-१८ च्या चाचण्याही घेण्यात आल्या. २०२२ मध्ये, भारताने अमेरिका आणि फ्रान्सला त्यांच्या प्रस्तावाची अंतिम मुदत वाढवण्याची विनंती केली होती. फक्त फ्रान्सने यावर सहमती दर्शवली, त्यानंतर भारतासमोर राफेल मरीन खरेदी करण्याचा एकमेव पर्याय उरला.

## पाकिस्तानविरोधात एल्गार

तज्ज्ञांकडून व्यक्त केला जात आहे. आतापर्यंत नऊ दहशतवाद्यांची घरे उडवून देण्यात आली आहेत. इतकेच नव्हे तर साडेचारशेच्या आसपास संशयित ताब्यात घेत मोठी मोहीम राबवण्यात येत आहे. गेल्या दोन दशकांमधील हे सर्वात मोठे कोबिंग ऑपरेशन आहे असल्याचे बोलले जात आहे.

## १४ वर्षाच्या वैभव सूर्यवंशीचे वादळ

६ षटकार आणि ३ चौकारांच्या मदतीने आपले पहिले अर्धशतक ठोकले. हे या हंगामातील सर्वात वेगवान अर्धशतक देखील आहे. त्यानंतर त्याने गुजरात टायटन्सविरुद्ध ३८ चेंडूत १०१ धावांची खेळी केली. वैभव सूर्यवंशीने २६५.७८ च्या स्ट्राईक रेटने या धावा केल्या, ज्यामध्ये ७ चौकार आणि ११ षटकारांचा समावेश होता. यादरम्यान, त्याने शतक पूर्ण करण्यासाठी फक्त ३५ चेंडू घेतले. यासह, तो आयपीएलमध्ये सर्वात वेगवान शतक करणारा भारतीय फलंदाजही बनला. यापूर्वी हा विक्रम युसूफ पठाणच्या नावावर होता. २०१० मध्ये राजस्थान रॉयल्सकडून मुंबई इंडियन्सविरुद्ध खेळताना त्याने हे शतक झळकावले होते. आता १५ वर्षांनंतर, वैभव सूर्यवंशीने त्याला मागे टाकले आहे.त्याच वेळी, जर आपण आयपीएलमध्ये शतक ठोकणाऱ्या सर्वात तरुण फलंदाजाबद्दल बोललो तर, वैभव सूर्यवंशीपूर्वी हा विक्रम मनीष पांडेच्या नावावर होता. मनीष पांडेने १९ वर्षे २५३ दिवसांच्या वयात हे केले. पण आता हा विक्रम वैभव सूर्यवंशीच्या नावावरही आहे. एवढेच नाही तर वैभव सूर्यवंशीने आयपीएलच्या एका डावात सर्वाधिक षटकार मारणाऱ्या भारतीय फलंदाजाच्या विक्रमाची बरोबरीही केली आहे. त्याच्या आधी मुरली विजयने २०१० मध्ये एका डावात ११ षटकार मारले होते.

## युवकाची डोक्यात दगड घालून हत्या

बंडीच्या खुनाचा बदला घेतला, असे काही जण म्हणत होते तर काही जण खून का बदला खून म्हणत होते. सर्व संशयीत जल्लोष करत घटनास्थळावरुन फरार झाले. अंबड पोलिसांसह परिमंडळ-२ चे पोलीस उपायुक्त मोनिका राऊत, सहाय्यक पोलीस आयुक्त शेखर देशमुख, तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक राकेश हांडे यांनी घटनास्थळी पाहणी केली. अंबड पोलिसांनी आकाश चौरे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात पाच ते सहा संशयितांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांचे विविध पथक तपासासाठी तयार करण्यात आले आहेत. मयत करण चौरे हा वडिलांना प्लम्बिंगच्या कामात मदत करत होता. त्याच्या पश्चात आई, वडील, भाऊ व वहिनी असा परिवार आहे.

## कोर्ट ऑफ काजी'ला कायदेशीर मान्यता नाही

आहे की, अशा संस्थांनी घेतलेली कोणतेही निर्णय, कोणत्याही नावाने लेबल केलेली असो, ती कोणावरही बंधनकारक नसते आणि कोणत्याही जबरदस्तीच्या उपाययोजनांद्वारे ती लागू करता येत नाही. असे निर्णय कायद्याच्या दृष्टीने तेव्हाच छाननीला सामोरे जाऊ शकते, जेव्हा प्रभावित पक्ष अशा निर्णयावर कृती करून किंवा ती स्वीकारून अवलंब करतात आणि जेव्हा अशी कृती इतर कोणत्याही कायद्याशी संघर्ष करत नाही. तरीही, असे निर्णय फक्त त्या पक्षांमध्येच वैध असतात, जे त्यावर कृती करण्याचा, स्वीकारण्याचा निर्णय घेतात आणि इतरांना नाही.

## मेट्रोसाठी शहरात अकरा प्रकारचे सर्वेक्षण

तरी पंतप्रधान कार्यालयाकडूनच याबाबत ठरवले जाईल. मार्च २०२५ च्या पहिल्या आठवड्यात रेल्वे मंत्रालयाचे अधिकारी नाशिकला आले सतात त्यांनी बैठका घेत सर्वेक्षणाच्या सूचना दिल्या. त्यानंतर महापालिकेच्या वाहतूक शाखेचे अधिकारी व महारेलच्या पथकाकडून सर्वेक्षण सुरु करण्यात आले. दरम्यान यापूर्वी मेट्रोसाठीचे मार्ग तयार केले असता त्यात बदल करुन आणखी नवीन ठिकाणे जोडली जाणार आहेत. ३ मार्च रोजी राज्याचे मुख्य सचिवांसह रेल्वेच्या अधिकाऱ्यांची व्हिडिओ क़ॉन्फरन्सि झाली. नाशिकचे विभागीय महसुल आयुक्त डॉ. प्रविण गेडाम, मनपा आयुक्त मनिषा खत्री, अतिरिक्त आयुक्त प्रदिप चौधरी, मनपा वाहतूक सेलचे प्रमुख रविंद्र बागुल आदीसह उपस्थित होते. कॉम्पॅक्ट मेट्रोमुळे नाशिकची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सुलभ आणि गतिमान होणार आहे. सिंहस्थ कुंभमेळ्यापूर्वी हा प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. नियो ऐवजी कॉम्पॅक्ट मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी होणार असल्याने आराखडा तयार करुन पाठविण्याचे आदेश देण्यात आले आहे.

## एसटी बस प्रवासात ३२ तोळे सोन्याची चोरी

**दौंड :** सांगली - अहिल्यानगर एसटी बस प्रवासात तीन महिलांच्या बॅग मधील तब्बल ३२ तोळे सोन्याचे दागिने चोरीस गेले आहे. दौंड येथे एका विवाह समारंभाकरिता एसटीने येत असताना ही चोरी झाली.

---

**ग्रामपंचायत कार्यालय, एकलहरे ता. जि. नाशिक**

**जाहीर ई-निविदा सूचना क्र. ०१/२०२५-२६ (प्रथम प्रसारण)**

सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत एकलहरे ता. जि. नाशिक येथे Providing Internal Cement Concrete Road in Eklhare Tal Dist Nashik विकास कामांसाठी महाराष्ट्र शासनाच्या योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदार यांच्याकडून ई निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहे. सदर इ निविदा शासनाचा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून दि. २८/०४/२०२५ ते १३/०५/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येईल. इ-निविदा संबंधीची सविस्तर माहिती अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी सरपंच**
**ग्रामपंचायत एकलहरे ता. जि. नाशिक**

---

**ग्रामपंचायत कार्यालय इंदोरे, ता. दिंडोरी जि. नाशिक प्रथम प्रसिद्धी**

**जाहीर ई निविदा सूचना २०२५-२६**

ग्रामपंचायत कार्यालय इंदोरे ता. दिंडोरी जि. नाशिक येथे, १५ वा वित्त आयोग, पेसा निधी व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई - निविदा मागविण्यात येत आहे. व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईट वरून दिनांक २८/०४/२०२५ पासून ते ०५/०५/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई- निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय इंदोरे, ता. दिंडोरी जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय इंदोरे ता. दिंडोरी जि. नाशिक**

---

**ग्रामपंचायत कार्यालय घोटी तालुका इगतपुरी जि. नाशिक**

**जाहीर निविदा क्रं. २०२५-२६**

मा.ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय घोटी ता. इगतपुरी. जि. नाशिक येथे ग्रामनिधी योजने अंतर्गत CONSTRUCTING CEMENT CONCRETE ROAD FOR INDIRANAGAR MANOHAR KATADE NEAR HOUSE AT GHOTI BK. TAL IGATPURI DIST NASHIK रक्कम रु ३,००,४६५.०० कामासाठी सीलबंद लिफाफा दरपत्रके मागवण्यात येत आहे. इच्छुकांनी आपली दरपत्रके दिनांक २९/०४/२०२५ ते ०५/०४/२०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयत सादर करावयात. या निविदे संबंधीची सर्व माहिती व अटी/शर्ती ग्रामपंचायत कार्यालय कार्यालयीन वेळेत उपलध राहतील तसेच सविस्तर माहितीसाठी ग्रामपंचायत कार्यालय येथे संपर्क करावा.

अटी व शर्ती : १) दरपत्रके बंद लिफाफ्यात नसेल तर नाकारण्यात येईल. २) दरपत्रके मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतकडे राखून ठेवण्यात आला आहे. नामंजुरी बाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. ३) बंद लिफाफ्यावर स्पष्ट व मोठया शब्दात कामाचा उल्लेख करावा. ४) शक्य झाल्यास दर पत्रके ०६/०४/२०२५ रोजी उघडण्यात येतील.

**ग्रामविकास अधिकारी** **प्रशासक**

---

**जाहीर नोटीस**

**ॲड. जनार्दन भाऊसाहेब कुंदे**
**ॲडव्होकेट**
**ऑफीस.नं. २०३/१ निफाड न्यायालय,**
**निफाड, ता. निफाड, जि. नाशिक**

३११५-८१-५७.४ ९९/२०२४

**निफाड येथील तहसिलदार सो. यांचे कार्यालयात....**

**श्री. सोमनाथ एकनाथ ताडगे** **अर्जदार**

**विरुध्द**

**मुख्याधिकारी सो.,**
**नगरपंचायत कार्यालय, निफाड**
**ता. निफाड, जि. नाशिक** **सामनेवाले**

उपरोक्त जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, **लता शरद ढमे** यांचा मृत्यू **दि. ०५/०५/२०२२** रोजी निफाड, ता. निफाड, जि. नाशिक येथे झालेला आहे, त्यांचे मृत्युची नोंद नगरपंचायत कार्यालय, निफाड यांचे रेकॉर्डला झालेली नाही तसा दाखला मुख्यधिकारी सो. निफाड यांनी दि. ०२/०८/२०२४ रोजी दिलेला आहे. त्याअर्थी सदर अर्जाबाबत कोणाचे काही म्हणणे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर **दि. ०२/०५/२०२५ रोजी दु. ३.०० वाजता** किंवा त्यापूर्वी उपरोक्त न्यायालयात स्वत: अगर आपले वकिलांमार्फत हजर राहुन आपले लेखी म्हणणे/हरकत दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचे म्हणणे/हरकत अगर तक्रार न आल्यास तहसिलदार सो. निफाड हे अर्जदाराचा योग्य तो पुरावा घेवुन योग्य तो आदेश करतील त्यानंतर कोणाचेही काहीही म्हणणे ऐकले जाणार नाही याची नोंद घ्यावी. आज **दि.२८/०४/२०२५** रोजी या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी प्रसिध्द करण्यात आली आहे.

**तहसिलदार सो.**
**निफाड**

---

**ग्रामपंचायत कार्यालय परमोरी, ता. दिंडोरी जि. नाशिक प्रथम प्रसिद्धी**

**जाहीर ई निविदा सूचना २०२५-२६**

ग्रामपंचायत कार्यालय परमोरी ता. दिंडोरी जि. नाशिक येथे १५ वा वित्त आयोग व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवरून दिनांक २६/०४/२०२५ पासून ते ०२/०५/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई- निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय परमोरी, ता. दिंडोरी जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय परमोरी, ता. दिंडोरी, जि. नाशिक**

---

**ग्रामपंचायत कार्यालय ढकांबे, ता. दिंडोरी जि. नाशिक प्रथम प्रसिद्धी**

**जाहीर ई निविदा सूचना २०२५-२६**

ग्रामपंचायत कार्यालय ढकांबे ता. दिंडोरी जि. नाशिक येथे १५ वा वित्त आयोग, पेसा निधी व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई- निविदा मागविण्यात येत आहे व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईट वरून दिनांक २८/०४/२०२५ पासून ते ०५/०५/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई- निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय ढकांबे, ता. दिंडोरी जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय ढकांबे ता. दिंडोरी जि. नाशिक**

---

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,
**मौजे ताहाराबाद,** ता. बागलाण, जि. नाशिक येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे खाली सही करणार यांचे मालकी व कब्जे उपभोगातील आहे, तिचे वर्णन येणेप्रमाणे -

| स.नं./ग.नं | प्लॉट नं. | क्षेत्र (चौ.मि.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ३१३/२ | १४७ | ८४.६० | ८.४६ |

सदर मिळकत ही आमचे पक्षकार **श्री. महेश सुभाष महाजन** यांनी **श्री. संदीप सुभाष गायकवाड** यांचेकडून खरेदी दस्त क्र. बगल - ३८८७/२०२४, दि. २१/०८/२०२४ नुसार खरेदी केलेली असून सदर मिळकत ही आमचे अशिलाचे कब्जेवहिवाटीत आहे व सदरच्या मिळकतीबाबत आमचे अशिलास बँक ऑफ बडोदा, शाखा ताहाराबाद यांचेकडून कर्ज घेणेकरिता तारण देणे आहे. त्याकामी आमचे अशिल हे कागदपत्रे पूर्तता करून **दि.१२/१२/२०२४ रोजी दुपारी ३.०० वा.** सुमारास पायी जात असतांना आमचे अशिलाचे राहत्या घरापासून ते ताहाराबाद बस स्थानक परिसर या दरम्यान सदरचे कागदपत्रांबरोबरील खालील दस्त-

**श्री. संदीप सुभाष गायकवाड** यांनी **श्री. इंदरचंद ऊर्फ इश्वरचंद मिश्रीलाल कोटेचा** व **इतर** यांचेकडून वर उल्लेखित मिळकत खरेदी केलेबाबतचे खरेदीखताचा मुळ **दस्त क्र. बगल- १८१/२०२२, दि.१७/०१/२०२२** रोजीचा गहाळ झालेला असल्याने आमचे अशिलाने **दि.०९/०४/२०२५** रोजी जायखेडा पोलीस स्टेशन, जायखेडा यांचेकडे अर्ज देवून चौकशी कामी मागणी केली असता जायखेडा पोलीस स्टेशन यांनी चौकशी करून वरील दस्त मिळून न आलेबाबत त्यांना तसा दाखलाही दिलेला आहे व त्यांना सदरची मुळ प्रत दुय्यम निबंधक, बागलाण यांचेकडून पुन्हा मिळत नसल्याने व आमचे अशिलास म्हणजे **श्री. महेश सुभाष महाजन** यांना बँकेकडून कर्ज प्रकरणासाठी सदरचे खरेदीखताची मुळ प्रत आवश्यक असल्याने वरील मिळकतीचे खरेदीखताबाबत कोणाचा हक्क अधिकार व हितसंबंध असल्यास त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या लेखी कागदपत्रांनिशी नोटीस प्रसिद्धीपासून ७ दिवसांच्या आत खाली उल्लेखित कार्यालयात लेखी हरकत मुळ कागदपत्रानुसार घ्यावी. तशी हरकत न आल्यास आमचे अशिल बँकेच्या नियमाप्रमाणे वरील मिळकत तारण देतील. करिता जाहिर नोटीस असे.

**स्थळ : सटाणा**
**दिनांक :** १७/०४/२०२५ **श्री. महेश सुभाष महाजन**

**आमचे मार्फत प्रसिद्ध**

**श्री. शाम एस. मानकर (ॲडव्होकेट/नोटरी)**
**दिवाणी न्यायालयासमोर, सटाणा, ता. बागलाण ( नाशिक )**

---

**ग्रामपंचायत संसरी ता.जि नाशिक**

**जाहीर निविदा सूचना क्र. ०१/२०२५-२६**

शासन निर्णय क्र. निविदा -२०२१/प्र.क्र.७८/बांधकाम-४ (या शासन निर्णयानुसार)

ग्रामपंचायत संसरी ता. जि नाशिक होणाऱ्या कामासाठी लिफाफा बंद दरपत्रकद्वारे निविदा मागवत आहे. सदरच्या तांत्रिक लिफाफामध्ये जिल्हा परिषद नोंदणी, वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र व पॅन कार्ड सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे व तसेच आर्थिक लिफाफामध्ये दरपत्रक सादर करण्यात यावे. सदरचा लिफाफा २९/०४/२०२५ सकाळी ९.०० वा. पासून ते दिनांक ०६/०५/२०२५ सायंकाळी ५.०० वा. (सार्वजनिक सुट्टी सोडून) पर्यंतच ग्रामपंचायत कार्यालयात जमा करण्यात यावे व सदरचे लिफाफे दिनांक ०७/०५/२०२५ सकाळी ११.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात येथे उघडण्यात येतील, लिफाफे उघडण्यात येत असतांना कंत्राटदार स्वतः हजर असणे आवशयक आहे अन्यथा त्यानंतर सदरच्या निविदा संबधी तक्रार करता येणार. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत संसरी ता. जि नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे. व अंदाजपत्रके ग्रामपंचायत मध्ये बघण्यास मिळतील.

**कामाचे नाव** :-1) RECYCLATION WASTE COLLECTION SHED (SEGRETION SHED) AT GRAMPANCHAYAT SANSARI TAL DIST NASHIK EST. AMT. 3,68,774/- 2) COMPOST PIT AT GRAMPANCHAYAT SANSARI TAL DIST NASHIK EST. AMT. 1,10,038/-

**ग्रामपंचायत अधिकारी व प्रशासक**
**ग्रामपंचायत संसरी ता. जि नाशिक**

---

**ग्रामपंचायत कार्यालय मुंढेगाव तालुका इगतपुरी जि. नाशिक**

**जाहीर निविदा क्रं. ४/२०२५-२०२६**

मा.सरपंच ग्रामपंचायत कार्यालय मुंढेगाव तालुका इगतपुरी जि. नाशिक खालील कामाची निविदा ई टेंडरींग पद्धतीने मागवीत आहे. सदर निविदा मा. शासनाच्या http://mahatender.gov.in या संकेतस्थळावर २४/०४/२०२५ पासून ते ०३/०५/२०२५ पर्यंत डाउनलोड करता येईल. या निविदे संबंधीची सर्व माहिती व अटी / शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. ही निविदा फक्त इंटरनेट वरुनच खरेदी करता येईल. तसेच इंटरनेट वरुन भरता दाखल करता येईल सर्व मक्तेदार/पुरवठादार यांनी रजिस्ट्रेशन/रिनीवल करणे आवश्यक आहे

अ.न १. कामाचे नांव- CONSTRUCTING UNDERGROUND DARINAGE GUTTER FOR D UNDA DALVI HOME TO BHAGIRATH GATIR AT MUNDHEGAON TAL IGATPURI DIST NASHIK

**ग्रामविकास अधिकारी** **सरपंच**

---

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (परसेवा)**
**अहमदनगर जिल्हा पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन मर्या., अहिल्यानगर.**

**जाहीर समन्स**

**ज्योती सहकारी पतसंस्था कोपरगांव, ता. राहुरी जिल्हा-अहिल्यानगर**

| क्र. | कर्जदार/जामिनदाराचे नाव | अर्ज क्र. | दावा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | **कर्जदार** - मुसमाडे बाबासाहेब भिकाजी<br>**जामिनदार** -भोंगळ संदीप विठ्ठल, **जामिनदार** - डावखर नानासाहेब अशोक,<br>**जामिनदार** -भोंगळ पल्लवी संदीप | २९ | ७,७१११७९ |
| २ | **कर्जदार** -जाधव अशोक बजरंग सहमुळ चव्हाण गोरक्षनाथ नाथू<br>**जामिनदार**-धनवट राजेंद्र मारुती, **जामिनदार** - गाडे लक्ष्मण सखाराम<br>**जामिनदार** -जाधव प्रियांका, अशोक, **जामिनदार** - जाधव सचिन बजरंग | २७ | ८,२४, ६१३ |
| ३ | **कर्जदार** - शिंदे राजस सुनिल<br>**जामिनदार**- शिंदे सुजस संजय, **जामिनदार** - शिंदे सिताबाई रामभाऊ<br>**जामिनदार** - पवार हिरामण उत्तम, **जामिनदार** -शिंदे नंदकुमार रामभाऊ<br>**जामिनदार** -शिंदे सुनिल रामभाऊ, **जामिनदार** -शिंदे स्नेहा संजय<br>**जामिनदार** - शिंदे संदीप रामभाऊ | २८ | ६१,१९२५१ |

सदर दाखल्यांचे कामी अर्जदार यांनी सादर केलेल्या अर्जातील प्रतीवादींना रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहे. परंतु वरील प्रतिवादी यांना समन्स रुजू न झाल्याने त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे व प्रथम सुनावणीस उपस्थित न राहिल्याने सदरचे जाहीर समन्स देत आहोत. उपनिर्दीष्ठ अर्जासंबधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने दि.०७/०५/२०२५ रोजी सकाळी/दुपारी ०१.०० वाजता दाव्या संबधी कागदपत्रासह आपण सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (परसेवा) अ.नगर. अहमदनगर जिल्हा पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन मर्यादित अहमदनगर. यांचे कार्यालय दुसरा मजला, व्यापारी संकुल, महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, ता. जिल्हा - अ.नगर.४१४ ००१ या कार्यालयात उपस्थित रहावे. या नोटीसीव्दारे वरील प्रतिवादींना असे कळविण्यात येते की वरील तारखेस आपण सुनावणीस वेळेवर हजर न राहील्यास आपल्या गैरहजेरीत आपल्या अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व अर्जदार संस्थेने मागणी केल्याप्रमाणे वसुली दाखला अर्जदारसंस्थेस देण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपुर्ण पत्ता कळविण्यांस कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल म्हणून आज दि. १६/०४/२०२५ रोजी माझी सही कार्यालयीन मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहेत.

**स्थळ - अ.नगर दिनांक २८/०४/२०२५** **(देविदास घोडेचोर)**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (परसेवा)**
**अहमदनगर जिल्हा पतसंस्थाचे सहकारी**
**फेडरेशन मर्या., अहिल्यानगर.**

---

**ग्रामपंचायत देवगाव ता.त्र्यंबकेश्वर जि नाशिक**

**जाहीर निविदा सूचना क्र. ०१/२०२५-२६**

शासन निर्णय क्र. निविदा -२०२१/प्र.क्र.७८/बांधकाम-४ (या शासन निर्णयानुसार)

देवगाव ता.त्र्यंबकेश्वर जि नाशिक होणाऱ्या कामासाठी लिफाफा बंद दरपत्रकद्वारे निविदा मागवत आहे. सदरच्या तांत्रिक लिफाफा मध्ये जिल्हा परिषद नोंदणी, वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र व पॅन कार्ड सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे व तसेच आर्थिक लिफाफा मध्ये दर पत्रक सादर करण्यात यावे. सदरचा लिफाफा २९/०४/२०२५ सकाळी ९.०० वा. पासून ते दिनांक ०६/०५/२०२५ सायंकाळी ५.०० वा. (सार्वजनिक सुट्टी सोडून) पर्यंतच ग्रामपंचायत कार्यालयात जमा करण्यात यावे व सदरचे लिफाफे दिनांक ०७/०५/२०२५ सकाळी ११.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात येथे उघडण्यात येतील, लिफाफे उघडण्यात येत असतांना कंत्राटदार स्वतः हजर असणे आवशयक आहे अन्यथा त्या नंतर सदरच्या निविदासंबधी तक्रार करता येणार. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत देवगाव ता.त्र्यंबकेश्वर जि नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे. व अंदाजपत्रके ग्रामपंचायत मध्ये बघण्यास मिळतील.

कामाचे नाव :-1) Providing And Fixing Paver Block At Humbhyachimet Grampanchayat Devgaon Tal Trimbakeshwar Dist. Nashik Est. Amt.153370.

**ग्रामपंचायत अधिकारी** **व प्रशासक**
**देवगाव ता.त्र्यंबकेश्वर, जि नाशिक**

---

**वारस नोटीस**

**श्रीमती जमुनाबाई पुंडलिक भोये, रा. बोरीचीबारी, ता. पेठ यांचे पती कै. पुंडलिक आनंदा भोये हे दि. ०२/०२/२०२५ रोजी मयत झाले आहेत. मयत व्यक्तीच्या वारसांना शासनाकडुन देय रकमा मिळणेकामी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी या कार्यालयाकडे अर्ज सादर केला असुन त्यात खालील प्रमाणे वारस असल्याचे दर्शविलेले आहे.**

| अ.क्र. | वारसाचे नाव | वय | नाते |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती. जमुनाबाई पुंडलिक भोये | ८० | पत्नी |
| २ | श्री. मधुकर पुंडलिक भोये | ५७ | मुलगा |
| ३ | श्री. मोहन पुंडलिक भोये | ५२ | मुलगा |
| ४ | सौ. नंदाबाई जयराम राऊत | ५० | मुलगी |
| ५ | सौ. लता मनोहर पाडवी | ४५ | मुलगी |
| ६ | सौ. ताराबाई त्र्यंबक नाठे | ४४ | मुलगी |

**या जाहिर नोटीसद्वारे सुचित करण्यात येते की, वरील वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्रास कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रासह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहिर नोटीस प्रसिध्दीच्या तारखेपासुन ०७ (सात) दिवसांचे आत तहसिल कार्यालय पेठ येथे सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास सबंधितास वारस प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

**दिनांक २९/०४/२०२५**

**तहसिलदार, पेठ**

---

**गांवकरी Classified** जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

**पाहिजेत**

राणेनगर येथील टू व्हीलर व फोर व्हीलर शोरूमसाठी CRM/ DBM रिसेप्शनिस्ट, मेकॅनिक, सर्विस ॲडव्हायझर, स्पेअर पार्ट मॅनेजर, टेलीकॉलर, हाऊस कीपिंग, ऑफिस बॉय, वॉशिंग बॉय, अकाउंटंट त्वरित पाहिजेत. **संपर्क : ९२७२०९१४२५**

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे.श्री गिफ्ट ॲण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक. **संपर्क- ९८९००१३१३६**

गंगापूररोड, पाईपलाईनरोडयेथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे. ८२३७३११२११

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

**पाहिजेत**

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त कंपनीसाठी,आडगाव विंचूर गवळी शिवार नाशिक येथे कायमस्वरूपी कामासाठी फील्ड ऑफिसर पाहिजे. शिक्षण किमान १० वी पास, वय २१ ते ६५. **संपर्क ९२२०२४२५५५**

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे. **संपर्क-९८६०१३६५३६**

**महिला व पुरूष पाहिजेत**

Draftsman part time आटोक्याड नॉलेज-१, ऑफिस कामासाठी-४, कोर्ट व महापालिकेच्या कामासाठी-२, ड्रायव्हर-१, वकील पार्ट टाइम-१, अकाऊंटंट पार्ट टाइम-१, भटजी देवपूजा करण्यासाठी-१ **एन.एन. असोसिएटस्**, तिसरा मजला, आय. डी.बी.आय. बँकेच्यावर, साठे बाग, एम.जी.रोड, नाशिक. वेळ- सकाळी १२ ते ५. संपर्क- 8668862801

**नावात बदल**

माझे लग्नापूर्वीचे नाव सुनंदा शिवाजी आगळे असे होते. आता लग्नानतर माझे नवीन नाव **सुजाता किशोर घोटेकर** असे झाले आहे. वरील दोन्ही नावाच्या व्यक्ती एकच आहे. प्रतिज्ञापत्र दिनांक २६/०४/२०२५ नुसार

**विकणे आहे**

शरदचंद्र पवार फ्रुट मार्केट यार्डच्यामागे, विबगोर शाळा रोड, नाशिक येथील 2BHK फर्निचरनी सुसज्ज फ्लॅट त्वरित विकणे आहे.
**संपर्क- ७२०८४९८५२३**

पाथर्डी फाटा, ज्ञानेश्वरनगर, साईसंकल्प बिल्डींग फ्लॅट विकणे आहे. पहिला मजला **संपर्क: ९९७००३९०४६**

**जाहिरात छोटी किमया मोठी!**

---

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस सदर नोटीसीने कळविण्यात येते की, **श्री. नितीन भास्कर गायकवाड** (यापुढे त्यांचा उल्लेख कर्जदार असा केला आहे.) यांनी आमचे अशिल ॲक्सीस बँक लि., शाखा येवला यांचेकडे कर्जाची मागणी केली आहे. तरी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, **दि. १५/०४/२०११** रोजी **श्री. रामराव गंगाधर शिंदे** यांनी परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे खरेदीखत **श्री. तिलोकचंद गणेशलाल पांडे** यांच्या लाभांत दुय्यम निबंधक, येवला येथे **खरेदीखत दस्त क्र. यलअ/१६३०/२०११** नोंदविलेले आहे. सदरचे खरेदीखत दस्त, सूची क्र. २ व आर आर पावतीसह हे **श्री. नितीन भास्कर गायकवाड** यांचेकडून **मौजे अंगणगाव, ता. येवला, जि. नाशिक** येथून गहाळ झालेले आहे. तसेच परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत अथवा सदर मिळकतीच्या कोणत्याही हिस्स्या विरुध्द अथवा बाबत कोणाचाही खरेदीखत, साठेखत, आदला-बदल, तारण, गहाण, एक्टिबल किंवा नोंदणीकृत गहाणखत, भेट, दान, ट्रस्ट, वारस, कौंटुबिक व्यवस्था, पोटगी, इच्छापत्र, भागीदारी, ताबा, लीज, लायसेन्स, लीन, बोजा, प्लेज, भाडेपट्टा, पोट भाडेपट्टा, कुळ, इझमेंट, वहिवाट वगैरे अथवा अन्य कोणत्याही प्रकारे कसलाही हक्क, अधिकार, हित-संबंध वगैरे दावा असल्यास संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ०७ दिवसांच्या आत म्हणजेच **दि. ०५/०५/२०२५** रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत आम्हास खाली दिलेल्या पत्त्यावर आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यांसह कळवावे. संबंधितांनी तसे न केल्यास त्यांची या संदर्भात कोणतीही हरकत/म्हणणे नसून त्यांनी त्यांचा सदर मिळकती मधील हक्क, अधिकार, हित संबंध वगैरे दावा स्वतःहून सोडून दिला असल्याचे समजण्यात येईल आणि आमचे अशिल सदर मिळकत तारण, गहाण घेउन कर्जदार यांना कर्जाची रक्कम वितरीत करतील. हि जाहीर नोटीस.

परिशिष्ट - जिल्हा नाशिक, तालुका येवला पैकी मौजे येवला येथील येवला नगरपरिषद हद्दीतील मिळकत, **स. नं. १०७/ब/२, प्लॉट नं. १, क्षेत्र २३६.५० चौ. मी.** यांसी चतुःसीमा गावनकाशाप्रमाणे.

दि. २९/०४/२०२५

**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

**ॲड. शुभम बाळासाहेब मंडलिक**
**एल. एल. एम.**
**ऑफीस नं. ७, पहिला मजला, साईराम अपार्टमेंट, आसरा लॉन्स शेजारी, तहसील जवळ, येवला, ता. येवला, जि. नाशिक, मो. नं. - ७०८३७०३३५२**

---

**ग्रुप ग्रामपंचायत माळेगांव, ता.सिन्नर जि.नाशिक**

**जाहीर बी-१ निविदा सूचना क्र. २ सन २०२५/२०२६ (प्रथम प्रसारण)**

मा. सरपंच ग्रामपंचायत माळेगाव ता.सिन्नर जि.नाशिक हे खालील कामांच्या बी- १ पध्दतीने मोहर बंद पध्दतीने वर्ग ५ अ व वरील नोंदणीकृत ठेकेदाराकडून मागवित आहेत. निविदा **दि. २८/०४/२०२५ ते ०४/०५/२०२५** रोजी **दुपारी ५:०० वाजेपर्यंत** ग्रामपंचायत कार्यालयात सुट्टीचे दिवस वगळून स्विकारण्यात येतील.

| अ नं. | कामाचे नाव | निविदा रक्कम | बयाणा रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम (देयकातून कपात) | निविदा विक्री किंमत ५०० + जीएसटी | निविदा विक्री व स्विकृतीचा दिनांक | काम पूर्ण करण्याची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मापारवाडी येथे वसंत गाडे ते नाला रस्ता मजबुतीकरणकरणे, भाग-२ | ४९९९२६/- | ५०००/- | २.५% | ५९०/- | दि.२८.०४.२०२५ ते दि.०५.०५.२०२५ सकाळी ११.०० वाजेपर्यंत | ६ महिने |

**टिप :-** १) समकक्ष सरकारी कामे केल्याचे अनुभवाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. २) सशर्त निविदा स्विकारले जाणार नाही. मात्र ज्या ठेकेदारांची निविदा स्विकारली जाईल त्यांना मजिप्राचे सर्व अटी नियम बंधनकारक राहतील ३) जीएसटी सर्टीफिकेट, पॅनकार्ड ३ वर्षाचे रिटर्न्स जोडणे आवश्यक. ४) मोहरबंद निविदा दि. २८/०४/२०२५ ते ०५/०५/२०२५ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय, माळेगाव ता.सिन्नर जि.नाशिक येथे स्विकारले जातील. ५) मोहरबंद निविदा दि.०६/०५/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामपंचायत सदस्य, ठेकेदार, किंवा त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष मा. सरपंच यांच्या परवानगीने उघडले जातील. ६) सिलबंद लखोट्यावर कामाचे नांव, मक्तेदाराचे नांव लिहीणे आवश्यक. ७) कोणतेही कारण न देता निविदा स्विकारण्याचा/नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायत माळेगाव यांनी राखुन ठेवला आहे.

**सरपंच** **ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत माळेगांव/मापरवाडी, ता. सिन्नर, जि. नाशिक**

## महत्त्वाचे

### नेचर क्लब ऑफ नाशिकच्या बर्ड सर्वे मध्ये दिसला 'चायनीज पोंड हेरॉन'

**नाशिक**- नेचर क्लब ऑफ नाशिक तर्फे महाराष्टातील पहिल्या रामसर दर्जा मिळालेल्या नांदूरमध्यमेश्वर वन्यजीव अभयारण्यामध्ये प्रथमच उन्हाळ्यामध्ये पक्ष्यांच्या परतीच्या स्थलांतरित मार्गावर बर्ड सर्वे चे आयोजन केले होते. यावेळी नाशिकमधील चाळीस पक्षी मित्रांनी सहभाग घेतला होता. 'चायनीज पॉड हेरॉन' या पक्ष्याचे महाराष्ट्रात प्रथमच दर्शन झाले आहे. हा पक्षी साधारणपणे ४७ सेमी (१९ इंच) लांब असतो, त्याचे पंख पांढरे असतात, टोक काळे असते, डोळे आणि पाय पिवळे असतात. प्रजनन काळात त्याचा एकूण रंग लाल, निळा आणि पांढरा असतो आणि इतर वेळी राखाडी-तपकिरी असतो आणि त्यावर पांढऱ्या रंगाचे ठिपके असतात. हा पक्षी चीन आणि लगतच्या समशीतोष्ण आणि उपोष्णकटिबंधीय पूर्व आशियातील उथळ गोड्या आणि खाऱ्या पाण्याच्या पाणथळ जागांमध्ये आणि तलावांमध्ये आढळतो. मूलतः हा सखल प्रदेशातील पक्षी आहे, त्याची व्याप्ती उत्तरेकडील उपआर्क्टिक प्रदेशांद्वारे आणि पश्चिम आणि दक्षिणेकडील पर्वतरांगांद्वारे मर्यादित केली जाते. बंगलामध्ये झालेल्या वादळी पावसामुळे भरकटल्याची शक्यता पक्षीमित्रांकडून व्यक्त केली जात आहे. रविवारी सकाळी पक्षी अभयारण्यात सात ते दहा वाजेपर्यंत नेचर ट्रेल घेत बर्ड सर्वे घेण्यात आला. यावेळी पक्षी अभयारण्यात दहा हजार पक्ष्यांची नोंद करण्यात आली. या उपक्रमात संस्थेचे अध्यक्ष प्रा. आनंद बोरा, थायलंडमधून आलेल्या पो मॅम, प्रभारी वनपाल संदीप काळे, वनरक्षक आशा वानखेडे, डॉ. अनिल माळी, दर्शन घुगे, रवींद्र वामनाचार्य, डॉ. जयंत फुलकर, नितेश पिंगळे, भीमराव राजोळे, अमोल दराडे, अमोल डोंगरे, नितेश पिंगळे, शंकर लोखंडे, गंगाधर आघाव, विकास गारे, प्रमोद दराडे, रोहित मोगल, किरण बेलेकर, गणेश वाघ,केशव नाईकवाडे, मंजुषा पत्की, मिलिंद पत्की, अनंत सरोदे, उमेशकुमार नगरे, कीर्ती मारू, मनोज वाघमारे, नुरी मर्चंट, नितीन कोकणे, संदीप सोनवणे, राजू ठाकरे, ओमकार भावनाथ, नेहा कडलग, सुनील जाधव, प्रमोद मोगल आदींसह पक्षिमित्र, गाईड सहभागी झाले होते.

### रमेशचंद्र घुगे भाजपाच्या वाटेवर

**कसबे सुकेणे :** सहकार महर्षी त्रंबकराव घुगे यांचे पुत्र तथा नाशिक जिल्ह्यात सहकार नेते म्हणून आपली ओळख निर्माण करणारे नाशिक जिल्हा कांदा बटाटा संघाचे विद्यमान अध्यक्ष रमेशचंद्र घुगे यांचा लवकरच भाजपमध्ये प्रवेश होणार असल्याची माहिती भाजप ग्रामीण जिल्हाध्यक्ष शंकरराव वाघ यांनी दिली. भारतीय जनता पक्ष प्रदेशाध्यक्ष तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भारतीय जनता पक्ष प्रभारी रवींद्र चव्हाण, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, सरचिटणीस तथा आमदार विक्रम पाटील, विभागीय संघटनमंत्री रवींद्र अनासपुरे, आमदार डॉ. राहुल आहेर, माजी मंत्री डॉ. भारतीताई पवार आदी मान्यवरांच्या उपस्थितीत मुंबई प्रदेश कार्यालयात रमेशचंद्र घुगे यांच्या ५०० समर्थकांसह हा भाजप प्रवेश होणार असल्याचे शंकरराव वाघ यांनी सांगितले. सहकार क्षेत्रात सहकार महर्षी त्र्यबकराव घुगे भाग्यश्री सहकारी पतसंस्था, निफाड तालुका शेतीमाल खरेदी विक्री व प्रक्रिया सहकारी संस्था, निफाड खादी ग्रामोद्योग संघ, ज्ञानदीप शिक्षण संस्था, नाशिक जिल्हा कांदा बटाटा संघ, नासिक जिल्हा पतसंस्था फेडरेशन संघ अशा सहकार क्षेत्रातील विविध ठिकाणी कार्यरत असलेल्या घुगे यांच्या प्रवेशामुळे निफाड तालुक्यात व नाशिक जिल्ह्यात सहकार व कृषी क्षेत्रात भाजप पक्षाला फायदा होऊन बळ मिळणार आहे.

### विंचूरच्या मुस्लिम समाजाकडून निषेध

**विंचूर प्रतिनिधी:** काश्मीर मधील पहलगाम येथे पाकिस्तानी अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ निरापराध भारतीयांची अमानुष हत्या केली.या निंदनीय घटनेचा येथील मुस्लिम समाज बांधवांकडून निषेध करण्यात आला. निरापराध भारतीयांचा बळी घेणाऱ्या पाकिस्तानी अतिरेक्यांना कठोर शासन व्हावे. अशा आशयाचे निवेदन लासलगाव पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक भास्कर शिंदे यांना देण्यात आले.यावेळी कैलास सोनवणे,सोहेल मोमीन, फिरोज मोमीन, पत्रकार डी बी काद्री, मौलाना गुलाम नबी आदींनी मनोगतातून अतिरेक्यांचे आश्रयस्थान बनलेल्या पाकिस्तानला जशास तसे उत्तर द्यावे.हल्लेखोर अतिरेक्यांना कठोर शासन व्हावे. असे उद्गार काढले. व हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या भारतीयांना श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी सरपंच सचिन दरेकर, कैलास सोनवणे, मौलाना गुलाम नबी,पत्रकार डी बी काद्री, अनिल विंचूरकर, निलेश दरेकर, अनिल सांगळे, सद्दाम शेख,रियाज मोमीन, वसीम पठाण, रशीद पठाण,मजहरुल पठाण, इम्रान मोमीन,नईम पठाण, इम्रान काद्री, अकील शेख अमजद शेख, आदी उपस्थित होते.

# कर सवलत योजनेत ३५ कोटींचा भरणा

## आठ टक्के सुटसाठी अखेरचे दोन दिवस

**नाशिक : प्रतिनिधी**

महापालिकेने दरवर्षीप्रमाणे यंदाही नियमित करदात्यांसाठी एप्रिल ते जून अशी तीन महिन्यांसाठी सवलत योजना लागू केली आहे. त्यात एप्रिल महिन्यात मालमत्ता कर अदा केल्यास मुळ देयक रक्कमेवर आठ टक्के सूट दिली जात आहे. १ ते २८ एप्रिल पर्यत ३५ कोटी ११ लाखाचा भरणा करदात्यांनी भरला आहे. एप्रिलमध्ये आठ टक्के सुट घेण्यासाठी शेवटचे दोन दिवस उरले आहेत.

महापालिका करसंकलन विभागाला सवलत योजना पावली असून १ लाख १० हजार करदात्यांनी एप्रिलमध्ये तब्बल ३५ कोटीचा भरणा केला आहे. ३० एप्रिलपर्यंत एकूण देयक रक्कमेवर आठ टक्के व ऑनलाईन भरणा केल्यास दहा टक्के सूट मिळत आहे. त्यामुळे करदात्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन महापालिकेच्या करसंकलन विभागाने केले आहे. एप्रिलनंतर मे महिन्यात सहा व जून महिन्यात तीन टक्के सूट दिली जाणार आहे. गतवेळी सवलत योजना मनपाला पावली होती. तीन महिन्यात तब्बल १२० कोटींचा भरणा नागरिकांनी करत आर्थिक सुट पदरात पाडली.

यंदाही सवलत योजनेचा प्रारंभ दणक्यात झाला असून एप्रिलमध्ये कर भरणा चाळीस कोटीपर्यत जाण्याची शक्यता आहे. नागरिकांचा उत्सफूर्त प्रतिसाद पाहता गतवर्षीचे रेकॉर्ड ब्रेक मालमत्ता कर वसूल होण्याची चिन्हे आहेत.

**विभागनिहाय करसंकलन**

| | | |
|---|---|---|
| पंचवटी | – | ६ कोटी ३९ लाख ४४ हजार |
| नवीन नाशिक | – | ६ कोटी ७१ लाख |
| नाशिकरोड | – | ४ कोटी ४० लाख |
| सातपूर | – | ३ कोटी ५१ लाख २८ हजार |
| ना.पश्चिम | – | ८ कोटी ९९ लाख |
| ना.पूर्व | – | ५ कोटी ८८ लाख ६७ हजार |

मनपा प्रशासनाने नियमित करदात्यांसाठी सवलत योजना राबवली आहे. नागरिकांनी कर अदा करुन योजनेचा लाभ घ्यावा.

**–अजित निकत, उपायुक्त करसंकलन विभाग मनपा**

### तरुणाचा शेजाऱ्यांवर जीवघेणा हल्ला

**भिवंडी :** वहिनीच्या भावाच्या मुलीला त्रास देणाऱ्या शेजारील तरुणाला तिच्या नात्यातील दोन भावांनी समज दिली. या रागातून तरुणाने एका भावाला लाकडी दांडक्याने बेदम मारहाण करून ठार मारण्याचा प्रयत्न केला. तसेच मुलीच्या मामाच्या मुलीलाही दांडक्याने मारून जखमी केले. याप्रकरणी तरुणाविरोधात निजामपुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असून, घटनेनंतर तो पसार झाला आहे. दानिश इस्तियाक अन्सारी (वय २०) असे संशयित आरोपीचे नाव असून, रियाज अब्दुल सत्तार शेख (४५) आणि रीफा मुक्तार शेख अशी जखमींची नावे आहेत..मुख्तार अब्दुल सत्तार शेख हे कसाईवाड्यातील कुरेशीनगरमधील तन्जील इमारतीत राहतात. संशयित आरोपी दानिशही याच इमारतीत राहतो. दानिश हा मुख्तारच्या वहिनीच्या भावाच्या मुलीला त्रास देत होता. त्यामुळे दानिशला मुख्तारचे भाऊ रियाज शेख आणि आसिफ करीम कुरेशी यांनी समज दिली होती.

# पेटता दिवा अंगावर पडून विवाहितेचा होरपळून मृत्यू

**शहापूर : प्रतिनिधी**

देव घरातील जळता दिवा अंगावर पडल्यानं विवाहितेचा मृत्यू झाल्यानं मोठी खळबळ उडाली आहे. ही घटना पिसावली इथं घडली आहे.घरात देवपूजा करताना देवघरातील पेटती दिव्याची वात अंगावर पडून ४८ वर्षीय विवाहिता गंभीर होरपळल्यानं मोठी खळबळ उडाली.

या विहाहितेचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. देव पूजा जीवावर बेतल्याची घटना डोंबिवली पूर्वेतील पिसावली गावातील एका इमारतीत घडली आहे. याप्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. अर्चना धर्मेद्र कुमार (वय ४८) असे मृत्यू झालेल्या विवाहितेचं नाव आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार धर्मेद्र रवींद्रप्रसाद कुमार ( वय ५२) हे पत्नी अर्चना आणि मुलासह डोंबविली पूर्वेतील पिसावली गावातील साई सिद्धी अपार्टमेंटमध्ये राहतात. त्यातच त्यांची पत्नी अर्चना ही २६ एप्रिल रोजी राहत्या घरातील देवघरात पूजा करत होती. त्यावेळी पूजा संपल्यावर त्यांनी देवघरात आणि इतर ठिकणी पेटते दिवे लावले. त्यापैकी एका दिव्याची पेटती वात त्यांच्या अंगावरील कपड्यावर पडली. अचानक आग लागल्यानं तसेच अंगावरील (नाईटी पॅण्ट) कपडे टेरीकॉटची असल्यानं क्षणातच अंगावरील कपड्यांना पेट घेतला. या दुर्घटनेत गंभीर होरपळल्यानं घरानजीकच्या एका खासगी रुग्णालयात उपचारसाठी दाखल केले. मात्र प्रकृती अधिकच खालावल्यानं त्यांना डोंबिवलीच्या एम्स रुग्णालयात दाखल केले. मात्र त्यांचा २७ एप्रिल रोजी उपचारदरम्यान मृत्यू झाला.या घटनेची माहिती मानपाडा पोलिसांना कळताच पोलिसांनी रुग्णालयात आणि घाटनस्थळी पंचनामा केला. मृत महिलेचे पती धर्मेद्र कुमार यांच्या तक्रारीवरून दुर्दैवी घटनेची नोंद करून पोलिसांनी तपास सुरू केल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय काबदने यांनी दिली. या घटनेचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश बंडगर करीत आहेत. तर दुसरीकडे या घटनेमुळं परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# जिल्हा पिंच्याक सिल्याट चॅम्पियनशिप २०२५ उत्साहात

**नाशिक प्रतिनिधी :**

सहावी नाशिक जिल्हा पिंच्याक सिल्याट चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धा दिनांक २७ एप्रिल २०२५ रोजी अंबड येथील ठाकरे गार्डन, दत्तनगर येथे मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करण्यात आले.

उद्घाटन प्रसंगी संगीता रोडे स्पर्धा अध्यक्ष मुकेश छडीदार, स्पर्धा उपाध्यक्ष व आदर्श कॉम्प्युटरचे संस्थापक दीपक पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे विधिवत उद्घाटन झाले.स्पर्धेत एकूण १०० खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. बक्षीस समारंभात प्रमुख मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पदके प्रदान करण्यात आली.

या स्पर्धेत ठाकरे गार्डन संघाने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले, तर द्वितीय क्रमांक ओम मोरे यांच्या संघाने आणि तृतीय क्रमांक कीर्ती पाटील यांच्या संघाने मिळवला. विजेत्या खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

स्पर्धेसाठी इंडियन पिंच्याक सिल्याट फ ेडरेशनचे अध्यक्ष किशोर येवले तसेच महाराष्ट्र राज्य डायरेक्टर तृप्ती बनसोडे यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. नाशिक सिटीचे सचिव नागेश बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडली. पंच म्हणून रुपाली वाघ, ओम मोरे, प्रताप वाघ व गौरव वाघ यांनी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनात मोलाचे योगदान दिले.

# पुरुष गटात नाशिक, महिला गटात सांगली संघ विजयी




**नाशिक प्रतिनिधी :**

टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र आणि नाशिक जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य टेनिस क्रिकेट स्पर्धा आणि निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धा म्हसरूळ येथील एम्. एम्. सी क्रीडांगण म्हसरूळ, नाशिक येथे पार पडली.

स्पर्धेत पुरुष विभागात ११ संघ सहभागी झाले होते. तर महिला गटात ४ संघ सहभागी झाले होते. स्पर्धेचे उदघाटन टेनिस क्रिकेट असोसिएशन ऑफ इंडिया व टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र सचिव सौ. मिनाक्षी गीरी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्रचे उपाध्यक्षविलास गीरी टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र महिला अध्यक्षा कुमारी धनश्री गिरी तसेच मुंबई उपनगर जिल्हा सचिव संदीप पाटील, सांगली जिल्हा सचिव विजय बिराजदार, रायगड जिल्हा सचिव स्वप्नील, नाशिक जिल्हा सचिव विलास गायकवाड आणि पंच मंडळ उपस्थित होते.

सदर स्पर्धा प्रथम साखळी आणि नंतर बाद पद्धतीने पार पडली. उंपात्य फेरीत नाशिक शहर संघाने नाशिक ग्रामीण संघावर मात करत अंतिम फेरीत प्रवेश केला. दुसऱ्या उंपात्य फेरीत जालना जिल्हा संघानी हिंगोली जिल्हा संघावर मात करत अंतिम फेरीत प्रवेश केला.

नाशिक शहर आणि जालना यांच्यात खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात नाशिक शहर संघाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळ करून जालना जिल्हा संघावर मोठा विजय मिळवत या स्पर्धेचे विजेतेपद प्राप्त केले. महिला गटात सांगली जिल्हा संघाने रायगड जिल्हा संघाचा पराभव करून अंतिम विजेतेपद प्राप्त केले. या स्पर्धेतील कामगिरीच्या आधारे जालना जिल्हा संघाचे अमोल माही याने अष्टपैलू खेळाचे प्रदर्शन करत फलंदाजी आणि गोलंदाजीमध्ये आपली छाप सोडली. तर नाशिक शहर संघाचा खेळाडू गणेश यानेही सुंदर खेळ केला.

या खेळाडूंच्या कामगिरीची दखल घेऊन त्यांना या स्पर्धेचे उत्कृष्ट खेकडू म्हणून गौरवण्यात आले. महिला गटात साक्षी गणे हीने फलंदाजीमध्ये तर अमूल्या हीने गोलंदाजीमध्ये चांगली कामगिरी नोंदवली. यांनाही महिला गटामध्ये उत्कृष्ट खेलाडू म्हणून गौरवण्यात आले. या स्पर्धेत विजय उमरे. लखन देशमुख, सोमा बिरादार, दर्शन थोरात, प्रथमेश नानजकर, महेंद्र देशमुख, मानस पाटील, धनश्री गिरी, साक्षी गणे, रूतुजा तोरडमल, रोहिणी सकटे, धनंजय लोखंडे, सुनील मोर्य यांनी पंच म्हणून काम पार पाडले. स्पर्धेचा बक्षीस समारंभ टेनिस क्रिकेट असोसिएशन ऑफ इंडिया तथा टेनिस क्रिकेट असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या सचिव सौ. मिनाक्षी गीरी यांच्या हस्ते पार पडला. यावेळी विलास गीरी, कुमारी धनश्री गिरी, संदीप पाटील, विजय बिराजदार, सिद्धेश गुरव, कुणाल हळदणकर, संदीप शिंदे, स्वप्नील, विलास गायकवाड होते. नाशिक जिल्हा सचिव विलास गायकवाड यांनी सर्व मान्यवरांचे, सर्व संघाचे खेळाडू आणि उपस्थिताचे आभार मानले.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
तालुकाः राहाता, जिल्हाः अहिल्यानगर (म.रा.)-४२३१०९.
दूरध्वनी क्रमांकः (०२४२३) २५८८९९, २५८९४६
E mail: watersupply@sai.org.in, Website: https://sai.org.in

**सांडपाणी प्रक्रिया संयंत्र (STP) उभारणीकरीता ई-निविदा मागणी सूचना**

श्री साईबाबा संस्थानचे शिर्डी, ता. राहाता, जि. अहिल्यानगर येथील द्वारावती भक्तनिवास व साईबाबा भक्तनिवासस्थान (**500** खोल्या) या ठिकाणी अनुक्रमे **200KLD** व **300 KLD** क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया संयंत्र **(STP)** उभारणीकरीता संकल्पन, अभियांत्रिकी, पुरवठा, उभारणी, चाचणी, समाधानकारकरित्या वापर सुरु करणे व एक वर्षाकरीता त्याची दुरुस्ती व देखभाल **(Operation & Maintenance)** करणे या कामासाठी किमान विहीत पात्रताधारक ठेकेदारांकडून ई-निविदा मागविणेत येत आहेत. याबाबत अधिक माहितीकरीता कृपया संस्थानचे https://sai.org.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत आलेली सविस्तर निविदा सूचना पाहावी.

तरी इच्छूक ठेकेदारांनी निविदा प्रपत्र डाऊनलोड करणे व सादर करणेसाठी शासनाचे **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळाला भेट द्यावी. ई-निविदा प्रपत्र डाऊनलोड करणेची सुरुवात **दि. २९/०४/२०२५** रोजी **स. ११:०० वा.** पासून करता येणार असून, ई-निविदा सादर करणेची अंतिम मुदत **दि. १३/०५/२०२५** रोजी **सायं. ०५:०० वा.** पर्यंत आहे.

**गोरक्ष गाडीलकर, (भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
आरओसी-2025-26/क्र-5/C४०१

**नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
गृहनिर्माण भवन, गडकरी चौक, नाशिक
फोन क्र. ०२५३-२२२९२०१ ते २२२९२६०

**जनता दरबार**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणा मार्फत नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळा अंतर्गत नाशिक जिल्ह्यातील गाळेधारक/भूखंडधारक/ सदनिकाधारक यांना जाहीर आवाहन करण्यात येते की, गाळे/भूखंड/ सदनिकाबाबत काही समस्या व अडी-अडचणींबाबतचे म्हणणे मांडण्यासाठी माननीय मुख्य अधिकारी/सक्षम प्राधिकारी यांच्या दालनामध्ये **दिनांक ०५/०५/२०२५** रोजी **सकाळी ११.०० वाजता** नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ गृहनिर्माण भवन, गडकरी चौक, नाशिक- ०२ येथे "**तिसरा जनता दरबार**" ठेवण्यात आलेला आहे.

करिता आपले लेखी निवेदन/अर्ज **दिनांक** ०५/०५/२०२५ रोजी सादर करण्यात यावे. तसेच **comhadansk@gmail.com** या ई-मेलवर व **meet.google.com/mia-odnw-vum** सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. कृपया अर्जदारांनी/गाळेधारकांनी याची नोंद घेण्यात यावी.

**स्वाक्षरीत /-**
**(शिवकुमार आवळकंठे)**
**मुख्य अधिकारी**
**नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**नाशिक**

# सोमानी गार्डन नाशिककरांचे नवे पर्यटनस्थळ

**नाशिकरोड : प्रतिनिधी**



परिसरातील मुक्तिधामच्या शेजारी नव्याने विकसित करण्यात आलेल्या सोमानी गार्डन पाहण्यासाठी दिवसेंदिवस येथे पर्यटकांची व स्थानिकांची मोठी गर्दी होत आहे. गार्डनमधील स्वच्छता, आकर्षक रचना आणि संगीत कारंज्यामुळे हे ठिकाण नाशिककरांच्या नव्या आवडत्या स्थळांपैकी एक ठरत आहे.

गार्डनमधील मुख्य आकर्षण ठरत आहे संगीत कारंजा. रंगीत रोषणाईच्या प्रकाशात, संगीताच्या तालावर नृत्य करणारे पाण्याचे फवारे पाहण्यासाठी सायंकाळी पर्यटकांची विशेष गर्दी होत आहे. नाशिक रोड परिसरातील नागरिकांसह दूरदूरच्या भागातूनही लोक येथे गर्दी करताना दिसत आहेत. सध्या उन्हाळ्याच्या सुट्टीमुळे गार्डनमध्ये लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्व वयोगटातील नागरिकांची वर्दळ वाढली आहे. प्रशासनाने स्वच्छता आणि सौंदर्य टिकवण्याबरोबरच पर्यटकांच्या सुरक्षिततेकडेही लक्ष देण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

सर्वसाधारणपणे सोमानी गार्डन हे ठिकाण स्वच्छता, आकर्षक रचना व नवीनतेचा अनुभव देणारे ठरत असून, काही त्रुटी दूर केल्यास हे ठिकाण नाशिककरांसाठी एक आदर्श व प्रेरणादायी पर्यटनस्थळ बनेल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.



गार्डनमध्ये विविध प्राण्यांचे आकर्षक पुतळे उभारण्यात आले आहेत. हे पुतळे लहान मुलांसाठी खेळाचा भाग बनले आहेत, मात्र मुलांनी या पुतळ्यांवर बसणे व चढणे वाढल्याने त्यांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. याबाबत काही सुजाण नागरिकांनी व्यवस्थापनाचे लक्ष वेधले आहे. तसेच गार्डनच्या कोपऱ्यामध्ये प्रेमी युगल बसलेले आढळत असल्याने, कुटुंबीयांसह फिरायला आलेल्या महिलांनी नाराजी व्यक्त केली आहे. सार्वजनिक ठिकाणी शिस्त आणि सौजन्य टिकवणे आवश्यक आहे, अशी मागणी महिलांकडून होत आहे. यामुळे प्रशासनाने यावर योग्य तो नियंत्रण ठेवावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



नाशिकरोड मधील अद्यावत व परिपूर्ण केलेले सोमानी गार्डन व त्यातील संगीत कारंजे हे पर्यटक व विशेषतः नाशिक रोड नाशिक शहरातील नागरिकांसाठी आकर्षण ठरले आहे. या ठिकाणी करोडो रुपये खर्च करून प्राण्यांचे पुतळे तयार करून त्यांची ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्याची व गार्डनची निगा राखणे सर्वच नागरिकांचे कर्तव्य आहे. या ठिकाणी सुरक्षा रक्षकांची नेमणूक करणे गरजेचे आहे. नागरिकांनी आपले म्हणून त्याचा वापर करावा.

**– रतन खालकर, व्यावसायिक**

**NOTICE - 23 B**

| | | |
|---|---|---|
| Name of Owner | : | Mr.Rajendra Karbhari Desai<br>Mr.Sunil Karbhari Desai<br>Mr.Anil Karbhari Desai<br>Miss.Shakuntala Karbhari Desai |
| Architects | : | Prashant M Themaskar |
| Structural Engg. | : | Milind Rathi |
| Plot No. | : | 01, S.No.109/A/1/2B/3 |
| Village | : | Deolali |
| FSI | : | One |
| B/up Area | : | 1259.59 Sqm. |
| Tenaments | : | 28 |
| Commencement No. | : | NMCB/B/2023/APL/07550, Dtd.17/05/2023 |

ALL PLANS, PAPER ARE AVAILABLE ON SITE FOR INSPECTION

**दस्त गहाळ झालेबाबत जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,
मिळकतीचे वर्णन :- तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी **तालुका मालेगांव** पैकी **मौजे सोयगांव** या गांवचे शिवारातील बिनशेती प्लॉट मिळकत यांसी **सर्व्हे नंबर ५६/२/३/१/२/३/४** पैकी **प्लॉट नंबर ३५** यांसी **क्षेत्र ५५-१२५ चौरस मीटर** यांसी चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राईटस्प्रमाणे.

उपरोक्त नमुद केलेली मिळकत आजरोजी **सिमाबाई देविदास गुरव** यांचे खरेदी मालकीची व प्रत्यक्ष कबजे उपभोगातील आहे. सदर प्लॉट मिळकतीचे पुर्वाश्रमिचे मालक **अ) श्री.कैलास लक्ष्मण पाटील/सोनवणे** यांचे लाभातील व **दिनांक १४/०७/२०००** रोजी मे.दुय्यम निबंधक सो‌ा. मालेगांव यांचे कार्यालयात नोंदविलेले **खरेदीखत** हा मुळ दस्त तसेच **ब) श्री.मथुराबाई बाबुराव आमराळे** यांचे लाभातील व **दिनांक २२/७/१९९३** रोजी मे.दुय्यम निबंधक सो‌ा. मालेगांव यांचे कार्यालयात नोंदविलेले **खरेदीखत** हा मुळ दस्त.

अशा उपरोक्त नमुद **दोन्ही दस्तांच्या मुळप्रती व नोंदणी पावत्या मिळकत मालक यांचेकडून मालेगांव परिसरात हरविल्या / गहाळ झालेल्या आहेत** व शोध घेतला असता सापडुन आलेल्या नाहीत. मिळकत मालक यांनी उपरोक्त मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचे सांगुन सदर दस्तांचा कोणत्याही प्रकारे गैरवापर केला नसल्याचे खात्रीशीरपणे सांगितले आहे. तत्राप, उपरोक्त नमुद प्लॉट मिळकतीचे मालकी हक्क व निर्वेधपणाबाबत कोणास काहीही हरकत / तक्रार असल्यास अगर उपरोक्त दस्तांची व नोंदणी पावत्यांच्या मुळ प्रती कोणासही सापडून / मिळुन आल्यास त्यांनी कृपया खालील पत्त्यावर **०७ दिवसांचे आत** संपर्क साधावा. कळावे, ही दस्त गहाळ झालेबाबतची जाहीर नोटीस.
नाशिक. दिनांक २८/०४/२०२५.

**समीर चंद्रशेखर रत्नपारखी, ॲडव्होकेट**
ऑफीस नं.३१०, सारडा संकुल, एम.जी.रोड, नाशिक.मो.९६२३१९३७८५, ९१७५७२६५२९

**मॅग फिनसर्व्ह कंपनी लि.**
"मॅग हाऊस", ललित मोहन बझार मागे लक्ष्मीनगर, फलटण.

**लिलाव नोटिस**

खाली नमूद केलेल्या कर्ज खाते क्रमांक असलेल्या कर्जदारांनी खाली नमूद केल्याप्रमाणे सोन्याच्या दागिन्यांच्या तारणावर सुवर्ण कर्ज सुविधा घेतली होती. या सर्व कर्जदारांनी थकबाकीची परतफेड केलेली नसल्याने कंपनीला कर्जदाराला थकबाकीची परतफेड करण्यास सांगणाऱ्या नोटिसा जारी कराव्या लागल्या. तथापि, कर्जदारांनी त्यांची थकबाकी परतफेड करण्यात/फेडण्यात अयशस्वी ठरल्याने मॅग फिनसर्व्ह कंपनी लिमिटेड कंपनीला त्यांच्या कडे तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करण्यात येत आहे

**नाशिक** प्रिया अशोक दराडे (01062610818001), पारसमल मणिकचंद साखला (01062608330002), (01062608336603), (01062613275601), हर्षद संतोष गवळी (01062609644801), वासंती पारसमल साखला (01062606870604), (01062605159703) विवेक सुधाकर केदारे (01062605595803) सुरेखा सतीश कोचे (01062611586101) संजय भीमा गरड (01062612738303), स्वप्नील नामदेव राठोड (01062609765003), संदीप वाल्मिक बर्वे (01062609145501), सुनीता कमल राठी (01062609189503), हिरेन मनसुखभाई देवलूक (01062613560201), अमित शांताराम बोडके (01062609946801), अमित शांताराम बोडके (01062613463001), निशांत बाळकृष्ण कालन (01062615079601), सुरेश बाबुराव कलाळ (01062613543001), नितिन कैलास पाटील (01062610599801), सागर सोमनाथ कहाणे (01062611384801), गणेश दिपक दराडे (01062611628201), मनोज चुनीलाल वर्मा (01062612615801), राकेशकुमार सुरेशभाई दळवी (01062612764801), सिद्धेश कमल राठी (01062613156201), भौतिक मुकेशभाई पटेल (01062613203901), (01062613428001), आयुब शहाबुद्दीन देशमुख (01062613252301), साहिल बिलाल पठाण (01062613291401), साहिल बिलाल पठाण (01062613363101), संदीप पोपट थोरात (01062613467701).

थकबाकीदार कर्जदारांना ही सूचना प्रकाशित झाल्यानंतरही सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकी परतफेड करण्याचा आणि त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा पर्याय दि **२९ एप्रिल २०२५** पर्यंतच असेल. थकबाकीदार ग्राहकाकडून **२९ एप्रिल २०२५** नंतर मिळालेली कोणतीही रक्कम ही थकबाकीची परतफेड म्हणून मानली जाणार नाही. लिलाव प्रक्रियेनंतर ही रक्कम समायोजित केली जाईल. तथापि **३१ मार्च २०२५** रोजी किंवा त्या नंतर बंद झालेल्या / होणाऱ्या थकबाकीदार कर्जदारांना प्रमाणित प्रकाशन शुल्क अदा करावे लागेल.

वर नमूद केलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव **मॅग फिनसर्व्ह कंपनी लिमिटेड, "मॅग हाऊस", ललित मोहन बाजारमागे, लक्ष्मीनगर फलटण येथे दिनांकः ३० एप्रिल २०२५ वेळ:०२.०० दुपारी होईल.** इच्छुक बोलीदारांना **३० एप्रिल २०२५ रोजी सकाळी ०९.०० ते दुपारी १२.००** वाजेपर्यंत सोन्याच्या दागिन्यांची तपासणी करण्यासाठी आणि त्यांची बोली सादर करण्यासाठी आमंत्रित केले जात आहे. सोन्याचा लिलाव "जसा आहे तसा" आधारावर केला जाणार आहे. लिलाव कंपनीने घालून दिलेल्या प्रक्रियेनुसार आणि अटी आणि शर्तींनुसार केला जाईल. थकबाकी असलेल्या खात्यांचा लिलाव जर लिलावाच्या दिवशी पूर्ण झाला नाही, तर त्यांचा लिलाव पुढील सूचना न देता त्यानंतरच्या दिवशी केला जाईल. लिलावाच्या संबंधित कंपनीच्या अटी आणि शर्ती बदलण्याचा कंपनीला पूर्ण अधिकार आहे. लिलावात सहभागी होणे आणि बोली स्वीकारणे याबाबतचे सर्वाधिकार कंपनीला असतील. मॅग फिनसर्व्ह कंपनी लिमिटेडला पूर्व माहितीशिवाय लिलाव यादीतून कोणतेही थकबाकीदार खाते काढून टाकण्याचा अधिकार आहे आणि पूर्व सूचना न देता लिलावाची तारीख रद्द करण्याचा/बदलण्याचा अधिकार देखील आहे. बोलीदारांना लिलावाच्या कारवाईच्या दिवशी मूळ कागदपत्रासह त्यांच्या फोटो-ओळख, स्वाक्षरी आणि पत्त्याच्या पुराव्याची प्रत सादर करण्याची विनंती केली जाते. बोलीदारांना त्यांच्या ऑफरसोबत १,००,०००/- रुपयांचा ईएमडी म्हणून पे ऑर्डर जोडणे आवश्यक आहे.

तारीख : २६/०४/२०२५
स्थळ : फलटण

अधिकृत अधिकारी
मॅग फिनसर्व्ह कंपनी लि.

## महत्त्वाचे



### जिल्हा बँकेची सक्तीची कर्ज वसुली थांबवावी

**पिंपळगाव बसवंत :** नाशिक जिल्हा सहकारी बँकेची सक्तीची कर्ज वसुली बंद करा व शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्जमाफ करा तसेच कर्जमाफीला उशीर होत असेल तर शेतकऱ्यांच्या संपूर्ण व्याज सवलत देऊन मुद्दलाचे दहा हप्ते करून द्यावेत, अशी मागणी निवेदनाद्वारे शेतकरी संघटर्फे अन्न व प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्याकडे करण्यात आली. यावेळी शासनाने कर्जाच्या मुद्दलाच्या रकमेवर दोन टक्के तीन टक्के व पाच टक्के अशा पद्धतीने व्याज आकारणी करणार असल्याचे नरहरी झिरवळ यांनी सांगितले. मात्र अजून तसा शासन निर्णय झाला नसून आपली मागणी मी पुन्हा उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकारमंत्री बाळासाहेब पाटील यांच्याकडे मांडून राज्य शासनाचे राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांच्याकडे मांडून आपल्या मागणीचा विचार करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करेन असे उत्तर दिले.




### घोटीत गोरोबा काका पुण्यतिथी सोहळा

**घोटी :** घोटी शहरात संत गोरोबा काका यांच्या मंदिरात संत गोरोबा काका यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आला. घोटी शहरातून पालखी काढून टाळमृदुगांच्या गजरात अभंग गायन करीत नगरप्रदक्षिणा करण्यात आली. त्या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. घोटी शहरात संत गोरोबा काका मित्र मंडळ व कुंभकार समाजाच्या पुढाकाराने या उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सोहळ्यास खा. राजाभाऊ वाजे यांनी उपस्थिति लावून समाजाच्या विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य करू अशी ग्वाही दिली. या सोहळ्यास माजी सरपंच संतोष दगडे, गणेश काळे, विठ्ठल काळे, आदींनी उपस्थिती लावून. कार्यक्रम यशस्वीतेसाठी महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था प्रदेशाध्यक्ष ज्ञानेश्वर भागवत, अरुण भागवत, संजय गाडेकर, संदीप राजपुरे, बाळासाहेब अष्टेकर, अरुण अष्टेकर, भरत सोनवणे, राजेंद्र भागवत, प्रवीण भागवत, विलास वाघचौरे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

### नांदूरमधमेश्वर धरणात आवर्तन सोडा : होळकर

**लासलगाव :** नांदूरमधमेश्वर धरणातून लासलगाव विंचूरसह १६ गाव



प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेसाठी आवर्तन सोडण्यात यावे या मागणीचे पत्र लासलगाव-विंचूर १६ गाव पाणी पुरवठा योजना देखभाल समितीचे अध्यक्ष जयदत्त होळकर यांनी जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना पाठवले आहे. निवेदनात म्हटले आहे की लासलगाव विंचूरसह १६ गाव प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ही नांदूरमधमेश्वर धरणातील पाण्यावर कार्यान्वीत आहे. सदर योजनेवर १६ गावांचा पाणीपुरवठा अवलंबून असून धरणातील पाणीसाठा संपुष्टात आला आहे. पाण्याच्या पातळीत घट होत आहेत. त्यामुळे सदर योजनेचे धरणातील पंपिंग बंद होण्याच्या स्थितीत आहे. धरणातील पाणी संपल्यास या योजनेतील गावांत पाणीटंचाई निर्माण होणार असून या परिस्थितीची तातडीने दखल घेऊन त्वरीत पिण्याच्या पाण्यासाठी आवर्तन सोडण्यात यावे.पाणी सोडल्यानंतर कालव्याचे आवर्तन करतांना नांदूरमध्यमेश्वर धरणातील पाण्याच्या साठ्याची पातळी २८ फुट ठेवण्यात यावी, जेणेकरून पाऊस पडेपर्यंत पाणीटंचाई निर्माण होणार नाही, अशी मागणी होळकर यांनी केली आहे.



### धम्म, कुटुंबसंस्थांची नैतिक जबाबदारी

**येवला :** माणूस पहिला की धर्म हा प्रश्न कायम अनुत्तरित असला तरी धर्मासाठी माणूस की माणसासाठी धर्म याचा उकल झाला असून मानवी मन-कृतीतील प्रज्ञा, शील, करुणा, ममता, दया, क्षमा, शांती हाच मानवाचा खरा धर्म आहे. बाल-युवा वयापासून मानवी समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता, धर्मनिरपेक्षता, मानवता हि मूल्य नव्या पिढीत रुजवणे गरजेचे असून बाल-युवांना धम्म संस्कारित करणे ही धम्म, कुटुंबाची नैतिक जबाबदारी असल्याचे प्रतिपादन युवा सामाजिक कार्यकर्ते महेंद्र पगारे यांनी येवला शहरात बोलताना केले. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर शिक्षण प्रसारक संस्थेने आयोजित केलेल्या धम्म संस्कार प्रशिक्षण कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते शहरातील मुक्तीभुमी येथे सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. येवला मुक्तीभूमी येथे सुरू असलेला रविवारची धम्मशाळा-संडे धम्म स्कुल उपक्रम ही काळाची गरज आहे. बाल-युवा धम्म संस्कार केंद्रात धम्म उपासक-उपसिकांनी आपल्या कुटूंबातील बालक-युवकांना नियमितपणे पाठवावे. धम्म चळवळ अधिक गतीमान करणे काळाची गरज असल्याचे पगारे यांनी स्पष्ट केले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. एस. डी. शेजवळ यांनी प्रास्ताविक केले. संयोजक धम्ममित्र प्रा. गजानन सुर्येकर, अक्षय गरुड यांनी संडे धम्म स्कुल व बाल-युवा धम्म संस्कार प्रशिक्षण दिले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. एस. डी. शेजवळ, ॲड. चंद्रकांत निकम, पप्पूभाऊ बनसोडे, साखरचंद बनसोडे, नेत्रा सुर्येकर, लिलाबाई दुसिंगे, सुबोध बनसोडे, शिवराज अहिरे, तृप्ती रुखे, मानसी बनसोडे, सम्राट रुखे, अनुष्का बनसोडे, जयश्री नेटारे, रोशन अहिरे, सार्थक पगारे, कुणाल वाघ, रोहित वाघ आदी उपस्थित होते.

## निधन वार्ता

### केशव गवळी



**लासलगाव :** ब्राह्मणगांव विंचूर येथील महावितरण चे सेवा निवृत्त कर्मचारी केशव देवराम गवळी वय ७२ यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी,चार मुले, एक मुलगी, जावई, सुना, नातवंड असा परिवार आहे सामाजिक कार्यकर्ते तुळशीराम व दिनेश गवळी यांचे ते वडील होत.

### विजयकुमार सदावर्ते



**नाशिक :** द्वारका, बनकर चौक येथील निवृत्त बँक अधिकारी विजयकुमार ज्ञानदेव सदावर्ते (८२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. नाशिक येथील प्रख्यात सनदी लेखापाल (चार्टर्ड अकाउंटंट) सीए आनंद सदावर्ते याचे ते वडील होत.

# पिंपळस-येवला व लासलगाव-खेडलेझुंगे रस्त्याच्या कामांचा भुजबळांकडून आढावा

## नियोजित वेळेत कामे पूर्ण करण्याचे अधिकाऱ्यांना निर्देश

**लासलगाव : वार्ताहर**

पिंपळस ते येवला या ५६० कोटी रुपयांच्या तसेच लासलगाव ते खेडले झुंगे या १३४ कोटी रुपयांच्या चौपदरी रस्त्याच्या काँक्रिटीकरणाच्या कामांना अधिक गती देऊन नियोजित वेळेत काम पूर्ण करण्यात यावे, अशा सूचना राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. या कामांचा नाशिक येथील कार्यालयात अधिकाऱ्यांसमवेत त्यांनी आढावा घेतला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस दिलीप खैरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता उदय पालवे, उपअभियंता अविनाश देवरे, उपअभियंता प्रकाश घोडे, शाखा अभियंता गणेश चौधरी, संकेत चौधरी, रेखा शेळके, मयूर मोहिते, कंत्राटदार अभय चौकसी, अनिल काळे यांच्यासह अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी भुजबळ म्हणाले की, पावसाळ्याच्या आत जास्तीत-जास्त काम पूर्ण करण्यात यावे. कामाला अधिक गती देण्यासाठी कामगारांची तसेच मशिनरीची संख्या दुपटीने वाढवावी. कामाला गती न मिळाल्यास संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी. आगामी कुंभमेळ्याच्या धर्तीवर हे काम कुठल्याही परिस्थितीत नियोजित वेळेत पूर्ण करण्यात यावे, अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.



लासलगाव : पिंपळस ते येवला व लासलगाव ते खेडलेझुंगे रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे कामासंदर्भात आढावा बैठकीत मार्गदर्शन करतांना छगन भुजबळ. (छाया : समीर पठाण)

लासलगाव-खेडले झुंगे रस्त्याच्या कामाला खेडले परिसरात ज्या प्रमाणात गतीने काम सुरू आहे. त्याच गतीने लासलगाव विंचूर या बाजूने रस्त्याचे काम सुरू करून प्राधान्याने पूर्ण कारावे. या रस्त्याच्या अंतर्गत असलेल्या पुलांची कामे देखील जलदगतीने पूर्ण करण्यात यावी. रस्त्याचे काम सुरू असताना वाहतूक सुरळीत राहण्यासाठी देखील सुयोग्य नियोजन करण्यात यावे, अशा सूचना त्यांनी केल्या.

लासलगाव बाह्यवळण रस्त्याच्या कामाला देखील अधिक गती देऊन पुढील चार महिन्यात हे काम पूर्ण करण्याबाबत प्रयत्न करण्यात यावे. तसेच शेतकऱ्यांच्या भूसंपादनाचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यात याव्यात अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केल्या.



## नागरिकांना जलद महसूल सेवा पुरवाण्यात : शिंदे

**दिंडोरी: प्रतिनिधी**

येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयात लोक सेवा हक्क दिवस साजरा करण्यात आला. महाराष्ट्र शासन व जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडील प्राप्त निर्देशानुसार प्रांत कार्यालयामध्ये लोक सेवा हक्क दिनाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर दिनाच्या औचित्य साधून प्रांत कार्यालयामध्ये लोकसेवा हक्काबाबत माहिती दर्शवणाऱ्या बारकोड बोर्डाचे अनावरण कार्यालयाच्या दर्शनी भागावर करण्यात आले. उपस्थित अधिकारी, कर्मचारी यांना लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ मधील तरतुदी, लोकसेवा दिनाचा उद्देश, त्याप्रती अधिकारी कर्मचारी यांचे अधिकार जबाबदारी व उत्तरदायित्व तसेच नागरिकांना ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने विहित कालमर्यादित सेवा तत्परतेने व सुलभतेने पुरवण्याबाबत प्रांताधिकारी यांनी मार्गदर्शन केले.

सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी लोकसेवा हक्क दिवस निमित्त शपथ घेतली. याप्रसंगी प्रांताधिकारी यांनी नागरिकांना जलद, तत्परतेने, सुलभतेने, पारदर्शक व गुणवत्तापूर्वक सेवा देण्यासाठी कटिबद्ध राहण्याचे आव्हान केले. सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सेवा वितरण प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा विलंब अडथळा होणार नाही यासाठी आवश्यक ती पावली उचलण्याबाबत सूचित केले. नागरिकांना पुरवण्यात येणाऱ्या सेवेत अधिक गती व परिणामकारकता आणण्याबाबत संकल्प करण्याबाबत सूचित केले.




## येवला नगरपरिषद महाराष्ट्र लोकसेवा हक्क दिन साजरा

**येवला : प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क दिन येवला नगर पालिकेत साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्याधिकारी तुषार आहेर तर प्रमुख अतिथी म्हणून माजी नगरसेवक प्रमोद सस्कार, मुस्ताक शेख उपस्थित होते.

प्रास्तविकता उपमुख्याधिकारी चंद्रकांत भोये यांनी केली नागरिकांना जास्तीत जास्त सेवांचा लाभ मिळावा यासाठी हा दिवस साजरा करण्यात येत असल्याचे सांगितले. यावेळी उपस्थित नागरिकांना जन्म मृत्यू बांधकाम परवानगी मालमत्ता हस्तांतरण पत्र वाटप करण्यात आले. यावेळी वक्तृत्व, निबंध व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत प्रथम द्वितीय तृतीय व सहभागी विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह व प्रमाणपत्राचे वाटप मुख्याधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. निबंध स्पर्धा प्रथम क्रमांक पूजा गाडेकर (एन्झो केम हायस्कूल), चित्रकला स्पर्धा सृष्टी जाधव (स्वामी मुक्तानंद विद्यालय). वक्तृत्व स्पर्धा सना सय्यद आदी विद्यार्थ्यांचा मुख्याधिकारी तुषार आहेर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला सदर

कार्यक्रमाला स्वच्छता निरीक्षक पुनम भामरे, बांधकाम अभियंता दिपाली सरोदे, लेखाधिकारी तुषार नालकर, विजय शिंदे, राजेंद्र गंगापूरकर, शशिकांत मोरे, राजेंद्र निकम, संध्या गवळी, राजेंद्र जांभुळकर, प्रवीण नागपुरे, सोमनाथ भूरूख, मच्छिंद्र पवार, सुषमा विखे, कोमल कडतन, प्रभाकर वाघ, राधेश्याम निकम, सुरेश गोंडाळे, एय्यस शेख आदी उपस्थित होते.

## घनकचरा प्रक्रिया केंद्राला शेतकऱ्यांचा विरोध

### त्र्यंबकचे नागरिक न्यायालयात दाद मागणार; शासनाला निवेदन

**त्र्यंबकेश्वर : प्रतिनिधी**

त्र्यंबक नगरपरिषदेच्या प्रस्तावित घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाला शेतक-यांनी विरोध दर्शविला आहे घन कचरा प्रक्रिया प्रकल्पाला आक्षेप नोंदवण्यासाठी सोमवारी त्र्यंबकेश्वर व तळवाडे शिवारातील शेतक-यांनी नगर परिषद मुख्याधिकारी व प्रशासक डॉ. श्रीया देवचके यांची भेट घेतली.

यावेळी प्रस्तावित घनकचरा प्रकल्पाच्या उभारणी नंतर शहराच्या हद्दी लगत असलेले तळवाडे येथील रहिवासी शेतकरी अडचणीत येणार असल्याचे मुख्याधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिले. यावेळी सादर करण्यात आलेल्या निवेदनात विस्तृत भूमिका मंडण्यात आली आहे. त्र्यंबक नगर परिषद शहराच्या हद्दीत असलेल्या त्र्यंबकेश्वर शहर प्रारूप विकास आराखड्यात गट नंबर २०२,१६३ आणि १६४ यामधील सुमारे ४ एकर २० आर क्षेत्र घनकचरा प्रक्रिया केंद्रासाठी आरक्षित करण्यात आलेले आहे. मागच्या काही महिन्यांपासून त्र्यंबक नगर परिषद प्रशासनाने ही आरक्षित जागा ताब्यात घेण्याचे आणि तेथे घनकचरा प्रक्रिया



प्रकल्प उभारणीसाठी हालचाली सुरू केल्या आहेत. याबाबत बाधित होण-ारे शेतकरी आणि लगतच्या तळवाडे शिवारातील शेतकरी यांनी या प्रकल्पास तीव्र हरकत घेतली आहे. शेतक-यांनी या प्रस्तावित घनकचरा प्रकल्पाने आजूबाजूची शेत जमीन नापीक होण्याची भीती व्यक्त केली आहे. आरक्षित भुखंडाच्या लगत रहिवासी शेतकरी आहेत व त्यातील बहुतांश दुग्ध उत्पादक आहेत. घनकाचरा प्रकल्प झाल्यास शेतीला बाधा पोहचेल तसेच त्याचा परिणाम पशु धनावर देखील होणार आहे. दुभत्या जनावरांचे जीवन धोक्यात येईल व त्यामुळे दुग्ध व्यवसाय बंद करण्याची वेळ संबंधित शेतकरी कुटुंबावर येईल व उपजीविकेचे साधन हिरावले जाणार आहे. घनकचरा प्रकल्पातील ओल्या कच-याचे पाणी जमिनीत मुरेल व आजूबाजूच्या विहिरींच पाणी प्रदूषीत होण्याचा धोका दिसून येत आहे.

या प्रदूषीत पाण्याने शेती ना-पीक होईल तसेच मानवाचे आणि प्राण्यांचे आरोग्य धोक्यात येईल. घनकचरा प्रकल्पाची नियोजित जागा आजूबाजूच्या जागेच्या तु-लनेत उंचावर आहे. साहजिकच येथे निर्माण होणारे टाकवू पदार्थ आणि पाणी सखल भागात पोहचतील. तेथे रहिवासी असलेले शेतक-यांना सर्व बाबतीत ते घातक ठरणार आहे. जवळच जुना आखाडा यांची १०० एकर जमीन आहे. तेथे जुना आखाड्याची सिंहस्थ छावणी असते हजारो साधु महंत तेथे कुंभमेळा दरम्यान मुक्कामी असतात. त्यांना देखील या घनकचरा प्रकल्पाचा त्रास सहन करावा लागणार आहे. या प्रकल्पाच्या जवळच गोदावरी नदी वाहते तेथून पुढे गौतमी बेझे प्रकल्प आहे.

या नदीपात्रातून आणि धरणातून १४ गावांना पाणी पुरवठा करण्यात येतो. त्र्यंबकेश्वर शहराला देखील गौतमी बेझे प्रकल्पातून पाणी पुरवठा होत आहे. या सर्वांच्या आरोग्याचा प्रश्न असल्याने शासनाने तातडीने घन कचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी दुसरी जागा शोधावी असे आवाहन करण्यात आले आहे. निवेदन देतांना तळवाडे माजी सरपंच बाळासाहेब बोडके, शेतकरी दिपक गिते, संदिप कडलग, दिनेश पाटील, रूंजा पाटील कडलग, सोमनाथ कडलग, मनोहर कडलग, दिनकर कडलग, माणिक कडलग, रामनाथ बोडके, तान-ाजी बोडके, किशोर पाटील, यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. निवेदनाच्या सोबत शेकडो स्वाक्षरी असलेले पत्र जोडण्यात आले आहे.

## बाजार समित्या शेतकऱ्यांचे कत्तलखाने, पक्षप्रवेश सोहळे जोरात

**निफाड : तालुका प्रतिनिधी**

नाशिक हा साखर कारखानदारीचा जिल्हा म्हणून ओळखला जात होता. याच जिल्ह्याने ऊस भावावर आंदोलन करण्याचे शिकविले. मात्र आज हेच साखर कारखाने बंद पडल्याने साखर सम्राटांनी आपला मोर्चा बाजार समित्यांमध्ये वळविला आहे.त्यामुळे बाजार समित्या या शेतकऱ्यांचे कत्तलखाने बनल्या आहेत. सध्या राज्यकर्त्यांनी लग्न सोहळे सोडले अन् नेत्यांचे पक्षप्रवेश सोहळे जोरात सुरू केल्याचा घणाघात करीत रयत क्रांती संघटनेचे स्वस्थापक तथा आमदार सदाभाऊ खोत यांनी सरकारला घरचा आहेर दिला.

सन २०२०मध्ये कांद्याचे भाव पडल्याने करोना काळात खोत यांनी विंचूर



त्रिफुलीवर आंदोलन केले होते. परिणामी लासलगाव पोलिस स्टेशनमध्ये त्याबाबत गुन्हा दाखल झाला होता. त्याबाबत निफाड न्यायालयात सुनावणी असल्याने खोत यांच्यासह शिवनाथ जाधव, शंकर दरेकर, सचिन दरेकर, धनंजय जोशी, दीपक पगार, द्यानेश्वर तासकर, बाबासाहेब पोटे, अनिल बोचरे न्यायालयात हजर होते. यावेळी पत्रकारांना माहिती देताना सदाभाऊ खोत म्हणाले.कांद्याला भाव पडला तर ते विचारण्याचा अधिकार शेतकऱ्याला आहे. हेच विचारले म्हणून त्यावेळी महाविकास आघाडी सरकारने आमच्यावर खोटा गुन्हा दाखल केला. आम्ही रक्ताच्या शेवटच्या थेंबा पर्यंत लढत राहणार आहोत. शेतकरी चळवल आणि आमचे गुरू शरद जोशी यांच्यामुळेच गावगाड्याची भाषा आम्ही वेशीपर्यंत आणली. सरकारचे चुकीचे काम वेशीवर टाकण्याचे काम केले.

शेतकरी संघटनेचे पहिले कालखंड पेरणीचा होता. दुसरा कालखंड कापणीचा आणि आता हा तिसरा कालखंड शेतकऱ्याला भाव देण्याचा होता. त्यादृष्टीने आम्ही काम करीत आहे. आज कांद्याला अवघा ८०० ते ९००रुपये भाव मिळत आहे. मी पणन खात्याचा मंत्री होतो त्यावेळी कांद्याचे भाव पडलेले होते. त्यावेळी आदेश काढला होता की कोणताही अधिकारी तुमच्या चाळीवर धाड मारणार नाही की व्यापाऱ्याच्या खळ्यावर जाणार नाही. त्यांचा परिणाम कांद्याचे भाव वाढू लागले. मला खंत एकाच गोष्टीची आहे की ऊसाबाबत आंदोलन करण्याचे काम नाशिक जिल्ह्याने शिकवले त्याच नाशिक जिल्ह्यात आज साखर कारखानदारी उखडून पडली आहे. आमच घर भाड्याने चालवता का? अशी म्हणण्याची वेळ या भाड्याने आणली की काय असे म्हणावे लागेल. साखर कारखानदारी संपताच ही वळू (पुढारी) कांद्याच्या बाजार समितीकडे वळली. प्रायव्हेट बाजार समित्यांना चालना मिळाली पाहिजे. त्यासाठी पहिल्यांना शेतकऱ्यांच्या पायातील बेड्या तोडाव्या लागतील. शेतकऱ्यांची व्होट बँक तयार होत नाही तोपर्यंत शेतीप्रधानावर सरकार ठोस धोरण अवलंबेल असे वाटत नाही. शेतीमालाचे भाव ठरविण्याचा अधिकार शेतकऱ्यांना नाही. त्यामुळे खाजगी बाजार समित्या स्थापन कराव्या लागतील. खाजगी बाजार समित्यांनी देखील सोयीसुविधा पुरविल्या पाहिजे. माझ्यावर गुन्हा दाखल झाला हे माझे सौभाग्य आहे. ही लढाई प्रस्थापित विरुद्ध विस्थापित अशी आहे. परंतु आता आम्ही प्रस्थापितांचे विरुद्ध लढू शकतो. मूठभर घराणे या देशावर राज्य करीत आली आहे. कांद्याला भाव पडला तर ते विचारण्याचा अधिकार शेतकऱ्याला आहे. आणि हेच विचारले म्हणून खोटे गुन्हे दाखल केले असेही सदाभाऊ खोत म्हणाले.

## मनमाडला गाडीतून डिझेल चोरी करणारी टोळी सक्रीय

**मनमाड: प्रतिनिधी**

मनमाड शहरालगत असलेल्या पेट्रोल पंप व हॉटेल ढाबे याठिकाणी उभ्या असलेल्या गाड्या आणि टँकर यांच्या इंधन टाकीतून डिझेल चोरी करणाऱ्या घटनेत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. गाड्यांमधून डिझेल चोरी करणारे टोळी पुन्हा सक्रिय झाली आहे.



मनमाडजवळ असलेल्या पानेवाडी येथे पेट्रोल पंपावर दोन स्कॉर्पिओ गाडीतून आलेल्या टोळीने सुमारे दोन ते अडीच हजार लिटर डिझेल चोरी केली. मागील काही दिवसापासून हा प्रकार बंद होता. मात्र आता ही टोळी पुन्हा सक्रिय झाली असून पोलिस प्रशासनाने या चोरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी पेट्रोल पंप चालक तसेच शहरातील ट्रान्सपोर्ट मालकाकडून केली जात आहे.

मनमाड शहरात भारत पेट्रोलियम, इंडियन ऑइल, हिंदुस्थान पेट्रोलियम यांचे पेट्रोलियम प्लँट आ-हेत. यातून उत्तर महाराष्ट्रसह अर्ध्या महाराष्ट्रात इंधन पुरवठा केला जातो. मनमाड शहरात काही वर्षांपूर्वी सर्रास पेट्रोल डिझेलची चोरी करण्यात येत होती. यातून अप्पर जिल्हाधिकारी यशवंत सोनवणे जळीत हत्याकांड देखील घडले होते. त्यानंतर मनमाड शहरातील पेट्रोल डिझेल चोरीला काही प्रमाणात आळा बसला होता. मात्र अजूनही छोट्या मोठ्या प्रमाणात पेट्रोल डिझेल चोरीचे गुन्हे घडत असतात. मात्र या चोरट्यांनी आता नवीन शक्कल लढवली असून पेट्रोल पंपावर किंवा हॉटेल ढाबे महामार्गालगत उभे असलेल्या ट्रक टँकर यांच्या इंधन टाकीतून डिझेल चोरी करण्यात येत आहे.

> काल रात्री नांदगाव रोडवरील पानेवाडी येथील पेट्रोल पंपावर माझ्या मालकीचा टँकर उभा होता. टँकरच्या इंधन टाकीचे सेफ्टी लॉक तोडून जवळपास साडेतीनशे लिटरपेक्षा जास्त डिझेल चोरी करण्यात आली. याआधी देखील आशा घटना घडत होत्या. तेव्हा तत्कालीन जिल्हा पोलिस अधीक्षक सचिन पाटील यांनी त्या चोरट्यांचा बंदोबस्त केला होता. आता पुन्हा तशा पद्धतीने बंदोबस्त करण्याची गरज आहे. पोलीस प्रशासनाने या चोरट्यांचा बंदोबस्त करावा अन्यथा अघटित घटना घडण्याची दाट शक्यता आहे.
>
> **- मुकेश ललवाणी** टँकर मालक

मनमाड शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या नांदगाव रोडवरील पानेवाडी येथील भारत पेट्रोलियमच्या पेट्रोल पंपावर स्कॉर्पिओ डिझायर आणि व्हॅगनरसारख्या गाड्यांमधून इन्व्हर्टर पाणी ओढण्याची टिल्लू मोटर व ड्रम यांच्या साह्याने उभ्या असलेल्या टँकरच्या इंधन टाकीतून डिझेल चोरी करण्याचा यशस्वी प्रयत्न करण्यात आला. चोरट्यांनी सुरुवा-तीला टँकर व ट्रक शेजारी आपले वाहन उभे करून गाडीचे इंधन टाकीचे लॉक तोडून सुमारे ३५० लिटर डिझेल चोरी करून नेले.

यानंतर त्यांनी इंडियन ऑइल कंपनी समोर लावलेल्या वाहनांमधून देखील डिझेल चोरी जवळपास दोन ते अडीच हजार लिटर चोरट्याने चोरून नेले.

चोरट्यांनी डिझेल चोरीचा नवीन शोध लावला असून एका रात्रीतून २०० ते ५०० लिटर डिझेल चोरी करून किमान ५० हजार रुपयांची चोरी करण्यात येत आहे. याबाबत पेट्रोल पंप चालक ट्रान्सपोर्ट चालक तसेच ट्रक ड्रायव्हर यांनी कारवाई करण्याची मागणी केली असून या चोरट्यांना वेळीच आवर घातली नाही तर भविष्यात एखादी मोठी घटना घडू शकते. कारण या चोरट्यांजवळ गावठी पिस्तूल तलवार चॉपर यास-ारखे हत्यार असतात. त्यामुळे कोणीही आपला जीव धोक्यात घालण्यास तयार नाही. पोलीस प्रशासनाने या चोरट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# शिवडे बंधाऱ्याची गळती पोलीस बंदोबस्तात काढण्यास प्रारंभ

**सिन्नर : प्रतिनिधी**

**गेल्या आठवड्यात २४ तारखेला शिवडे येथे पोलिस बंदोबस्तात गळती काढण्यासाठी गेलेल्या नगरपालिका प्रशासनाला काम करु देण्यास विरोध केल्याने हे काम रखडले होते. त्यामुळे नगरपालिकेने सोमवारी (दि.२८) पुन्हा दंगा नियंत्रण पथक व सिन्नर पोलिसांची कुमक बरोबर घेत या कामास प्रारंभ केला. दंगा नियंत्रण पथक आणि वाढीव पोलिसांचा बळ पाहून शिवडेकरांनी नमते घेतले. त्यामुळे गळती काढण्याचा मार्ग मोकळा झाला.**



सिन्नर नगरपालिकेच्या कडवा स्रोत पाणीपुरवठा योजनेच्या जलवाहिनीला शिवडे बंधाऱ्यात मोठ्या प्रमाणात गळती होत असल्यामुळे शहरवासियांना टंचाईचा सामना करावा लागत आहे. यापार्श्वभूमीवर गळती काढण्याचे काम तातडीने करण्याच्या सूचना दि.५ एप्रिल रोजी कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी घेतलेल्या आढावा बैठकीत दिल्या होत्या. मात्र शिवडेकरांच्या विरोधामुळे हे काम रखडले होते. अखेर सोमवारी पालिका प्रशासनाला हे काम सुरु करण्यास यश आले.

उपमुख्याधिकारी दिपक बंगाळ, कार्यालय अधिक्षक कैलास चव्हाण, नगर अभियंता सौरभ गायकवाड, पाणीपुरवठा अभियंता प्रशांत मेश्राम, प्रमोद पाटील, देवेंद्र शिंदे, गणेश गुंजाळ, योगेश मुळे, अश्विन पुंड आदींसह नगरपालिका कर्मचारी साधन सामुग्रीसह सकाळी १० वाजता शिवडेगावी पोहचले. एक अधिकारी आणि २० कर्मचाऱ्यांचा समावेश असलेले दंगा नियंत्रक पथक, त्याचबरोबर सिन्नरचे पोलिस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्यासह दोन अधिकारी आणि १२ कर्मचारी असा कडक बंदोबस्त गळती काढण्याच्या ठिकाणी तैनात करण्यात आला होता. दरम्यान, गळती काढण्याच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून शासकीय कामात अडथळा न आणण्यासंदर्भात शिवडेतील काही ग्रामस्थांना नोटीसाही बजविण्यात आल्या होत्या. त्यामुळे शिवडेकरांनी नमते घेतले. गळती काढण्यासाठी बंधाऱ्यातील पाणी उपसणे आवश्यक असल्याने तेथे १० अश्वशक्तीच्या दोन मोटारी टाकण्यात आल्या होत्या. याशिवाय ५ डोंगळे टाकून पाणीउपसा सुरु होता. त्यामुळे बंधाऱ्यातील पाणी संध्याकाळी बऱ्यापैकी कमी झाले होते. रात्री गळती काढण्याचे काम करण्यात येणार असल्याचे नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

## महत्त्वाचे

### विद्यार्थी व समाजाच्या सर्वांगीण व शाश्वत विकासात पुस्तकांची भूमिका महत्त्वाची



**पिंपळगांव बसवंत :** पुस्तके माणसाला नेहमीच आनंद, प्रेरणा, धैर्य व मानसिक आधार देत आली आहेत. पुस्तके प्रत्येक परिस्थितित आपल्याला साथ देतात. त्यामुळेच पुस्तकांना खरे मित्र म्हणून संबोधित केले जाते. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर वाचन महत्वाचे आहे. वाचनातूनच विद्यार्थी अथवा एकंदरीत समाजाचा सर्वांगीण व शाश्वत विकास होऊ शकतो, असे प्रतिपादन क. का. वाघ कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश जाधव यांनी केले. ते जागतिक पुस्तक व स्वामित्व हक्क दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमप्रसंगी विद्यार्थ्यांना उद्देशून बोलत होते. यावेळी उपप्राचार्य प्रा. दिलीप माळोदे, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष समन्वयक प्रा. भगवान कडलग, ग्रंथपाल प्रा. अमोल मेहेंदळे, डॉ. एस. के. मोरे, प्रा. हेमंत पाटील, सहाय्यक ग्रंथपाल गुलाब थविल, महेश पाटील, दिलीप शेडगे, दीपक बनकर, बाळा गांगुर्डे, किरण महाले व विद्यार्थी उपस्थित होते.



### नांदगावला कडकडीत बंद

**नांदगाव :** जम्मू काश्मिरच्या पहलगाम येथे निष्पाप हिंदूंवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ येथील सकल हिंदू समाज च्या वतीने नांदगाव बंदची हाक देण्यात आल्याने आज सकाळपासूनच शहरातील मुख्य बाजार पेठेसह सर्व दुकाने बंद ठेवून हिंदूंवर झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध नोंदविण्यात येवून कडकडीत बंद पाळण्यात आला. बंद मधून अत्यावश्यक सेवा वगळण्यात आल्या होता. दरम्यान, दुपारी ४ वाजता येथील हुतात्मा चौकात हिंदू - मुस्लिम बांधव उपस्थित होते. तर तरूणानी तिरंगा झेंडा व भगवे झेंडे फडकवित व हिंदूंच्या पुरांचं लक्ष पैसा, घर, जेवण, जिहादींच्या पुरांच्या हातात एकेसत्तेचाळीस गजवा - ए- हिंद, भारता मध्ये धर्माच्या युध्दाचे संकेत भारतामधून हिंदू धर्म संपविण्याचे षढयंत्र सुरू आहे. भारतीय हिंदू देशाचा तुकडा नाही अखंड भारताचा निर्धार आहे. आदि घोषवाक्याचे फलक हातात घेवून छत्रपती शिवाजी महाराज कि जय..., वंदे मातरम् ... घोषणा देत पाकिस्तानी आतंकवादी यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा जळजळीत निषेध केला. तर ॲड.युनूस शेख, संतोष गुप्ता, विकास शर्मा आदिंनी मनोगत व्यक्त करून पाकिस्तानचा निषेध केला. यावेळी पोलीस निरीक्षक प्रितम चौधरी यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी सकल हिंदू समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# माजीमंत्री दिघोळेंच्या सहकाऱ्यांचा स्नेहमेळावा

**सिन्नर : प्रतिनिधी**

माजी मंत्री स्व. तुकाराम दिघोळे यांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी स्व.दिघोळे यांचे पुतणे एकनाथ दिघोळे यांच्या पुढाकारातून स्व. दिघोळेंच्या जुन्या सहकाऱ्यांचा स्नेह मेळावा नुकताच आयोजित करण्यात आला होता.



तालुक्यातील राजकारणात पंधरा वर्ष स्व.दिघोळे यांचा दबदबा राहिला होता. लोकप्रतिनिधी राहिलेल्या त्यांच्या १५ वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत व संपुर्ण पंचवीस तीस वर्षांचा राजकीय जडणघडणीत त्यांची समर्थपणे साथ देणाऱ्या तालुक्यातील निवडक कार्यकर्त्यांनी या स्नेह मेळाव्याला हजेरी लावली. स्व. दिघोळे यांच्या कारकिर्दीत झालेल्या विकासकामांना व आठवणींना त्यांच्या सहकाऱ्यांनी उजाळा दिला.

तालुक्याला लाभलेले दिघोळे सर्वस्पर्शी व संवेदनशील नेतृत्व होते.असे गोदा युनियन सहकारी संस्थांचे अध्यक्ष लक्ष्मणराव सांगळे यांनी मत मांडले. आजच्या गल्लाभरू व संवेदना हरवलेल्या राजकारणात स्व.दिघोळे हे केवळ राजकीय नेतृत्व नव्हते तर माणुसकी धर्माच्या कसोटीवर उतरलेले अष्टावधानी नेतृत्व होते.असे मत दिघोळेंचे निष्ठावंत सहकारी नाम देव कोतवाल यांनी व्यक्त केले. आज सिन्नरची उद्योगनगरी म्हणून जी ओळख आहे त्याचे श्रेय हे दिघोळेंना जाते. तालुक्यातील भविष्यातील समाजकारणात व राजकारणात स्व. दिघोळेंनी दिलेले योगदान हे आदर्शवत आहेत.असे बंडुनाना भाबड यांनी मत व्यक्त केले. दिघोळेंच्या शाश्वत विकास कामे पुढच्या पिढीला समजण्यासाठी तालुक्यात स्व.दिघोळे यांच्या नावाने विचार मंच स्थापन करण्यात यावे.असे मत हभप अशोक घुमरे यांनी व्यक्त केले. रघुनाथ बर्कले, अशोकराव डावरे, माजी उपसभापती एकनाथ दादा पवार, डॉ. भरत गारे, अरूण कोकाटे, आनंदराव शेळके आदींनी मनोगत व्यक्त केले.

अंबादास कदम, माजी सभापती प्रकाश कदम, नाथामामा आव्हाड, कुंदन निंबाळकर, दत्तात्रय डोंगरे, सुभाष घुगे, सचीन कोकाटे, अर्जुन बोडके, दुध संघाचे माजी चेअरमन दिलीप कातकाडे आदी उपस्थित होते. एकनाथ दिघोळे यांनी आभार मानले.

# राष्ट्रवादीच्या मंगल कलश यात्रेचे बुधवारी सिन्नरला आगमन

## आडवा फाट्यावर होणार जल्लोषात स्वागत

**सिन्नर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने संपूर्ण महाराष्ट्रात मंगल कलश यात्रा हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. संपूर्ण महाराष्ट्रात सहा विभागीय स्तरावर महाराष्ट्र गौरव मंगल कलश यात्रा काढल्या जात आहेत. ही रथयात्रा महाराष्ट्रभर घोडदौड करीत असताना बुधवारी (दि.३०) तीचे सिन्नर मध्ये आगमन होणार आहे. राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही रथयात्रा सिन्नर मधून जात आहे.

सकाळी ८ वाजता शहरातील आडवा फाटा येथे या मंगल कलश यात्रेचे स्वागत करण्यात येणार आहे. तेथून ही यात्रा सिन्नर बस स्थानकाकडे कूच करेल. सिन्नर तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी तसेच कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या आवाहनास प्रतिसाद देण्यासाठी व रथयात्रेचे स्वागत करण्यासाठी सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन रथयात्रा स्वागत समितीचे अध्यक्ष व माजी नगराध्यक्ष विठ्ठल उगले, माजी नगरसेवक मल्लू पाबळे, हर्षद देशमुख यांनी केले आहे. सिन्नर शहराचे राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर प्रमुख सुभाष कुंभार, तालुका प्रमुख आदरणीय संतोष कदम, महिला तालुकाध्यक्ष मंगला कुऱ्हाडे, महिला शहराध्यक्ष मनीषा माळी, सिन्नर नगर परिषदेचे माजी नगरसेवक या यात्रेत सहभागी होणार आहेत.

# भ्रष्टाचारप्रकरणी कोपरगाव येथील कृऊबा समिती सचिवांची चौकशी

**कोपरगाव : प्रतिनिधी**

येथील बाजार समितीचे सचिव नानासाहेब रणशुर यांची भ्रष्टाचाराची चौकशी त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवल्याशिवाय होणार नाही, अशी भुमिका राष्ट्रवादी किसान सेलचे जिल्हा उपाध्यक्ष विजय जाधव यांनी घेतल्यानंतर व पणन संचालनालयासमोर महाराष्ट्र दिनी आत्मदहन करण्याचा इशारा दिल्यानंतर पणन संचालकांनी त्याची तातडीने दखल घेऊन सहकार खात्याचे विभागीय सहनिबंधक नासिक यांना या प्रकरणी तातडीने लक्ष घालून चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

कोपरगाव बाजार समितीमधील बोगस व भ्रष्ट कारभाराची चौकशी करण्यासाठी पणन संचालक, पुणे याच्याकडे २५ फेब्रुवारी २०२५ रोजी अर्जाद्वारे मागणी करण्यातआली होती. तसेच या प्रकरणाची चौकशी नि:पक्षपातीपणे होण्यासाठी ज्या सचिवावर भ्रष्टाचाराचे आरोप आहे, त्यास सक्तीच्या रजेवर पाठवण्याची मागणी विजय जाधव यांनी केली.

तसेच जिल्ह्याच्या बाहेरील पाच किंवा त्रिसदस्यीय सदस्यांची सहाय्यक निबंधकांची नियुक्ती करावी. सचिव रणशुर यांचे जिल्ह्यातील अधिकारी वर्गाबरोबर अनेक लागेबांधे असल्यामुळे चौकशीला अडथळा येऊ शकतो असे जाधव यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना १७ एप्रिल २५ रोजी कळविले होते. बाजार समितीचे सचिव नानासाहेब रणशुर यांनी पदाचा गैरवापर करुन स्वत:च्या मुलाच्या नावाने लायसन्स घेऊन बाजारसमितीची दिशाभूल केली. तसेच उच्च न्यायालयाच्या निकालानुसार जिल्हा उपनिबंधक व पणन संचालक यांची परवानगी न घेता स्वःताचे नातेवाईक व इतर कर्मचाऱ्यांची भरती केल्याचा आरोप जाधव यांनी तक्रार अर्जात केला होता.

कौटुंबिक शपथपत्र न घेता तीन अपत्य असलेले कर्मचारी सेवेत समाविष्ट केले व इतरही अन्य ९ विषयासंबंधी सचिव नानासाहेब रणशुर यांचे संदर्भात आरोप केले. सदर आरोपांची नि:पक्षपातीपणे चौकषी व्हावी परंतु त्या अगोदर सचिव रणशुर यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात यावे, अशी मागणी केली आहे.

या पत्राची दखल पणन संचालनालयाने घेऊन दि २१ एप्रिल रोजी नासिक येथील सहकार खात्याचे विभागीय सहनिबंधक यांना तथाकथित ९ तक्रारींची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

# योजनेसाठी आलेला निधी योग्य वेळेत शेतकरी व नागरिकांसाठी खर्च करा : आ.आशुतोष काळे

**वावी : वार्ताहर**

मतदार संघाच्या विकास कामांसाठी अथक पाठपुरावा करून निधी आणावा लागतो. योजनेसाठी आलेला निधी योग्य पद्धतीने व योग्य वेळेत खर्च झाला तरच शेतकऱ्यांचा व जनतेचा फायदा होईल. त्यामुळे या निधीचा सदुपयोग होणे गरजेचे आहे. त्यासाठी विकास कामांचा निधी योग्य प्रकारे सत्कारणी लावून नागरीकांना सुविधा द्या अशा सूचना आ.आशुतोष काळे यांनी दिल्या.




मतदारसंघातील सर्वसामान्य नागरिकांना विविध शासकीय कार्यालयात येणाऱ्या अडीअडचणी लवकरात लवकर मार्गी लावून हे प्रश्न सोडविण्यासाठी आ.आशुतोष काळे यांनी जनता दरबार सुरु केल्यामुळे सर्वसामान्य जनतेला मोठा दिलासा मिळत आहे. जनता दरबाराच्या माध्यमातून नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक होत असल्यामुळे प्रत्येक जनता दरबारात टप्प्याटप्प्याने शासकीय कार्यालयांच्या अधिकाऱ्यांसमवेत नागरिकांचा एकाच वेळी संपर्क करून प्रश्न सोडविले जात आहे. सोमवार दि.२८ रोजी आ.आशुतोष काळे यांनी कोपरगाव तहसील कार्यालयात जनता दरबार घेवून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मृद व जल संधारण, जल नि:सारण व जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभाग आदी विभागाचा जनता दरबार घेतला यावेळी ते बोलत होते.

यावेळी नागरिकांच्या समस्या समजावून घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना आ.आशुतोष काळे म्हणाले की, कोपरगाव मतदार संघात रस्त्यांची कामे सुरू असल्यामुळे ज्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईन फुटल्या आहेत त्या पाईप लाईनची दुरुस्ती करा. तसेच पावसाळा सुरू होण्यापूर्वी सर्व पाणीपुरवठा योजनांची कामे देखील पूर्ण करा. जलजीवन मिशन अंतर्गत मतदार संघातील सर्वच गावामधील पाणी पुरवठा योजना मंजूर आहेत. परंतु काही योजना पूर्ण होत असताना गावातील नागरिकांना अपेक्षेप्रमाणे काम होत नसल्यामुळे गावच्या अडचणी लक्षात घेऊन योजनाचे काम लवकरात लवकर पूर्ण करा.

उक्कडगाव, शिरसगाव, सावळगाव, तिळवणी, आपेगाव तसेच मोर्वीस या गावांना सद्य स्थितीत पाणी उपलब्ध नसल्यामुळे या गावांतील नागरिकांसाठी पाण्याची व्यवस्था करा.या सर्व गोष्टींचा विचार करून सध्या असलेले पाणी आरक्षण बदलावे लागेल तसेच काही नविन योजना सुरु करण्याचा विचार करावा लागणार आहे. या योजना मंजूर करणेकरीता शासनस्तरावर प्रयत्न करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

गाळ मुक्त धरण, गाळ युक्त शिवार या माध्यमातून मोठ्या प्रमाणात कामे करण्याची संधी आहे. जलयुक्त शिवाराचे देखील कामे मंजूर असून काही कामे प्रलंबित असून ज्या ठेकेदारांनी ती कामे घेतली आहेत त्यांनी ती लवकरात लवकर पूर्ण करावीत. जलयुक्त शिवाराच्या माध्यमातून खिर्डी गणेश, बोलकी आदी गावामध्ये चांगल्या प्रकारची कामे झालेली असून यामुळे त्या भागात भूगर्भातील पाणी पातळीमध्ये वाढ झालेली आहे.

जलसंधारण योजने अंतर्गत आपल्या मतदार संघातील अनेक कामे मंजूर आहेत. जलसंधारण विभागाच्या माध्यमातून विकास कामांचे प्रस्ताव शासनाकडे सादर केलेले आहे. या सर्व कामांना मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता भासणार आहे. तो निधी मिळविण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच पावसाळा सुरु होण्या अगोदर सद्य स्थितीत सुरु तसेच प्रलंबित असलेली कामे ठेकेदार, अधिकारी यांनी तातडीने पूर्ण करावेत अशा सूचना आ.आशुतोष काळे यांनी दिल्या.

आ.आशुतोष काळे यांनी सर्वच शासकीय कार्यालयातील अधिकारी एकाच वेळी न बोलविता टप्पा टप्प्याने विविध विभागाचे अधिकारी जनता दरबारात बोलविले जावून नागरिकांच्या समस्या सोडविल्या जात आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. यावेळी गटविकास अधिकारी संदीप दळवी, नायब तहसीलदार चंद्रशेखर कुलथ राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे पदादिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# त्र्यंबकेश्वर महाविद्यालयाला पंधरा लाखांची शिष्यवृत्ती

## १७८ विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात पैसे जमा

**नाशिक :** मराठा विद्या प्रसारक समाज संस्था संचलित त्र्यंबकेश्वर येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील गुणवत्तापूर्ण कामगिरी करीत तब्बल पंधरा लाख सत्तावीस हजार इतकी शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. एच. पी. सी. एल. या सार्वजनिक क्षेत्रातील इंधन कंपनी द्वारा निकष पूर्ण करणाऱ्या गरजू व पात्र विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते. सन २०२५ साठी गुणवत्तेनुसार महाविद्यालयातील १७८ विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर प्रत्येकी रुपये ७००० ते १०,००० याप्रमाणे रुपये १४,९७,००० जमा झाले आहे.अत्यंत खडतर परिस्थितीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी आणि त्यांच्या कष्टकरी पालकांनी याबद्दल अत्यंत समाधान व्यक्त केले असून पुढील शिक्षणाच्या फी,पुस्तके, गणवेश आदींसाठी मोठी मदत होईल अशा प्रतिक्रिया दिल्या. तसेच राजश्री झोले या विद्यार्थिनीला गुणवत्तेनुसार एच.डी.एफ.सी. बँकेची ३०.००० रुपयांची शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे.

या यशाबद्दल संस्थेचे सरचिटणीस ॲड.नितीन ठाकरे,अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वास मोरे, उपसभापती देवराम मोगल, चिटणीस दिलीप दळवी, नाशिक ग्रामीण तालुका संचालक रमेश पिंगळे यांसह सर्व संचालक मंडळ, शिक्षणाधिकारी डॉ .नितीन जाधव, महाविद्यालय विकास समिती व स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य यांनी प्राचार्य डॉ.दिलीप पवार, सर्व प्राध्यापक, सेवक व लाभार्थी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

### राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचे महाविद्यालय...

महारत्नपैकी एक अशा एच. पी. सी. एल. कंपनीतर्फे एस.सी, एस. टी, ओबीसी आणि दिव्यांग प्रवर्गातील पदवी अभ्यासक्रम पूर्ण करीत असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या मागील वर्षासाठीच्या गुणवत्तापूर्ण कामगिरीसाठी ही शिष्यवृत्ती दिली जाते. यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांचा वार्षिक उत्पन्न तपशील, गुणपत्रके व इतर आवश्यक दाखले सादर करणे अनिवार्य असते. प्राचार्य डॉ. दिलीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्राध्यापकांच्या सहकार्याने जवळपास ३०३ विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयाने पाठवले होते. त्यापैकी १७८ विद्यार्थी या शिष्यवृत्तीस पात्र ठरले. याकामी एच. पी. सेवा वेस्ट झोनचे प्रेसिडेंट सी.डी. कटारे, सेक्रेटरी वाय.जी.सरोदे, कंपनीचे वर्किंग प्रेसिडेंट नितीन जाधव यांचे विशेष सहकार्य लाभले. संपूर्ण महाराष्ट्रात त्र्यंबकेश्वर महाविद्यालय एच. पी. सी. एल. च्या यादीत सर्वाधिक शिष्यवृत्ती मिळवणारे दुसऱ्या क्रमांकाचे महाविद्यालय ठरले आहे. संस्था व महाविद्यालयाच्या दृष्टीने ही अत्यंत गौरवाची बाब आहे.

# महिंद्राचा इलेक्ट्रिकल व्हेईकल प्रकल्प सिन्नरला झाला पाहिजे

## सीमा संघटनेची कृषिमंत्री कोकाटे, खासदार वाजेंकडे मागणी

**सिन्नर : प्रतिनिधी**

महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचा नाशिक जिल्ह्यात होवू घातलेला इलेक्ट्रिकल व्हेईकल प्रकल्प सिन्नरला साकारण्यात यावा. मापारवाडीत नव्याने प्रस्तावित ५१० एकरचे भूसंपादन करण्यात येत आहे. जागा उपलब्ध असल्याने मापारवाडी येथे प्रकल्पासाठी प्राधान्याने विचार व्हावा, अशी मागणी सिन्नर इंडस्ट्रीयल ॲण्ड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने (सिमा) केली आहे.

सिमाचे अध्यक्ष किशोर राठी, उपाध्यक्ष किरण भंडारी, सचिव बबन वाजे, कोषाध्यक्ष राहुल नवले, विश्वस्त मारुती कुलकर्णी, रतन पडवळ, मुकेश देशमुख, सुकुमार नायर, किरण बडगुजर, नारायण क्षिरसागर, अरुण चव्हाणके, लक्ष्मण डोळे, दत्ता ढोबळे, बाबासाहेब हरदे, निलेश काकड, नंदकुमार पाटील, शांताराम दारुंटे, शशिकांत नवले, दत्ता नवले आदींनी मागणी केली आहे. याबाबत कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, खासदार राजाभाऊ वाजे यांच्यासह उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट घेण्यात येणार आहे.

सिन्नरला गुंतवणुकीसाठी पोषक वातावरण आहे. जवळच माळेगाव औद्योगिक वसाहत असल्याने पाणी पुरवठा करणे शक्य आहे. शिवाय या क्षेत्राजवळूनच माळेगाव व मुसळगाव लिंक रोड प्रस्तावित आहे. मापारवाडीपासून नाशिक-पुणे प्रस्तावित रेल्वे मार्गही जवळ आहे. तसेच समृद्धी महामार्ग जवळ आहे. लवकर सुरु होण्याच्या टप्प्यात असलेला सिन्नर थर्मल पॉवरमुळे विजेचा प्रश्नही प्रकल्पाला भेडसावणार नाही. महिंद्रा प्रकल्पासाठी तंत्रकुशल कामगारही उपलब्ध होवू शकतील. महिंद्राच्या गुंतवणुकीच्या दृष्टीने पोषक स्थिती आहे. त्यामुळे सिन्नरच्या मापारवाडी क्षेत्रात हा प्रकल्प साकारण्यात यावा.

### २० वर्षांपासून नवीन प्रकल्पाची प्रतीक्षा

सिन्नरला गेल्या २० वर्षात नवीन प्रकल्प आलेला नाही. सेझच्या क्षेत्रातील जमिनही तशीच पडून आहे. येथील औद्योगिक वसाहतीला चालना मिळण्यासाठी प्रकल्प होणे गरजेचे आहे. त्यामुळे सिन्नरचा रोडावलेल्या विकासास हातभार लागणार आहे. महिंद्रा प्रकल्पाच्या स्थापनेसाठी वरिष्ठ पातळीवर हालचारी सुरु आहेत. हा प्रकल्प मापारवाडीत व्हावा यासाठी कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, खासदार राजाभाऊ वाजे हेही आग्रही आहेत. प्रकल्पासाठी येथे कोणताही विरोध नाही. उलट स्वागत होवू शकेल. महिंद्राचा हा प्रकल्प मापारवाडीत साकारण्यात यावा, अशी इच्छाही तालुक्यातील लोक बाळगून आहेत. प्रकल्पासाठी सिन्नरला सर्व बाजू सकारात्मक आहेत. त्यामुळे हा प्रकल्प सिन्नरला साकारण्याचा विचार व्हावा यासाठी सिमा आग्रही आहे.

### हजारोंना रोजगाराची संधी

महिंद्राचा प्रकल्प साकारल्यास हजारो युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. सिन्नरच्या औद्योगिक विकासाला मोठी गती मिळू शकेल. त्यामुळे या प्रकल्पासाठी सिमा आग्रही आहे.

**– बबन वाजे,** सचिव, सीमा.



# वर्षभरात ९५ हजार दाखल्यांचे वितरण

## तहसिलदारांचा गौरव

**सिन्नर :** सेवा हमी कायद्याची यशस्वी अंमलबजावणी करताना वर्षभरात तब्बल वेगवेगळ्या प्रकारच्या ९५ हजार दाखल्यांचे वितरण करत उत्कृष्ट सेवा दिल्याबद्दल सिन्नरचे तहसिलदार सुरेंद्र देशमुख यांचा जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सेवा हमी कायद्याला २८ एप्रिल २०२५ रोजी दहा वर्षे पूर्ण झाल्याबद्दल नाशिक जिल्ह्यातील उत्कृष्ट सेवा प्रदान करणाऱ्या कार्यालयांचा नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी (दि.२८) सत्कार करण्यात आला. त्यात सिन्नरचे तहसिलदार सुरेंद्र देशमुख यांचाही सन्मान करण्यात आला.

सिन्नर सेतू केंद्र आणि आपले सरकार सेवा केंद्रांच्या माध्यमातून उत्पन्न, डोमिसाईल, राष्ट्रीयत्व यासह विविध प्रकारचे सुमारे ९५ हजार प्रमाणपत्रांचे वितरण विहीत वेळेत करुन त्यांनी सेवा हमी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी केली. दरम्यान याकामी तहसिलदारांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्ट काम करणारे सेतूचे व्यवस्थापक सतीश दळवी, गोरख आढाव, गौरव गुजराथी, मेंगाळ, भालेराव आदींसह कर्मचाऱ्यांचा तहसिलदार सुरेंद्र देशमुख आणि नायब तहसिलदार सागर मुंदडा यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
# गांवकरी
■ gavakari.in ■ gavkarinews.com
■ नाशिक, मंगळवार, दि. २९ एप्रिल २०२५



◀◀ पिंपळस-येवला व लासलगाव-खेडलेझुंगे रस्त्याच्या कामांचा भुजबळांकडून आढावा ◀◀ पान ६



▶▶ मनमाडला गाडीतून डिझेल चोरी करणारी टोळी सक्रीय ▶▶ पान ६

# साडेतीनशे कोटींच्या जलवाहिनींचे काम 'लक्ष्मी'च्या हाती

## अमृत दोन अंतर्गत होणार काम; शहरातील पाणीपुरवठा सुरळीत होणार

**नाशिक : प्रतिनिधी**

**शहराची हद्द वाढत असून सन २०५० पर्यंत लोकसंख्या ५५ लाखांच्या घरात पोहचणार आहे. तेव्हाच्या लोकसंख्येची तहान भागविन्याचे मोठे आव्हान महापालिकेसमोर आहे. दरम्यान शहरात तीस वर्षांपुर्वी टाकलेल्या जलवाहिन्या जीर्ण असल्याने पाणी गळती मोठया प्रमाणात होत आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने अमृत दोन योजने अंतर्गत तब्बल ३४२ कोटींच्या जलवाहिन्या बसविण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार निविदा प्रक्रिया राबवली असता कोल्हापूरच्या लक्ष्मी सिव्हिल इंजिनियअर्स सर्व्हिसेस कंपनी पात्र ठरली आहे.**



शहराची भविष्यातील तहान भागविणे व पाणी पुरवठा सुरळीत करणे यासाठी महत्वपूर्ण असलेल्या अमृत योजनेसाठी वरील कंपनी कागदपत्र तपासणीत पात्र ठरली आहे. ३४२ कोटींची ही योजना असून प्राप्त निविदांपैकी लक्ष्मी सर्व्हिसेसचा दर ९.९९९ टक्के कमी होता. त्यामुळे त्यांना निविदा देण्यात आली असून ३५ कोटींची बचत होणार असून ३०७ कोटींमध्ये हे काम होणार आहे. पालिकेने चौथ्यांदा निविदा प्रक्रिया राबवली असता अखेर यात मनपाला यश आले.

लक्ष्मी सिव्हील इंजिनिअरिंग सर्विसेस, कोया ड कंपनी कन्स्ट्रक्सशन, जेडब्ल्यु इन्फ्रा, इगर इन्ग्रा व भुगन इन्फ्राकॉन या पाच कंपन्यांनी सहभाग नोंदवला. त्यात कागदपत्रा अभावी एक कंपनी बाद ठरली. उर्वरीत पात्र चार कंपन्यांच्या कागदपत्रांची तांत्रिक तपासणी करण्यात आली. त्यात इतर सर्व कंपन्या पात्र ठरल्या. परंतू कोल्हापूरच्या लक्ष्मी सिव्हील इंजिनिअरिंग सर्विसेस या कंपनीचे दर इतर सहभागी कंपन्यांच्या तुलनेत सर्वात कमी असल्याने अमृत योजनेचे काम या कंपनीला देण्यात आले.

या योजनेचा पन्नास टक्के खर्च केंद्र व राज्य सरकार करणार असून उर्वरीत पन्नास टक्के खर्च महापालिका करणार आहे. महापालिकेने केंद्राच्या अमृत दोन योजनेअंतर्गत जलवाहिन्या टाकण्यासाठी निधीची मागणी केली होती. या योजने अंतर्गत मनपाला ३४२ कोटींच्या योजनेला मंजुरी मिळाली.

मनपा प्रशासनाने गेल्या दीड वर्षांत अमृत योजनेसाठी तीन निविदा प्रक्रिया राबवली गेली. अखेर चौथ्यांदा पाणीपुरवठा विभागाला यश आले असून कोल्हापूरची कंपनी यासाठी पात्र ठरली आहे.

> जलवाहिन्यांच्या कामासाठी लक्ष्मी सिव्हिल इंजिनिअरींग कंपनीने दर ९.९९९ टक्के इतरांच्या तुलनेत कमी होता. त्यामुळे त्यांना हे काम देण्यात आले. आयुक्तांच्या मार्गदर्शनामुळे ३५ कोटींची बचत शक्य झाली. पाणी पुरवठा अमृत योजनेसाठी आयुक्तांनी जिओ टॅगची अट रद्द करत दहा वर्षाचा अनुभव सक्ती केली. त्यानूसार निविदा प्रक्रिया राबवली.
>
> – **रवींद्र धारणकर,** अधीक्षक अभियंता, मनपा

## महत्त्वाचे

### पेठ रोडवरील एस. टी. वर्कशॉप जवळ अपघातात युवकाचा मृत्यू

**पंचवटी : वार्ताहर**

पेठरोडवरील एसटी वर्क शॉप जवळ पिक अपवर दुचाकी चालक आदळून दोनवाडे येथील एका २८ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, सोमवार दि.२८ रोजी पहाटे ४:३० वाजेच्या सुमारास आरटीओ कडून गुजरात बलसाड येथे जात असलेला अशोक लेलँड कंपनीचा ट्रक ( टी एन ५२ एफ ७४४७ ) याने राऊ हॉटेल कडून (समोरून) येणाऱ्या पिक अप क्रमांक (एम एच ०५ इ एल ७२३५) गाडीला जोरदार धडक दिल्याने पिक अप गाडी ओढत नेली. त्याच दरम्यान राऊ हॉटेल कडून दुचाकी क्रमांक ( एम एच १५ एच झेड ५४७७) या दुचाकीवरून जात असलेल्या सिद्धेश कैलास कांगणे (२८) राहणार दोनवाडे (सध्या इरिकेशन कॉलनी मखमलाबाद) याने पिक अप गाडीला मागून जोरदार धडक दिल्याने त्याचा मृत्यू झाला. सिद्धेश कांगणे हा व्हील सी एम आय फायनान्स मध्ये काम करत होता. त्याचा चार महिन्यांपूर्वी नुकताच विवाह झाला होता.त्याच्या पश्चात पत्नी, आई, वडील, एक भाऊ एक बहीण असा परिवार आहे.त्याच्या मृत्यूने दोनवाडे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली असून त्याच्यावर दोनवाडे ( भगूर ) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. याबाबत म्हसरूळ पोलिस ठाण्यात अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक गावित, हवालदार भुसारे करत आहेत.



### दारणा धरणात आढळला अज्ञात पर्यटकाचा मृतदेह

**वासाळी :** इगतपुरी तालुक्यातील नांदगाव बुद्रुक येथील दारणा धरण हे ब्रिटिश कालीन दगडी धरण आहे. मुंबई आणि नाशिक परिसरातून अनेक पर्यटक या धरणाला भेट देण्यासाठी येतात. येथे मोठ्या प्रमाणात गर्दी करतात. सुट्ट्यांमध्ये तर हे धरण पिकनिक पॉईंटच बनले आहे. तसेच एस.एम.बी.टी पासून काहीशां आंतरावर हे धरण असल्या कारणे मोठ्या प्रमाणात मुले-मुली धरणावर फेरफटका मारायला येतात. अशातच आज एक दुर्दैवी घटना घडली आहे. दि. २८ (सोमवार) सकाळी १० वाजता धरणामध्ये पाण्यावर तरंगलेला अज्ञात इसमाचा मृतदेह आढळला आहे. धरणावर काम करणाऱ्या कामगाराला तरंगलेला मृतदेह दिसला असता, त्याने वरिष्ठ इरिगेशन अधिकाऱ्यास कळवले. अधिकाऱ्याने गावच्या पोलीस पाटील यांना फोन करून सांगितले. त्यानंतर पोलीस पाटील घटनास्थळी जाऊन वाडीगो-हे पोलीस ठाणे सहाय्यक पोलीस निरीक्षक भांबरे यांना माहिती दिली आसता, पोलीस कॉन्स्टेबल लहामटे हे घटना स्थळी हजर झाले. त्यांनी गावकऱ्यांच्या साह्याने मृतदेह पाण्यातून बाहेर काढला. इसमाच्या बॉडीची व कपड्यांची पूर्ण तपासणी केली असता कोणत्याही प्रकारची ओळख भेटली नाही. बॉडीचा पंचनामा करून शवविच्छेदन साठी पाठवण्यात आली. वाडीवऱ्हे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भांबरे, सहाय्यक उपनिरीक्षक - एसी, पोलीस कॉन्स्टेबल लहामटे तपास करत आहेत.

> वारंवार सांगूनही धरणावरती कुठल्याही प्रकारची सुरक्षा व्यवस्था नाही. सी.सी.टी.व्ही. कॅमेरे नाहीत. सुरक्षा रक्षक नाहीत. धरणाकडे आधिकारी वर्गाचे पुर्ण पणे दुर्लक्ष आहे. त्यामुळे बेधुंद पारट्या केल्या जातात व असे दुर्दैवी प्रकार घडले जातात.
>
> – **गंगाधर पगारे** (पो. पाटील नांदगाव बु)

# तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्यांच्या कारभाराचे वाभाडे

## आ. दराडे : पाटलांवर बडतर्फची कारवाई; त्या चार केंद्रप्रमुखांची चौकशी

**नाशिक : प्रतिनिधी**

महापालिकेतील तत्कालीन वादग्रस्त शिक्षणाधिकारी बापुसाहेब पाटील यांनी नियमबाह्य पद्धतीने केलेल्या बदल्या रद्द करण्याबरोबरच महापालिकेतील शिक्षकांची कामे गांभीर्याने करावी. तसेच पाटील यांचे निलंबन न करता सेवेतून बडतर्फ करावे. अशी मागणी शासनाकडे करणार असल्याचे सांगत शिक्षक आ. किशोर दराडे यांच्यासह शिक्षकांनी तत्कालीन शिक्षणाधिकारी पाटील यांच्या कारभाराचे वाभाडे मनपा आयुक्तांसमोर काढले.



आमदार दराडे यांच्या उपस्थितीत सोमवारी (दि.२८) महापालिकेच्या स्थायी समिती सभागृहात शिक्षक दरबाराचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर, प्रभारी शिक्षणाधिकारी नितीन पवार यांच्यासह विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी शिक्षकांनी पाटील यांच्या काळातील नियमबाह्य बदल्या रद्द करण्याची मागणी करण्यात आली, यावर दराडे यांनी आयुक्त मनीषा खत्री यांची भेट घेऊन मनपातील शिक्षकांच्या समस्यांचा पाढाच मांडला. शिक्षणाधिकारी बी. टी. पाटील यांच्या कार्यकाळातील ज्या अनियमित बदल्या झाल्या आहेत, त्या सर्व रद्द केल्या जाणार असून जूनच्या पहिल्या आठवड्यात नव्याने ऑनलाइन बदल्या करण्यात येतील असे मनपा आयुक्त मनीषा खत्री यांनी सांगितले. तत्कालीन शिक्षणाधिकारी बापुसाहेब पाटील यांनी त्यांच्या मर्जीतील बाळासाहेब कडलग, प्रकाश शेवाळे, सुनील खेलुकर, ईश्वर चव्हाण, बाळासाहेब कडलग या चार केंद्रप्रमुखांची नियुक्ती केली होती. त्यांची चौकशीची मागणी शिक्षक संघटनांनी आयुक्त खत्री यांच्याकडे केली असता या चौघांची चौकशी करण्याचे आश्वासन खत्री यांनी दिले. सेवाज्येष्ठतेनुसार मुख्याध्यापकांना केंद्रप्रमुखपद देण्यची मागणी केली गेली.

### महिला शिक्षकांना अश्रू अनावर

बी.टी.पाटील यांच्याकडून जाणूनबुजून टार्गेट केले जात होते. विशिष्ट शिक्षिकांनाच हा त्रास होता. यावेळी एका शिक्षिकेने आमच्याकडून कामाचे पैसे घेऊनही ते केले नसल्याचे उपस्थितांसमोर केले. यावेळी पाटील यांच्याकडून कसा त्रास दिला जात होता, हे सांगतांना एका महिला शिक्षकेला अश्रू अनावर झाले. शिक्षक दरबरात आ. किशोर दराडे यांनी बापुसाहेब पाटील यांनी दिलेल्या त्रासावर बोलण्यास सांगितले असता काही महिला शिक्षिकांनी त्यांना आलेले अनुभव कथन केले.

# शहरात आज काँग्रेसची संविधान सद्भावना रॅली

## सपकाळ , वडेट्टीवार यांची उपस्थिती

**नाशिक : प्रतिनिधी**



महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ व काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्या उपस्थितीत नाशिक शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे संविधान सद्भावना मार्च आज मंगळवार दि.२९ आयोजित केलेला असून या यात्रेनिमित्ताने नाशिक शहरात शांतीचा व सद्भावनेचा संदेश देणारी यात्रा ठरेल असे मत प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस शहराचे अध्यक्ष आकाश छाजेड यांनी व्यक्त केले.

या सद्भावना यात्रेमध्ये पक्षाची ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष कुणाल पाटील, खासदार शोभाताई बच्छाव, नाशिक शहर जिल्हा काँग्रेस चे प्रभारी ब्रिजकिशोर दत्त, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष शिरीष कोतवाल, शहर काँग्रेसचे अध्यक्ष आकाश छाजेड, प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष राजाराम पानगव्हाणे, उपाध्यक्ष शरद आहेर, प्रदेश काँग्रेसचे सचिव राहुल दिवे, तसेच महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष संध्याताई सव्वा लाख, प्रदेश एन एस यु आय चे अध्यक्ष अमीर शेख, तसेच जिल्ह्यातील सर्व प्रदेश पदाधिकारी सर्व आघाड्यांचे पदाधिकारी सर्व विभाग व सेलचे पदाधिकारी माजी नगरसेवक माजी लोकप्रतिनिधी माजी जिल्हा परिषद सदस्य आदि पदाधिकारी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहणार आहे अशी माहिती यांनी दिली.

संविधान सद्भावना मार्च च्या कार्यक्रमामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या सद्भावना रॅलीच्या मार्फत नाशिक शहरांमध्ये एकात्मताची भावना तसेच शांततेचा संदेश देणारी उल्लेखनीय बाब ठरेल. सर्व ब्लॉक काँग्रेसचे अध्यक्ष, तसेच युवक काँग्रेस, एन एस यु आय, महिला काँग्रेस, सेवा दल, इंटक, ओबीसी विभाग, अल्पसंख्यांक विभाग, अनुसूचित जाती व जमाती विभाग पर्यावरण विभाग व शहर काँग्रेसचे सर्व विभाग शहर काँग्रेसचे पदाधिकारी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रदेश काँग्रेसचे सर्व पदाधिकारी मेहनत घेत असल्याची माहिती शहर काँग्रेसचे अध्यक्ष आकाश छाजेड यांनी दिली.

जनतेने यात्रेत मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन छाजेड यांनी केले आहे.

### या मार्गावरून निघणार सद्भावना मार्च

सद्भावना मार्च हुतात्मा स्मारक – मेहेर सिग्नल – रेड क्रॉस सिग्नल – मार्गे नेहरू गार्डन– वरून शालिमार – गंजमाळ सिग्नल – पासून दूध बाजार – बादशहा चौक– पासून संत गाडगे महाराज पुतळ्याला समारोप होणार आहे.

# डॉ. प्रशांत शेटे यांची उचलबागडी

## पंड्या प्रकरणी बिटकोत बदली; शासनाचे होते चौकशीचे आदेश

**नाशिक : प्रतिनिधी**

शहरातील महात्मानगर भागातील पंड्या हॉस्पिटलमधील अवैध गर्भपात प्रकरणात हलगर्जीपणा केल्याचा ठपका सहायक आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत शेटे यांच्यावर ठेवण्यात आला होता. त्यानंतर मनपा आयुक्त मनीषा खत्री यांनी डॉ. शेटे यांना जोरदार दणका देत त्यांची नाशिकरोडच्या बिटको रुग्णालयात उचलबागडी करत बदली केली. मनपा आयुक्त मनीषा खत्री यांनी सोमवारी (दि.२८) त्यांच्या बदलीचे आदेश काढले.

दरम्यान डॉ. जितेंद्र धनेश्वर यांच्याकडे शेटे यांच्याकडील पदभार सोपवण्यात आलाय. डॉ. शेटे यांनी सदर रुग्णालयाकडे जाणीवपूर्वक दूर्लक्ष केल्याचे आरोप झाले होते. अखेर बिटको रूग्णालयात त्यांची बदली करण्यात आली. विधीमंडळात याप्रकरणी त्यांच्यावर आरोप करण्यात आले होते. त्यानंतर त्यांच्या चौकशीचे आदेश राज्य सरकारकडून देण्यात आले होते. त्यानुसार, चौकशीसाठी आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियान संचालकांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. पिंपळद येथील एका गर्भवती महिला व तिच्या अर्भकाचा पंड्या हॉस्पिटलमध्ये गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात मृत्यू झाला होता. याप्रकरणी माता मृत्यू संशोधन समितीच्या पथकाने संबंधित रुग्णालयाची तपासणी केली असता, त्याठिकाणी पथकाला अवैध गर्भपातासाठी वापरला जाणारा औषधसाठा आढळून आला होता. या पथकामध्ये डॉ. शेटे यांचा समावेश होता. त्याचबरोबर पंड्या हॉस्पिटलने २००९ पासून वैद्यकीय विभागाकडे परवाना नूतनीकरणच केलेले नसल्याची बाबही समोर

### एकाच ठिकाणी अनेक वर्षांपासून बस्तान

पंड्या प्रकरणामुळे वादात सापडलेले डॉ. प्रशांत शेटे गेल्या कित्येक वर्षापासून एकाच ठिकाणी मनपा मुख्यालयात होते. रुग्णालय परवानगी व नुतनीकरणाचे काम त्यांच्याकडे होते. दरम्यान मुख्यालयात गेल्या काही वर्षापासून असल्याने त्यांच्यावर कृपा आहे तरी कोणाची ? असा सवाल आरोग्य विभागात केला जात होता. मात्र पंड्या प्रकरणात डॉ. शेटे वादात सापडल्यानतर आयुक्तांनी त्यांना हटवले.

# राजीवनगरला कमी दाबाने पाणी पुरवठा

**नाशिक :** राजीवनगर येथे प्रभाग ३०, ३१ मध्ये पाणीपुरवठा कमी दाबाचा होत असून, तक्रार करूनही अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप स्थानिक रहिवाशांकडून केला जात आहे. अनेक दिवसांपासून वैभव कॉलनी, स्टेट बँक कॉलनी, एलआयसी कॉलनी, विशाखा कॉलनी, नीलमणी सोसायटी या परिसरात पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. परिसरातील नागरिकांनी आता थेट आयुक्त खत्री यांच्या दालनात हंडा मोर्चा नेण्याचा इशारा दिला आहे.

# पदवीधर मुख्यध्यापकांना वेतनवाढ द्यावी

## आ. दराडेंकडे शिक्षक संघटनांच्या मागण्या

**नाशिक : प्रतिनिधी**

शिक्षकांची वैद्यकीय बिले मंजूर करण्याबरोबरच निवडश्रेणी मंजूर करावी. तसेच एनपीएस लागू करणे, मुख्याध्यापकांना वेतनश्रेणी लागू करणे, पदवीधर मुख्याध्यापकांना एक वेतनवाढ देणे, वैद्यकीय रजा, अर्जित रजा मंजूर करून वेतन काढणे यासह विविध मागण्या शिक्षक संघटनांनी शिक्षक आमदार किशोर दराडे यांच्याकडे केली.

महापालिकेत आ. किशोर दराडे यांच्या उपस्थितीत शिक्षक दरबाराचे आयोजन केले असता यावेळी महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना, महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक सेना, आदिवासी शिक्षक संघटना, नपा, मनपा शिक्षक संघटना, समता शिक्षक परिषद, महाराष्ट्र राज्य शिक्षक समिती, मागासर्वगीय शिक्षक संघटना, महाराष्ट्र राज्य शिक्षक व शिक्षकेतर सेना, मनपा शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी विविध मागण्या दराडे यांच्यासमोर मांडल्या. या मागण्यांमध्ये संचमान्यतेनूसार शाळांमध्ये शिक्षक देणे, वरिष्ठ श्रेणी फरक बिल देणे, सेवाज्येष्ठतेने केंद्रप्रमुख पद भरणे, जून २०१४ ला पदवीधरपदी नियुक्त केलेल्या पदवीधर शिक्षकांना वेतनश्रेणी लागू करणे, शाळेत कामासाठी कामाठी यांची नियुक्ती करणे, मनपा शाळा क्रमांक ३२,६१,७२,७९ व ८९ मध्ये वर्गखोल्यांची व्यवस्था करणे या मागण्या दराडे यांच्यासमोर मांडण्यात आल्या. यावर सबंधित मनपा प्रशासनाने तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश दराडे यांनी दिले. दरम्यान शिक्षणाधिकारी बी. टी. पाटील यांनी अनेक प्रकारची कामे चुकीच्या पद्धतीने केली असून त्यामुळे विद्यार्थी पटसंख्येवर, शाळेच्या गुणवत्तेवर व प्रमाणिक शिक्षकांवर परिणाम झाल्याचा आरोप शिक्षक संघटनांनी केला. शिवाय अनियमित बदल्या झाल्या असून त्या रद्द करण्यात याव्या. यासह इतर मागण्या करुन पाटील यांच्या तक्रारींचा पाढाच शिक्षक, शिक्षक संघटना पदाधिकाऱ्यांनी आ. दराडे यांच्यासमोर मांडला. यावेळी सुरेश खांडबहाले, राजेश दाभाडे, शिवाजी शिंदे, सचिन चिखले, चंद्रकांत गायकवाड, बाबुराव सांगळे, सुदाम धोंगडे, उमेश महाले, धर्मेंद्र बागुल,शिरीष पाडवी,आरिफ शेख आदि उपस्थित होते.

# उन्हाच्या कडाका अन आईस्क्रीमचा थंडावा

## वाढत्या उष्णतेमुळे आईस्क्रीमच्या मागणीत वाढ

**नाशिक : प्रतिनिधी**

**यंदाच्या वर्षी उन्हाळ्याच्या झळा अधिक तीव्र झाल्या आहेत. शहराचा पारा चाळीशी पार गेला. उन्हांच्या तीव्र झळांनी अंगाची काहिली होत आहे. उन्हापासून बचावासाठी नागरिक वेगवेगळे उपाय करत आहे. सनकोट , गॉगल, टोपी, स्टोल यांच्या वापरासह थंड पदार्थांच्या मागणीत वाढ झाली आहे. विशेष करून आइस्क्रीमच्या मागणीत प्रचंड वाढ झाली आहे.**





उन्हाच्या तीव्र झळापासून काही प्रमाणात थंडावा मिळावा यासाठी शहरातील आईस्क्रीम पार्लर गर्दीने फुलून जात आहेत. वाढलेल्या उष्णतेमुळे बच्चेकंपनीसह अबालवृध्दही आइस्क्रीम खाण्याचा मनमुराद आनंद घेताना दिसत आहे. वाढलेल्या मागणीमुळे आइस्क्रीम व्यावसायिकांना सुगीचे दिवस आले आहेत. मात्र यंदा उन्हाळा अधिक तीव्र असल्याने मार्च महिन्यापासूनच आईस्क्रीमची मागणी वाढली आहे. तसेच लग्नसराईमुळेही आईस्क्रीमला चांगलीच मागणी आहे.

### रसवंतीगृह व ज्युस सेंटर गजबजले

उन्हाच्या तीव्र झळापासून दिलासा मिळावा म्हणून आईस्क्रीम पार्लरसह रसवंतीगृह व ज्युस सेंटरवर गर्दी होत आहे. त्यामुळे यंदाच्या तीव्र उन्हाळ्यामुळे व्यवसायायिकांना अच्छे दिन आले आहेत.

> मागील वर्षीच्या तुलनेत आइस्क्रीमच्या मागणीत १५ ते २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. मात्र यंदा किंमती स्थिर असून तापमानात वाढ झाल्याने व शाळांना सुट्टी असल्याने आईस्क्रीमला अधिक मागणी आहे. तसेच नवीन फ्लेवर्सच्या आईस्क्रीमला ग्राहकांची अधिक पसंती मिळत आहे.
>
> – **आशिष नहार** (सचिव, इंडियन आईस्क्रीम मॅनिफॅक्चर असोसिएशन )

### या आईस्क्रीमला मागणी

**व्हॅनिला, बटरस्कॉच, चॉकलेट, टूटी फ्रुटी, पेरू, जामुन**

| आइस्क्रीम दर (२५० ग्रॅम) | |
|---|---|
| व्हनिला | १२०रू |
| बटरस्कॉच | १३०रू |
| चॉकलेट | १३०रू |
| टुटी फ्रुटी | १३० रू |
| ब्लॅक करंट | १४० रू |
| मॅगो | १४० रू |
| स्ट्रॉबेरी | १३० रू |
| पायनापल | १३० रू |



पाकिस्तानच्या नाड्या आवळल्या! भातासह कापूस शेती संकटात पान ३

नाशिक आज
# गांवकरी



बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाच्या ऑडिटोरियमचा पुनर्विकास करावा पान ३

■ नाशिक, मंगळवार, दि. २९ एप्रिल २०२५



## महत्त्वाचे ▶▶▶▶

### माडसांगवीला आज हनुमान यात्रा उत्सव



**माडसांगवी :** येथील ग्रामदैवत हनुमान यात्रा उत्सवास मंगळवार(दि. २९) पासून सुरवात आहे. अक्षतृतीयेच्या आदल्या दिवशी माडसांगवी गावची यात्रा भरते. यात्रेच्या दिवशी सकाळी हनुमान मूर्तीस जलाभिषेक करण्यात येतो. मांडव डहाळीचा कार्यक्रम करून गुलाल उधळण करतात. सायंकाळी गाव परिसरात खेळणी, रहाट पाळणे, दुकाने लागतात. मळ्याखळ्यातील रहिवाशी मंदिरात येऊन नारळ वाढवितात. सायंकाळी गावातून छत्रपती शिवाजी महाराज मावळे बजरंग बली आदीपात्रांची सवाद्य मिरवणूक काढली जाते. रात्री आठ वाजता ग्रामस्थांना करमणुकीसाठी लोकनाट्य तमाशाचे आयोजन करण्यात येते. दुसऱ्या दिवशी पहाटे हजेरीचा कार्यक्रम होऊन उपस्थितांना नारळ देण्यात येतो. यात्रेसाठी ग्रामपंचायतीसह गावातील तरुण मंडळी नियोजन करतात.

### नाशिकरोडला म. बसवेश्वर जयंतीची तयारी



**नाशिकरोड :** महात्मा बसवेश्वर जन्मोत्सवानिमित्त एक मे रोजी सायंकाळी ५.३० वाजता जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेची भव्य रथयात्रा काढण्यात येणार आहे. बिटको चौकातून सुरू होणारी ही सवाद्य रथयात्रा अनुराधा मार्गे जैन भवन येथे येईल. जैन भावनात समाजाच्या वतीने सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत विविध सांस्कृतिक कार्यक्रम होतील. त्यातच १० ते दुपारी २ वाजेपर्यंत मोफत वैद्यकीय तपासणी शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ७.३० वाजता महाआरतीनंतर जैन भवनात महाप्रसादाने दिवसभराच्या या कार्यक्रमाची सांगता होणार आहे. लिंगायत फाउंडेशन नाशिकरोड, नाशिक व महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाच्या महिला अध्यक्षा वीरपत्नी जयाताई रेंगे, ज्येष्ठ अध्यक्ष रवी दंदणे, युवा अध्यक्ष प्रवीण झळके हे याकामी कार्यरत आहेत. निलेश हिंगमिरे, सौ. मयुरी गडकरी यांचेही आयोजनाकामी योगदान लाभत आहे.

### ज्येष्ठ नागरिकांसाठी रमली गीतांची मैफिल

**नाशिकरोड :** जेल रोड येथील संत ज्ञानेश्वर माऊली ज्येष्ठ नागरिक संघातर्फे सभासद अशोक कासार यांनी जेष्ठ नागरीकांसाठी ज्ञानेश्वर मंदिर येथे गीत मैफिल सादर केली. अध्यक्ष दिलीप उगले, सचिव सुदाम सातभाई, अनिल गुरव, मनोहर नागरे, सुदाम खाचने, अविनाश देशपांडे, शिवाजी पाटील, प्रकाश माळवे, प्रभाकर बडगुजर, मोतीराम थोरात, के. मा. मोरे, किशोर वडनेरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कासार यांनी मराठी आणि हिंदी गाणी, भावगीते सादर केली. या जगण्यावर शतदा प्रेम करावे..., सखी मंद झाल्या तारका..., एक वार पंखा वरुनी फिरो तुझा हात..., ही चाल तुरू तुरू उडती केस भुरू भुरू..., बडी दुरसे आये है प्यार का तोहफा लाये है.... आदी गीतांना चांगला प्रतिसाद मिळाला. अशोक कासार यांच्यातर्फे प्रेक्षकांना अल्पोपहार देण्यात आला.

### जिल्ह्यातील दहा तलाठ्यांना पदोन्नती

**नाशिक :** जिल्हाधिकारी कार्यालयात मंडळ अधिकारी संवर्गातील रिक्त असलेल्या पदांची भरती करताना तलाठी या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे. त्यानुसार दहा कर्मचाऱ्यांना मंडळ अधिकारी म्हणून पदोन्नती देण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसूल विभागातील तलाठी या पदावर कार्यरत असलेल्या १० कर्मचाऱ्यांना मंडळ अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. त्यात मालेगाव दोन, निफाड दोन, कळवण दोन , तर दिंडोरी, बागलाण, येवला, चांदवड येथील प्रत्येकी एक तलाठी यांना मंडळ अधिकारी म्हणून पदोन्नती देण्यात आली आहे. नव्याने पदोन्नती झालेल्या अधिकाऱ्यांची नियुक्ती सिन्नर दोन, चांदवड दोन, तर सटाणा, येवला, कळवण, त्रंबकेश्वर सुरगाणा या तालुक्यांमध्ये प्रत्येकी एक मंडल अधिकारी नियुक्त करण्यात आला आहे. या पदोन्नतीमुळे तलाठी वर्गामध्ये उत्साहाचे वातावरणातून सध्या महसूल विभागात बदल्यांचा सत्र सुरू आहे. पदोन्नती झालेल्या तलाठी गटातील कर्मचाऱ्यांमध्ये शिवाजी भोये, संतोष घोडेराव, श्रीमती पूजा आठवले, सुनील काकड, श्रीमती सुप्रिया जाधव संतोष हिरे, श्रीमती गौरी दासरी, श्रीमती गीता कनोजे, श्रीमती योगिता भोये, मनोज अहिरराव यांचा समावेश आहे.

### उष्मा वाढल्याने जनजीवन विस्कळित



**कसबे सुकेणे :** निफाड तालुक्यातील कसबे सुकेणे गाव व परिसरात सध्या उष्णतेचा पारा वाढल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे.तापमानाने चाळिशी ओलांडल्याने सर्वसामान्य माणसाप्रमाणे पशुपक्ष्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. वाढत्या उष्णता मानाने, उकाड्याने अंगाची लाही लाही होत आहे. वाढत्या उकाड्याने त्रस्त झालेले नागरिक ऊसाचा रस लिंबू सरबत ताक मठ्ठा व शीतपेयांचा आधार घेत आहेत. कडक उन्हामुळे शेतीच्या कामांचे वेळापत्रक, नियोजन बदलण्यात आले आहे. वाढता उष्माबघता सकाळी लवकर उठून शेतीची कामे करण्यावर भर दिला जात आहे दुपारी चार वाजेपर्यंत विश्रांती घेऊन राहिलेली कामे केली जात आहेत सध्या गाव व परिसरात उन्हाळ कांदा काढण्याचे व चाळीत साठवण्याचे काम करण्यात बळीराजा व्यस्त आहे वाढत्या उष्णतेमुळे लोकांना अनेक आजारांशी सामना करावा लागत आहे त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने वाढत्या उष्णता मानावर मात करण्यासाठी उन्हात काम करणे प्रवास करणे आदी गोष्टी टाळून आरोग्याचे नियम पाळणे आपल्या स्वास्थ्यासाठी महत्त्वाचे आहे. अजून साधारणता दीड महिना या प्रतिकूल वातावरणाशी सामना करावा लागण्याची शक्यता आहे.

### गुरुवारी राष्ट्रीय महासत्संग मेळावा

**नाशिक :** अखिल भारतीय श्री स्वामी सेवा बाल संस्कार व युवा विभागातर्फे गोल्फ क्लब मैदानावर गुरुवारी (दि. १) अण्णासाहेब मोरे यांच्या उपस्थितीत 'राष्ट्रीय महा सत्संग मेळावा तथा गुरु-मातृ-पितृ पाद्यपूजन सोहळा' होणार आहे. पिढी सुसंस्कारित, निर्व्यसनी, सदाचारी आणि कर्तृत्ववान निर्माण व्हावी या उद्देशाने श्री स्वामी सेवा मार्गाच्या बालसंस्कार व युवा प्रबोधन विभागातर्फे विविध उपक्रम राबविले जातात. सकाळी नऊ वाजता उद्घाटन होईल. सर्वांसाठी ज्ञान दालने दिवसभर पाहण्यासाठी उपलब्ध असतील, कार्यक्रमाच्या ठिकाणी पालक पाल्य समुपदेशनासह गर्भसंस्कार शिबिर होईल.

# धोकादायक गुलमोहरांच्या ३५ झाडांवर उद्यान विभाग चालवणार कुऱ्हाड

## आयटीआय सिंग्नल ते माऊली लॉन्स वाहनधारकांसाठी डेंजर झोन

**नाशिक : प्रतिनिधी**

**पावसाळ्यात गुलमोहर प्रजातीची झाडे उन्मळून पडण्याची भीती असते. यामुळे जीवितहानी होण्याची शक्यता असते. दरम्यान, उद्यान विभागाकडून शहरातील धोकेदायक झाडांची माहिती घेऊन ती तोडली जात असून सातपूर आयटीआय सिंग्नल ते माऊली लॉन्स मार्गावरील ४८ गुलमोहरांपैकी तब्बल ३५ धोकेदायक झाडे तोडली जाणार आहे. ही झाडे तोडावी अशी मागणी नागरिकांकडून वारंवार केली जात आहे. गुलमोहरांच्या झाडांमुळे आतापर्यंत पाच जणांना जीव गमवावा लागला आहे. मात्र उद्यान विभागाने हे प्रकरण गांभीर्याने घेतले आहे.**



यापूर्वी सातपूरच्या शिवाजीनगर परिसरातील पाझर तलाव भागात सायंकाळी कामावरुन परतणाऱ्या युवकावर गुलमोहर वृक्ष कोसळल्याने यात त्याचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. विशेष म्हणजे याआधी आयटीआय सिग्नलजवळ रिक्षावर गुलमोहरचे झाड कोसळून महिलेसह चालकाचा असा दोघांचा मृत्यू झाला होता. शहरातील धोकेदायक गुलमोहर वृक्षांचा प्रश्न पुन्हा समोर आला आहे. उद्यान विभागाकडून शहरातील सहाही विभागात धोकादायक गुलमोहर वृक्षाची शोध मोहीम सुरु आहे. अनेक ठिकाणी गुलमोहराची झाडे मुख्य वाहतुकीच्या रस्त्यालगतच आहे. त्यामुळे पावसाळ्यात ही वृक्ष धोकेदायक बनतात. उद्यानने गुलमोहर झाडाच्या धोकेदायक फांद्यांची छाटणी सुरु केली असून सुकलेली व वाकलेली झाडे काढून घेतली जात आहे.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर धोकादायक वृक्ष काढण्याचे काम दरवर्षी केले जाते. मात्र मागील काही दिवसांपासून शहरात गुलमोहराची झाडे कोसळून अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे नागरिकांकडून चिंता व्यक्त केली जात असून महापालिकेने ही झाडे काढून घेण्याची मागणी होत आहे. अनेकदा गुलमोहर वृक्ष धोकादायक असल्याचे दिसत नाही. मात्र ते आतूनच ठिसूळ असल्याने वाऱ्यामुळे ते कधीही कोसळू शकतात. त्यामुळे वाहनधारकांनी अशा झाडाखाली थांबू नये. असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



❛ आयटीआय सिग्नल परिसरातील ३५ झाडे सुरक्षेच्या दृष्टीने काढली जाणार आहेत. शहरात धोकेदायक झाडांची माहिती घेतली जात असून नागरिकांच्या तक्रारी प्राप्त होत आहे. आवश्यकतेप्रमाणे फांद्या किंवा सरसकट संबंधित झाड काढले जाईल.

**–विवेक भदाणे,** उद्यान अधिक्षक, मनपा

### शहरात एक लाख गुलमोहर झाडे

विदेशी आणि अत्यंत कमकुवत असलेल्या गुलमोहराची शहरात संख्या एक लाखापर्यत असण्याचा अंदाज आहे. दहा ते पंधरा वर्षाचे हे झाड होताच ते कधीही कोसळण्याची भीती आहे. हे झाड विदेशी असून आणि कमकुवत असूनही शहरात पालिकेच्या वतीने ही झाडे दहा वर्षापूर्वी लावलीच कशी असा सवाल केला जातो आहे.





# गडकरी चौकात ट्रकवर गुलमोहराचे झाड कोसळले

## घटनेत ट्रकचालक बचावला

**नाशिक : प्रतिनिधी**

शहरात गुलमोहराची झाडे कोसळण्याची श्रृखंला सुरुच असून सोमवारी (दि.२८) गडकरी चौकात एक ते सव्वा वाजेच्या सुमारास चालत्या ट्रकवर अचानक गुलमोहराचे झाड कोसळल्याची घटना घडली. सुदैवाने यात ट्रकचालक वाचल्याने पुढील अनर्थ टळ्ला. अमोल हरिदास पिल्ले (रा. शांतीनगर, पुणे) असे ट्रकचालकाचे नाव असून या अपघातात चालक किरकोळ जखमी झाला. दरम्यान हे झाड थेट ट्रकच्या समोरच्याच बाजुवर पडल्याने यात समोरील काच फुटून केबिनचा अक्षरशः चेंदामेंदा झाला.

ट्रकवर झाड कोसळ्याचे समजताच जवळ्च असलेल्या अग्निशमन दलाच्या शिंगाडा तलाव येथील मुख्यालयातून जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. पेट्रोल कटरच्या साहाय्याने झाडाच्या फांद्या कापून रस्ता रहदारीसाठी मोकळा केला. याबाबत माहिती अशी की, सोमवारी गडकरी चौकातून चांडक सर्कलकडे शासकीय विश्रामगृहाच्या रस्त्यावर गुलमोहराचे भले मोठे झाड दुपारच्या सुमारास अचानकपणे चालत्या ट्रकवर कोसळले. ट्रकचालक अमोल पिल्ले केबिनमध्येच अडकले. केबिनवर समोरील बाजूने झाड पडल्याने ते बालंबाल बचावले. अपघातानंतर अग्निशमनच्या जवानांसह नागरिकांनी ट्रकमध्ये अडकलेल्या पिल्ले यांना बाहेर काढले. गडकरी चौकातून चांडक सर्कलमार्गे सातपूर एमआयडीसीकडे पिल्ले हे कुरियरचा माल भरलेला ट्रक (एमएच १४ एचजी ८६१५) घेऊन जात होते. त्याच वेळी अवघ्या एक मिनिटात रस्त्यालगत असलेला गुलमोहराचा वृक्ष ट्रकवर समोरील बाजूने कोसळला. गडकरी चौकासह त्र्यंबकरोड, नाशिक-पुणे महामार्गा व शहरातील इतर मुख्य वाहतुकीच्या रस्त्यावर कमकुवत असलेली विदेशी प्रजातीची झाडे मोठया प्रमाणात असून ते कधीही कोसळण्याची शक्यता असते.

# ५८३ पेक्षा जास्त सेवा ऑनलाइन

## जिल्हाधिकारी शर्मा : सेवा हक्क दिनानिमित्त कार्यक्रम

**नाशिक : प्रतिनिधी**

राज्य शासनाने दहा वर्षांपूर्वी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम लागू केला. या अधिनियमानुसार विविध विभागांच्या ५८३ पेक्षा जास्त सेवा ऑनलाइन दिल्या जातात. या सेवा आणखी कमी कालावधीत देण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. या कायद्याच्या माध्यमातून विविध सेवा विहित कालावधीत देण्यात येतात. डिजिटल तंत्रज्ञानाच्या वापरातून या सेवा कमी कालावधीत शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न व्हावेत, अशी अपेक्षा जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी येथे व्यक्त केली.



सेवा हक्क दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात काल सोमवार दि २८ रोजी सकाळी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे, उपजिल्हाधिकारी तुकाराम हुलवळे (प्रशासन), बागलाणच्या उपविभागीय अधिकारी कल्पना ठुबे, जिल्हा पुरवठा अधिकारी कैलास पवार, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र परदेशी (सामान्य प्रशासन), राज्य सेवा हक्क आयोगाच्या नाशिक कार्यालयातील कक्ष अधिकारी उदय काण्णव आदी उपस्थित होते. यावेळी सेवा हक्क कायद्यात उत्कृष्ट कामगिरी बजावल्याबद्दल बागलाणच्या उपविभागीय अधिकारी श्रीमती ठुबे, सिन्नरचे तहसीलदार सुरेंद्र देशमुख आदींचा जिल्हाधिकारी श्री. शर्मा यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तसेच जिल्हाधिकारी श्री. शर्मा यांनी उपस्थितांना सेवा हक्क दिनानिमित्त शपथ दिली. सेवा घेतल्यानंतर संबंधित नागरिकांकडून अभिप्राय मागविण्यात येणार आहेत. जेणेकरून या कायद्याची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी करता येईल. ई सेवा केंद्र चालकांनी अद्ययावत राहत या सेवा विहित कालावधीत देण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच नागरिकांची सनद, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाविषयी नागरिकांमध्ये जनजागृती करावी, असेही जिल्हाधिकारी श्री. शर्मा यांनी सांगितले. उपजिल्हाधिकारी श्री. हुलवळे म्हणाले की, शासनाच्या विविध विभागाच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या अधिसूचित सेवा वेळेत देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क हा कायदा दहा वर्षांपूर्वी

अस्तित्वात आला. आता दरवर्षी २८ एप्रिल हा दिवस सेवा हक्क दिवस म्हणून साजरा केला जाईल. ई सेवा केंद्र चालकांनी या कायद्याची प्रभावीपणे जनजागृती करावी, असेही त्यांनी सेवा हक्क अधिनियमाचा सविस्तर आढावा सादर केला. तहसीलदार गणेश जाधव यांनी प्रास्ताविक केले. अपर तहसीलदार अमोल निकम यांनी आभार मानले. यावेळी विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, नागरिक, ई सेवा केंद्राचे प्रतिनिधी उपस्थित होते.



# टॅली सॉफ्टवेअर लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक गोयंका यांची निमास भेट

## टॅलीने आरएनडी सेंटर नाशिक येथे सुरू करावे : निमा

**नाशिक : प्रतिनिधी**

भारतातील अग्रगण्य एकाउंटिंग प्रणाली म्हणजे टॅली सॉफ्टवेअर लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक तेजस गोयंका यांनी निमा कार्यालयास सदिच्छा भेट दिली. टॅली ने आपले आरएनडी सेंटर नाशिक येथे सुरू करण्यासाठी निमाच्या पधादीकाऱ्यांनी त्यांना आग्रही मागणी केली. यावेळी त्यांच्या समवेत अनय नानगरे, मृदूल दीक्षित, अंकुर सक्सेना सह अन्य अधिकारी उपस्थित होते.

नवीन उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी निमाच्या प्रयत्नांचे कौतुक करून लघु आणि मध्यम उद्योगांसाठी टॅली या अकाउंटिंग सॉफ्टवेअरचा कसा फायदा होईल यावर तेजस गोयंका यांनी सविस्तरपणे मार्गदर्शन केले. आगामी काळात टॅली सॉफ्टवेअरमध्ये नवीन तंत्रज्ञान म्हणजे इआरपी प्रणाली कशी समाविष्ट केली जाऊ शकते यावरही विचारमंथन झाले. नाशिकच्या उद्योगांना उत्पादन प्रक्रियेत यामुळे फायदे मिळतील, असे निमाचे अध्यक्ष आशिष नहार यांनी सांगितले. दर तीन महिन्यांनी निमा कार्यालयात टॅली सॉफ्टवेअरच्या नवीन आवृत्त्या आणि जागरूकता कार्यक्रमावर परिसंवाद आयोजित करण्यात येईल, असेही त्यांनी पुढे नमूद केले. टॅली नेहमी एकाउंटिंग प्रणाली सोपी करण्यासाठी प्रयत्नशील असते व यामुळे व्यवसाय उद्योग मधे कशी प्रगती होईल यासाठी विचार करीत असते असे गोएंका यांनी सांगितले.

यावेळी निमाचे उपाध्यक्ष मनीष रावल, सचिव राजेंद्र अहिरे, कोषाध्यक्ष राजेंद्र वडनेरे, मिलिंद राजपूत, शशांक मणेरीकर, श्रीकांत पाटील, विरल ठक्कर, कैलास पाटील, नितीन आव्हाड, गोविंद बोरसे आदी उपस्थित होते.

# पेन्शनसाठी अर्धवेळ ग्रंथपालांची सेवा ग्राह्य

## उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार ग्रंथपालास जुन्या पेन्शन योजनेचा लाभ

**नाशिक : प्रतिनिधी**

**पेन्शनसाठी १ नोव्हेंबर २००५ नंतरची पूर्णवेळ ग्रंथपाल म्हणून नियुक्ती असलेल्या याचिकाकर्त्यांची पूर्वीची अर्धवेळ ग्रंथपाल म्हणून केलेली सेवा ग्राह्य धरीत संबंधित याचिकाकर्त्यास आठ आठवड्यांच्या आत पेन्शनचा लाभ देण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने शासनाला २०२० मध्ये दिले होते. शिक्षण विभागाने या आदेशाचे पालन पाच वर्षांनी करून याचिकाकर्त्या ग्रंथपालास न्याय दिला आहे.**



नाशिक एज्युकेशन सोसायटीच्या शाळेमधून सेवानिवृत्त झालेल्या ग्रंथपाल प्रेमा हेरकल यांनी १९९१ ते २००५ या काळात अर्धवेळ ग्रंथपाल म्हणून सेवा केली होती. २००६ मध्ये पूर्णवेळ झाल्या व २०१५ मध्ये सेवानिवृत्त झाल्या. सेवानिवृत्तीनंतर सेवानिवृती वेतनाचा प्रस्ताव शाळेने जिल्हा परिषदेमार्फत लेखा महासंचालक मुंबई यांच्याकडे मंजुरीसाठी पाठवला असता संबंधित कार्यालयाने १ नोव्हेंबर २००५ नंतरची पूर्णवेळ नियुक्ती असल्यामुळे सेवानिवृती वेतनाचा लाभ नाकारून प्रस्ताव परत पाठवला. त्यामुळे हेरकल यांनी अर्धवेळची सेवा ग्राह्य धरून सेवानिवृत्तिवेतनाचा लाभ मिळण्यासाठी मुंबई उच्च न्यायालय याचिका दाखल केली होती.

न्यायालयाने याचिका मान्य करून निकाल प्रेमा हेरकल यांचे बाजूने दिला व सेवानिवृती वेतनाचा लाभ लागू करण्याचे आदेश दिले होते. ॲड प्रणिता हिंगमिरे यांनी याचिकाकर्त्याचे वकील म्हणून कामकाज पहिले. शिक्षण विभागाकडे पाठपुरावा करूनही यश न आल्यामुळे शासनाच्या विरोधात अवमान याचिका दाखल करावी यासाठी प्रेमा हेरकल यांनी वकिलांकडे आग्रह केला. मात्र ॲड प्रणिता हिंगमिरे यांनी सांगितल्यानुसार शासनाकडे व ए. जी. ऑफिसकडे पत्रव्यवहार करण्यास सांगितला. अखेर या प्रयत्नांना २०२५ मध्ये यश आले व ए. जी. ऑफिसने शिक्षण विभागास प्रेमा हेरकल यांचा सेवानिवृती वेतनाचा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश शिक्षण विभागास दिले.

यामुळे याचिकाकर्त्या प्रेमा हेरकल यांना सेवानिवृती वेतनासह सर्व आर्थिक लाभ मिळाल्यामुळे आनंद व्यक्त केला असून ॲड प्रणिता हिंगमिरे यांचे आभार मानले आहे. या निकालामुळे इतर पात्र अर्धवेळ ग्रंथपाल जे सेवानिवृतीवेळी पूर्णवेळ होते त्यांना सेवानिवृती वेतनाचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

ग्रंथालय शिक्षक परिषदेचे राज्य अध्यक्ष विलास सोनार यांनी निकालानुसार लाभ मिळाल्यामुळे ॲड. प्रणिता हिंगमिरे व याचिकाकर्त्या ग्रंथपाल प्रेमा हेरकल यांचे अभिनंदन केले आहे.

❛ अर्धवेळ सेवा असली तरी ती १०० टक्के अनुदानित शाळेतील सेवा असल्याचे न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे. या निकालामुळे अन्य पात्र ग्रंथपालांना पुन्हा याच कामासाठी न्यायालयात जावे लागू नये अशी अपेक्षा आहे. ॲड. प्रणिता हिंगमिरे व याचिकर्त्या ग्रंथपाल प्रेमा हेरकल यांचे अभिनंदन.

– **विलास सोनार.** राज्य अध्यक्ष महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे ग्रंथालय शिक्षक विभाग.

अग्रलेख

# बेताल वक्तव्ये

पहलगाम दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप लोकांचा जीव गेल्यानंतर सर्वपक्षीय बैठकीत दहशतवादाविरुद्ध आणि दहशतवादाची पाठराखण करणार्या देशाविरुद्ध कारवाई करण्याचा पूर्ण अधिकार सर्वच पक्षांनी सरकारला दिला. सरकारच्या भूमिकेशी सर्वच पक्ष सहमत असतील, अशी भूमिका विरोधी पक्षांनी घेतली. या उपरही काही नेते वेगवेगळ्या टीकाटिप्पणी करत आहेत. पक्षाच्या भूमिकेच्या विरोधात जाऊन टिप्पणी करुन प्रसिद्धी मिळविण्याचा प्रयत्न केला जात असलो, तरी सर्वच पक्षांच्या प्रमुखांनी आपल्या नेत्यांना ताकीद देऊन पक्षांच्या भूमिकेच्या विपरित भूमिका घेऊन नये, असे बजावले पाहिजे. काँग्रेसचे नेते बेताल वक्तव्ये करत असल्याचे दिसून येत आहे. पक्षाचे सरचिटणीस खासदार जयराम रमेश यांना यावर भूमिका स्पष्ट करणे भाग पडले. यापूर्वी महत्त्वाची पदे भूषवलेल्या काँग्रेसच्या काही नेत्यांनी, वरिष्ठ नेत्यांनी जी काही मते मांडली आहेत. त्या मतांशी काँग्रेस पक्षाचा काहीही संबंध नाही. त्यांची ती वैयक्तिक मते आहेत, असे सांगण्याची वेळ जयराम रमेश यांच्यावर आली. काँग्रेस कार्यकारी समितीने केलेल्या ठरावात व्यक्त झालेली आणि पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे व विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सर्वपक्षीय बैठकीत मांडलेली मते हीच पक्षाची मते आहेत, असेही रमेश यांनी स्पष्ट केले. सध्याच्या अत्यंत संवेदनशील काळात जसजशी परिस्थिती निर्माण होईल तसतसे काँग्रेस कार्यकारिणी, पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी पक्षाची भूमिका स्पष्ट करतील, असेही रमेश यांना आपल्या नेत्यांना सांगणे भाग पडले. काही नेत्यांनी बेताल वक्तव्ये केल्याने काँग्रेस पक्ष भाजपाच्या निशाण्यावर येत असून, या पक्षाचे नेते पाकिस्तान धार्जिणे आहेत की काय? असा प्रश्न भाजपाकडून उपस्थित केला जात आहे. भारताने सिंधू पाणी कराराला स्थगिती देण्याचा निर्णय घेतल्यानंतर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सैफुद्दीन सोझ यांनी बेताल वक्तव्य करुन पक्षाला अडचणीत आणले. पाकिस्तानसाठी सिंचन आणि पिण्यासाठी पाणी अत्यंत महत्त्वाचे आहे. नदीचे पाणी वळवले नाही, तर पंजाब आणि जम्मू-काश्मीर ही राज्ये पूर्णपणे पाण्याखाली जातील. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील अनेक युद्धांनंतरही सिंधू करार कायम आहे. हा करार पाकिस्तानची जीवनवाहिनी आहे, असे सोझ यांनी म्हटले आहे. करार स्थगित केल्याने तशी परिस्थिती निर्माण होणारच आहे. पण, पहलगाम हल्ल्यात आपला सहभाग नाही, ही पाकिस्तानची भूमिका भारताने मान्य केली पाहिजे, असे म्हणत सोझ यांनी त्या देशाची वकालत केली, असा अर्थ निघतो. यापूर्वीच्या अनेक दहशतवादी हल्ल्यांत पाकिस्तानचाच हात असल्याचे दिसून आलेले असताना पहलगाम हल्ल्यात आपला सहभाग नाही, ही पाकिस्तानची भूमिका मान्य कशी करायची? हा प्रश्न आहे. यावर विरोधी प्रतिक्रिया उमटल्यानंतर त्यांनी माघार घेऊन, आपल्या विधानाचा चुकीचा अर्थ काढण्यात आल्याचे म्हणत सारवासारव केली. मूळात अशा प्रकारचे मत व्यक्त करण्याची गरज होती काय? हाच प्रश्न आहे. कर्नाटकात काँग्रेसची सत्ता असून, या राज्याचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी युध्दाची गरज नाही, असे वक्तव्य केले. मूळात सरकारला सर्व अधिकार पक्षाने दिल्यानंतर तसे काही म्हणणे योग्य ठरत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वपक्षीय बैठकीला उपस्थित राहायला हवे होते, पण ते त्यावेळी बिहारमध्ये प्रचारात व्यस्त होते, असे सिद्धरामय्या यांनी म्हटले आहे. यात तसे काही वावगे नाही. काँग्रेस नेते मणिशंकर अय्यर यांनीही दहशतवादी हल्ला हा फाळणीच्या न सुटलेल्या प्रश्नांचा परिणाम आहे काय? असा सवाल केला होता. आजच्या भारतात एखाद्या मुस्लिमाला आपण स्वीकारले आहे असे वाटते का? एखाद्या मुसलमानाला आपला आदर केला जात आहे असे वाटते का? या प्रश्नांची उत्तरे शोधायला हवीत, कुठल्याही मुस्लिमाला विचारले तरी उत्तरे मिळतील, असे अय्यर यांनी म्हटले होते. अत्यंत संवेदनशील परिस्थितीत असे काही प्रश्न उपस्थित करणे गरजेचे होते काय? असाही प्रश्न या निमित्ताने उपस्थित होणारा आहे. महाराष्ट्रातील काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार कोणत्याही विषयावर बोलण्यास तयारच असतात. माजी विरोधी पक्षनेते असलेल्या वडेट्टीवारांना तसे सरकारवर टीका करण्याची हौसच असते. दहशतवाद्यांनी धर्म विचारुन लोकांना मारल्याचे समोर आले आहे. पण, वडेट्टीवारांनी वेगळाच प्रश्न उपस्थित केला. दहशतवाद्यांना धर्म विचारायला वेळ आहे का? असा सवाल त्यांनी केला. यावर महाराष्ट्रात मोठा वाद निर्माण झाला. लोकांची हत्या करायला दहशतवाद्यांना वेळ कसा मिळाला? हा प्रश्न वडेट्टीवार यांना पडला नाही. पाकिस्तानचे पाणी बंद करायला सरकारला २० वर्षे लागतील, असेही ते म्हणाले. भारताने युध्द करू नये, असे सिद्धरामय्या म्हणत असताना वडेट्टीवार म्हणतात युध्द करायचे असेल, तर करा. काँग्रेसच्या नेत्यांनी जी काही बेताल वक्तव्ये केली आहेत ती काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल यांना पसंत पडलेली दिसत नाहीत. मूळात राष्ट्रीय प्रश्नावर काँग्रेसने आपली भूमिका स्पष्ट केली असताना काही राज्यांतील नेत्यांनी वेगळे मतप्रदर्शन व्यक्त करणे योग्य आहे काय? हाच प्रश्न खरगे आणि राहुल गांधी यांना पडला असेल. म्हणूनच जयराम रमेश यांना पक्षाची भूमिका स्पष्ट करण्यासाठी पुढे येणे भाग पडले. सर्वपक्षीय बैठकीनंतर खरगे किंवा राहुल गांधी यांनी सरकारच्या निर्णयावर काही प्रतिक्रिया दिलेली नाही किंवा टीकाटिप्पणीही केलेली नाही. पक्षाने सर्वपक्षीय बैठकीत मांडलेली भूमिका लोकांसमोर मांडण्याची जबाबदारी राज्यांतील नेत्यांची घेतली असती, तर खरगे आणि राहुल गांधी यांना बरे वाटले असते. पण, या नेत्यांनी आपल्याला प्रसिद्धी मिळावी, या हेतूने अशी विधाने केली असल्याचे दिसत आहे. पण, ती त्यांची वैयक्तिक भूमिका आहे. त्यांचे मत काँग्रेसचे नाही, हे सांगण्याची वेळ येणे म्हणजे पक्षात काही ताळमेळ नसल्याचे दिसते. मूळात एखाद्या राष्ट्रीय प्रश्नावर प्रादेशिक नेत्यांनी काय बोलावे, हेच काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी आधीच सांगितले असते, तर जयराम रमेश यांच्यावर खुलासा करण्याची वेळ आली नसती. यापुढे वादग्रस्त वक्तव्ये करू नयेत, अशी ताकीद काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी दिली, तर पक्षावर खुलासा करण्याची वेळ येणार नाही.

# डार्विनचा उत्क्रांतीवाद व काश्मीर समस्या!

डार्विनचा उत्क्रांतीवाद हाच संपूर्ण कश्मीरमुक्तीचे पूर्ण समाधान करणार आहे. एवढेच नव्हे तर डार्विनचा उत्क्रांतीवाद सिद्ध करण्याचे दायित्व आता भारतीयांचेच आहे, असे विचारपूर्वक विधान करण्यास जागा आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन आणि कार्यकारणभाव या दृष्टीने मांडणी करता, असे लक्षात येते की भारतीयांच्या हातीच आता डार्विनचा उत्क्रांतीवाद सिद्ध करण्याचे दायित्व आले आहे. सोबतच कश्मीरची समस्या मुळातून निपटून काढण्याचे कार्य सुद्धा. यातूनच एक हजार वर्षांपूर्वीचे कश्मीर निर्माण करण्याचे पुण्यकर्म ही आता भारतीयांच्या हाती आले आहे. इसवी सन हजार पूर्वी शत प्रतिशत हिंदू व बौद्ध धर्मीयांचा अध्यात्म व तत्वज्ञानाचा नंदनवन असेलेल कश्मीर पुढील चारशे वर्षात पूर्ण मुस्लिम बहुल राज्य होते. आणि मुस्लिम शासकांच्या हाती सत्ता जाते. हे कश्मीरने बघितले आहे.

**डार्विनचा उत्क्रांतीवाद सर्वांनाच मार्गदर्शक**

पृथ्वीवर प्राणीमात्र कसे निर्माण झाले? एकपेशीय प्राण्यापासून बहुपेशीय तर सरपटणाऱ्या प्राण्यापासून महाकाय डायनॉसोर पर्यंत हे प्राणीविश्व कसे निर्माण झाले? याचे गुढ अनेक तत्त्वज्ञानाच्या शाखांनी सांगायचा प्रयत्न केलेला आहे. धर्ममार्तंड व त्यांच्या धर्मग्रंथांनी, मानववंशशास्त्रज्ञांनी तसेच वैज्ञानिकांनी वेगवेगळ्या पद्धतीने मांडणी केली आहे. मात्र चार्ल्स डार्विन याने विसाव्या शतकात म्हणजे १८५८ ला ओरिजिन ऑफ स्पेसीज हा उत्क्रांतवादावरचा संशोधन ग्रंथ तयार केला. त्यास DARWIN'S THEORY OF EVOLUTION असे म्हणतात. चार्लस डार्विनने पूर्ण विश्वाचे अभ्यास पर्यटन करून, मिळालेले विविध प्रकारचे कास्ट जीवाश्म, हाडे, सांगाडे इत्यादी साहित्य गोळा केले. डझनभर भल्या मोठ्या गोडाऊन्समध्ये साठवलेले सर्व पुरावे यांचे काही वर्ष वर्गीकरण केले. संशोधन करून अभ्यासपूर्ण ग्रंथ सिद्ध झाला तो मओरिजिन ऑफ स्पेसीजफ जीवसृष्टीतील बदलांचे वर्णन करणारा हा शोध ठरला. एका सामान्य पूर्वजापासून सर्व जीव उत्क्रांत होत गेले. पर्यावरणाशी जुळणारे गुणधर्म जीवाला वारसा हक्काने मिळतात. पण ज्या जीवांना हे गुणधर्म अधिक मिळतात ते अधिक यशस्वी होतात. किंवा जे जीव हे गुणधर्म अधिक विकसित करतात ते अधिक यशस्वी होतात.

या ग्रंथामुळे धर्ममार्तंड घाबरले! त्याकाळच्या चर्च पोप यांनी यावर आक्षेप घेतला. कारणही तसेच होते. चार्ल्स डार्विन ने आपल्या ग्रंथामध्ये माकडापासून माणूस तयार झाला, असा अफलातून निष्कर्ष काढला होता. यालाच डार्विनचा उत्क्रांतवाद जग ओळखतो. याच्या साह्याने विज्ञानाच्या अनेक शाखांचा अभ्यास करणे सोपे झाले.

**पहेलगाम व धर्मांध आतंकी !**

२२ एप्रिल २०२५ ला पहलगाम येथे पाकिस्तान पुरस्कृत धर्मांध दहशतवाद्यांनी संपूर्ण भारतभरातून आलेल्या निष्पाप पर्यटकांमधील फक्त पुरुषांना त्यांचा धर्म विचारून मारले. म्हणून त्यांचा उल्लेख धर्मांध दहशतवादी असा केलेला आहे. पर्यटकाचा अचूक धर्म शोधण्यासाठी त्यांना मुस्लिम धर्मग्रंथातील आयते व कलमं येतात का? याचीही तपासणी केली. ती म्हणावयास लावली. आणखीही शरीर तपासणी केल्याचे समजते. जगण्यातली सुरक्षा हे एकच तत्व मानले तर शिक्षण अभ्यासक म्हणून मला असे वाटते की राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये देशाने मुस्लिमेत्तर लोकांना (म्हणजे मुस्लिमांच्या शब्दात काफर लोकांना) यामध्ये हिंदू, बौद्ध, जैन, इत्यादी भारतीय धर्म येतात. या सर्वांना मुस्लिमांच्या पवित्र ग्रंथातील आयतं आणि कलमं शिकवली पाहिजे आणि तीही सफाईदारपणे यायला हवी. म्हणजे आपल्याला जिवंत राहता येईल. काय बिकट आणि चिंतनीय परिस्थिती आपल्या देशात ओढवली आहे. संपूर्ण जगामध्ये हिंदू धर्मांचे हक्काचे एकमेव राष्ट्र म्हणजे भारत. असो!

**बीड आणि कर्तृत्ववान प्रागतिक माकडे**

तर अशा ह्या चार्ल्स डार्विनचा उत्क्रांतीवाद प्रात्यक्षिक रूपाने सिद्ध करण्याचे दायित्व भारतीयांवर येऊन पडले आहे. नुकतीच एका हिंदी वृत्तपत्रांमध्ये ही बातमी आली आहे. महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यात ही घटना घडली. घटना पुढील प्रमाणे. गावाचे नाव माजलगाव. काही कुत्र्यांनी एका माकडाच्या पिलाला जिवंत मारले. त्या परिसरातील माकडांना हे कळले सर्व माकड संतापले! क्रोधित झाले! त्यानंतर त्या माकडांनी विचार केला. त्या गावातील एक दोन नव्हे तर २५० कुत्र्यांना मारून टाकले.




मारण्याची पद्धतही अफलातून! कुत्र्याला पकडायचे झाडावर किंवा उंच घरावर नेऊन वरून फेकून द्यायचे. गावकऱ्यांना हे पूर्णपणे समजेपर्यंत गावात फक्त एक कुत्रा शिल्लक राहिला होता. त्याला मात्र गावकऱ्यांनी संरक्षण देण्याचे ठरवले. सिताराम नावाचा माणूस त्या एकमेव कुत्र्याला संरक्षण देत होता. माकडांच्या टोळीने कुत्र्यासह सीतारामला फरफटत नेले.



भारता भोवतालचे अस्वस्थ वर्तमान

हेमंत चोपडे
७३५०७०५०९१

सितारामच्या विरोधाने, कसाबसा कुत्र्याचा जीव वाचला. पण! सितारामचा पाय मात्र मोडला. ही ती बातमी! प्राणिजगतात वंशसातत्याची सहजप्रवृत्ती असते. नैसर्गिक परिस्थितीतील बदलांना तोंड देऊन जे जगू शकतात, त्यांनाच वंशसातत्य टिकवता येते. अशा बदलांना तोंड देऊन वंश चालवू शकणारे हेच खरे जगण्यायोग्य सजीवङ्ग.

जगामध्ये ख्रिश्चन, मुसलमान बौद्ध धर्मीय भरपूर देश आहेत. म्हणजे प्रत्येक धर्माचे एकापेक्षा जास्त देश पृथ्वीवर आहेत. एक ते दोन हजार शतक मागे गेल्यास आपला अखंडप्राय भरतखंड कसा होता? हे आपणास कल्पना करता येऊ शकते. त्याचे खंडन होत होत आजच्या स्थितीला आलो आहोत तो स्वतंत्र भारत आहे. तो पंधरा ते वीस टक्केपर्यंत येऊन पोहोचला आहे. आतापर्यंत अखंडप्राय भरतभूमीपासून विलग होणारा शेवटचा देश म्हणजे पाकिस्तान त्याचा क्रमांक चोविसावा लागतो. आपण असेच इतिहास विसरून निर्विर्य, निर्बल, असहाय, दीन पराजित मनोवृत्तीने राहिल्यास, तुम्हीच कल्पना करा काय होईल ते? नाहीतरी भूतकाळात शेंडीचा कर भरलेला आहेच, आता आयतं कलम यांचा अभ्यास करणारं! जिवंत राहायचे ना!

**काशीचे माकडांचे व भाकडांचे महासंमेलन**

१९ जानेवारी १९२९ ला स्वातंत्र्यवीर सावरकरांचा एक लेख वृत्तपत्रात प्रसिद्ध झाला होता. लेखाचं नाव होतं 'काशीतील दोन संमेलने माकड महासंमेलन व भाकड महासंमेलन' बातमीचा सारांश असा, काशी जवळील ज्ञानवापी जवळ एक मर्कटांचे म्हणजे माकडांचे महासंमेलन पार पडले. नुकतेच विजेच्या तारांना स्पर्श होऊन माकडे अपघातग्रस्त होत होती. प्रयोगशील व तारतम्याने निष्कर्ष काढणाऱ्या माकडांनी असे ठरवले की, 'या तारांमध्ये काहीतरी दाहक द्रव्य आहे. जे शत्रुवत आहे. आपण परिवर्तनवादी आहोत. काशीच्या शास्त्रांसारखे थोडीच आपण जडमतवादी, बद्ध आहोत.

दुसरे भाकड महासंमेलन, ते महंत शास्त्री यांचे संमेलन होते. तिथेच अज्ञान वापीजवळ. त्या संमेलनात असे ठरले की, परिस्थितीला वश व्हायचे नाही आपल्या पारंपारिक निष्ठा निर्णय अविचल ठेवावे. आपल्यात कोणताही बदल करायचा नाही.'

**तंत्रविज्ञान युगातले आम्ही आधुनिक भारतीय**

आम्ही कुणाचा वारसा आहोत. आम्ही कुणाचा वारसा जपणार आहोत. आम्ही भारतीय असे नव्हतो, आम्हाला विजयाचा इतिहास आहे. पराजयाचा नाही! परिस्थिती पाहून जो बदल करतो. जो बदल स्वीकारतो, तोच टिकून राहतो. जो जड आहे! बद्ध आहे! बदल स्वीकारत नाही तो नष्ट होतो! संपतो! निसर्गाच्या नियमानुसारही जो बलवत्तर आहे तोच जगण्यास लायक आहे. निसर्गातील प्राणीमात्रातील मादीसुद्धा सक्षम व बलवान नरच पुढील संतती निर्माण करण्यासाठी निवडते. शक्तीहीन बलहीन असलेल्या व्यक्तीच्या अहिंसावादाच्या जपाला जग केराची टोपलीच दाखवते. बलवान माणसाची अहिंसाच शोभून दिसते. मसऱ्हायवल द फिटेस्टफ तत्त्वज्ञानही बलवत्तरांनाच जगण्याचा हक्क आहे असे सांगते. माकडांना कळले ते भारतीयांना कळेल का! हिंदूंना कळेल का! हिंदू या शब्दांमध्ये भारतातले धर्म-जैन व बौद्ध यांचाही समावेश होतो. हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. पूर्व भारताच्या बाजूकडील राज्य तसेच संपूर्ण काश्मीरमध्ये हिंदूंची व बौद्धांची असंख्य मंदिरे होती. त्या मंदिरामध्ये मुर्त्यांसह सजावट करिता फार मोठ्या प्रमाणात सोने, हिरे वापरले होते. इसवी सन हजार नंतर आक्रमकांनी सर्व मुर्त्या मंदिरांचा विच्छेद करून तोडफोड करून सोने पातळ करून घेऊन गेले. काही दशकापूर्वीच आपण दूरदर्शनच्या पडद्यावर अफगाणिस्तानमधील महाकाय तथागत गौतम बुद्धाच्या मुर्त्या, तालिबान्यायांनी स्फोट घडवून उद्ध्वस्त केल्याचे, याची देही याची डोळा षंढ होऊन बघितले आहेचना! हा इतिहास भारत धर्मीय विसरणार आहेत का?

मानसे हे माकडांचे विकसित रूप आहे, यावर आता विश्वासच बसत नाही. विद्यमान भारतातील प्रगत तंत्रज्ञान व आधुनिक जीवन जगणारी माणसे हे माकडांचे विकसित रूप नसून आजची विद्यमान माकडे हीच विकसित रूपात दिसून येतात, असे म्हणणे चुकीचे होणार नाही.

डार्विनच्या उत्क्रांतीवादाला मान्यता मिळालेली आहे. त्यावरून पुढील संशोधन करून निर्णय निष्कर्ष सुद्धा सिद्ध झाले आहेत. आता वेळ आहे भारतीयांवर! ज्यांना हा उत्क्रांतीवाद सिद्ध करायचा आहे. यांच्या नसानसात परिवर्तनाचे, संयमशील शक्तीचे प्रात्यक्षिक करण्याचा आता दिवस उजाडला आहे. जे त्यांच्या पूर्वापार पिढीद्वारा आलेल्या अधिक प्रमाणात असलेल्या सक्षम जनुकगुणांचे गुणदर्शन दाखवण्याची वेळ आली आहे. पुढ्यात येणाऱ्या संघर्षाला तोंड देऊन आपल्यात बदल करून वंश सातत्य टिकवून जिवंत राहतात. तेच जगण्यास सक्षम असतात. त्यांचा इतिहास लिहिला जातो.

...हीच वेळ आहे बदलण्याची. इतिहासात केलेल्या चुकांपासून शिकण्याची. सर्व भारतीयांना सोबत घेऊन चालण्याची जे भारतावर प्रेम करतात त्यांच्या निष्ठा भारतावर आहेत या मातीवर आहेत. हे वर्तन आणि शिकवण हाच खऱ्या अर्थाने सम-धर्मसमभाव आहे. हीच सहिष्णुवृत्ती आहे जीवन जगण्याची! अक्साईचीन, पाकिस्तान व्याप्त काश्मीर, पाकिस्तान दृष्ट्या आझाद काश्मीर हे सर्व विभाग स्वातंत्र्याची पहाट पाहण्यास उत्सुक आहेत स्वातंत्र्याचा श्वास घेण्यास उत्सुक आहेत! प्रश्न आहे तो आपण त्यांचे स्वागत करणार आहोत का!

# आरोग्याशी खेळणाऱ्या भेसळखोरांना रोखा

पनीरपासून तयार करण्यात आलेले डिशेस सर्वचजण चवीने खातात. लहान मुलांना तर पनीर खूपच आवडते. मात्र ह्याच सर्वांच्या आवडत्या पनीर मध्ये भेसळ होत असल्याची आणि राज्यभरात विकले जाणारे पनीर बनावट असल्याचा मुद्दा श्रीगोंद्याचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी विधानसभेत मांडला. राज्यात विकले जाणारे पनीर बनावट असल्याची चर्चा नागरिकांमध्ये होतीच आमदार साहेबांनी त्यावर शिक्कमोर्तब केले. बनावट पनीर तयार करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित या महत्वाच्या मुद्द्यावर चर्चा घडवून आणल्याबद्दल आमदार पाचपुते साहेब तसेच भेसळ खोरांवर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार साहेब यांचे मनापासून आभार.

बनावट पनीर तयार करून नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या या महाभागांना शिक्षा झाली पाहिजेच पण केवळ बनावट पनीर तयार करणारेच नव्हे तर सर्व भेसळखोरांवर कारवाई झाली पाहिजे. राज्यात भेसळ खोरांनी उच्छाद मांडला आहे. राज्यात दूध भेसळीचे प्रकार वाढत आहे. एक लिटर दुधात काही रासायनिक पदार्थ टाकून वीस लिटर दुध बनवण्याचे प्रकार सुरू आहे. मागील वर्षी अहिल्यानगर जिल्ह्यातच दूध भेसळीचे रॅकेट उघडकीस आले होते . दौंडमध्येही म्हशींनी अधिक दूध द्यावे यासाठी त्यांना प्रतिबंधक इंजेक्शन दिले जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. केवळ दुधातच नव्हे तर मिठाईमध्येही भेसळ केली जात आहे. मिठाई बनवताना वापरण्यात येणाऱ्या खव्यामध्येही भेसळ असल्याच्या अनेक घटना राज्यात उघडकीस आल्या आहेत. बर्फी किंवा खवा दुधापासूनच बनतो अशी सर्वसामान्यांची धारणा असते. फराळाचे पदार्थ बनवण्यासाठी त्याचा उपयोग केला जातो. लहान मुलांना हे खव्यापासून तयार केलेले पदार्थ खूप आवडतात. त्याला मागणीही जास्त असते त्यामुळेच वर्षानुवर्षे पडलेली दुधाची पावडर, स्टार्च, वनस्पती तूप, दूध याबरोबरच काही प्रमाणात रसायन मिसळून तयार केलेला निकृष्ट खवा भेसळखोर बाजारात खपवीत आहेत. काही भेसळखोर दर्जेदार खाद्यान्नाच्या ब्रॅण्डसशी साम्य असणारे बनावट, कमअस्सल तब्येतीला घातक पदार्थ सारख्याच दिसणाऱ्या वेष्टनातून विकत आहेत. हे पदार्थ शहरातील प्रश्नार्थक वातावरणात बनवले जातात. हे पदार्थ रस्त्यांवर कुत्री मांजरी फिरण्याच्या ठिकाणी वाळत घातलेले दिसतात. भेसळखोरांमुळे ग्राहकांचे आरोग्यच धोक्यात आले आहे. दुध, मिठाई आणि खाद्यपदार्थांत भेसळ होत असल्याने ग्राहकांना अनेक आजरांना सामोरे

श्याम ठाणेदार
९९२२५४६२९५

जावे लागत आहे. भेसळयुक्त दुधामुळे ग्राहकांचे हृदय, किडनी व यकृत निकामी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. दुधातील भेसळीमुळे शरीर वाढीसाठी आवश्यक असणारे लायसीन हे अमिनो आम्ल शरीरास उपलब्ध होत नाही परिणामी लहान मुलांच्या शरीर वाढीवर परिणाम होऊन शरीराची वाढ खुंटते शिवाय उच्च रक्तदाब व हृदय विकारासारखे आजार जडतात. भेसळयुक्त पदार्थांचे सेवन केल्याने आगामी वीस वर्षांत देशातील तीस ते चाळीस टक्के लोकांना कर्करोग होऊ शकतो असा इशाराच जागतिक आरोग्य संघटनेने दिला आहे. हे एक प्रकारचे स्लो पॉईजन आहे. हे स्लो पॉईजन देऊन ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणारे मोठे रॅकेट राज्यभरात कार्यरत आहे. या रॅकेटचा आणि त्यात सहभागी असलेल्या समाज कंटकांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करायला हवी. ही भेसळखोरी रोखण्याची जबाबदारी अन्न व औषध प्रशासनाची अर्थात एफ डी ए ची आहे. ते त्यांची जबाबदारी पार पाडतही आहे त्यामुळे अन्न व औषध प्रशासनाच्या नवी मुंबई परिमंडळ २ ला अलीकडेच नवी दिल्लीच्या ईट राईट इंडियाच्या उपक्रमात सहभागी होऊन २०२२ - २३ साठीचे पाच लाखांचे पारितोषिक अन्न सुरक्षा मानके प्राधिकरणाचकडून प्राप्त झाले आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदनच मात्र एफ डी आयच्या कारवाईत सातत्य नाही. कारवाईत सातत्य नसल्यानेच भेसळखोरांना त्यांची भीती वाटेनाशी झाली आहे. एफ डी आय चा वचक नसल्यानेच राज्यात भेसळखोरी वाढली आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. दूध आणि खाद्य पदार्थातील भेसळखोरी रोखण्यासाठी पोलीस आणि एफ डी ए ने एकत्र येऊन राज्यभरात धडक मोहीम राबवायला हवी. कमी श्रमात अधिक नफा मिळवण्यासाठी ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या या भेसळखोरांना थेट फाशीचीच शिक्षा द्यायला हवी.

# दहा वर्षांत १७ कोटी भारतीयांची गरिबी हटली

जागतिक बँकेच्या अहवालानुसार गेल्या दशकभरात भारताने सुमारे १७ कोटी लोकांना आत्यंतिक गरिबीतून बाहेर काढले आहे. रोजगाराच्या संधी सुद्धा मोठ्या प्रमाणात निर्माण केल्या आहेत. विशेष म्हणजे गरिबी व श्रीमंती यातील फरक सुद्धा ७.७ टक्के घटून तो १.७ टक्क्यावर आला आहे, ही बातमी नुकतीच वाचली.

आत्यंतिक गरिबीचा दर १६.२ टक्क्यावरून कमी होऊन तो आता २. ३ टक्के एवढा राहिला आहे. साहजिकच भारत आता लोअर मिडल इन्कम देशाच्या यादीत पोहचला आहे. देशातील गरिबीचा दर सुद्धा ६१.८ टक्क्यावरून २६.७ टक्क्यावर आला आहे. २१-२२ पासून नोकरी करणारांचे प्रमाण सुद्धा वाढलेले आहे. महिलांमध्ये रोजगार वाढले आहेत. गरिबी निर्मुलनात उत्तर प्रदेश, महाराष्ट्र बिहार, पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेश या पाच राज्यांनी चांगली कामगिरी केली आहे. असलेल्या नोकऱ्यामध्ये ७७ टक्के नोकऱ्या तात्पुरत्या आहेत

शांताराम वाघ
पुणे

तर २३ टक्के कायम आहेत. करोनाकाळापासून केंद्र सरकार देशातील ८० कोटी जनतेला मोफत धान्य देत आहेत ही गरिबी हटविण्यात फार मोठी बाब आहे. पंतप्रधान मोदीनी आपल्या दहा वर्षांतील काळात ही प्रगती केली आहे ही बाब अभिनंदनीय आहे. या पुढील काळात लोकांना काम दयावे लागणार आहे. सरकारने सुद्धा लोकांना विविध कामे पुरवावीत म्हणजे क्रयशक्ती वाढेल.

**अपघातात दररोज ४६ मृत्यू**

चालू वर्षाच्या तीन महिन्यात राज्यात रस्ते अपघातात दररोज ४६ मृत्यू होत आहेत . गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा चार टक्क्याची वाढ झालेली आहे. विशेष म्हणजे सर्वाधिक मृत्यू हे वेगात वाहन चालविल्यामुळे होत आहेत. या बरोबरच

जनमनाचे प्रतिध्वनी

राज्यात अपघातात जखमीमध्ये सुमारे ८ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. सर्वाधिक अपघात हे वाहतूक नियमांचे भंग केल्यामुळे झालेले आहेत. अतिवेग हे त्यातील एक महत्वाचे कारण आहे. घाटातील उतारावर गाडी चालक वाहन बंद करून नेतात. अनेकदा ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात सुद्धा मोठ्या प्रमाणावर अपघातास आमंत्रण दिल्यासारखे आहे. अलीकडे मोबाईल चालवत वाहन चालविणारांचे प्रमाण खूपच जास्त होत चालले आहे तसेच टायरमध्ये हवेचा दाब योग्य प्रमाणात नसणे हे सुद्धा अपघाताला एक कारण ठरू शकते. एकूणच हे अपघात कमी करण्यासाठी वाहन चालकांनी प्रयत्न करण्याची जरुरी आहे. दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढतच आहे. अशावेळी नियमांचे पालन करणे ही आवश्यक बाब आहे. वेगावर नियंत्रण ही सुद्धा आवश्यक बाब आहे. सरकारने सुद्धा यावर कडक कायदे केले पाहिजेत व मोठ्या प्रमाणात दंड आकारणी केली पाहिजे. तरच या अपघाताला आळा बसेल.

## पैशाच्या आसक्तित राहू नये



विचारधन

कामवासना आणि पैसा ही दोन्ही परमार्थाला विघातक आहेत; पण मला जर कोणी विचारले की, 'त्यातल्या त्यात जास्त घातक कोणते ते सांगा', तर मी सांगेन की, 'पैसा हा त्यांतल्या त्यात परमार्थाला जास्त हानिकारक आहे. पैसा हा भगवंताची निष्ठा फार कमी करतो.' भगवंताने आपल्याला पैसा दिला आहे, तो आपण सत्पात्र आहोत म्हणून का दिला आहे ? यासाठी, भिकाऱ्याला पैसा देताना उगीच वाद घालू नये. तसे करणे म्हणजे काही न करण्याची बुद्धी होय. 'स्व' देऊन मग सर्व ठेवले तरी चालेल, पण 'सर्व' देऊन 'स्व' ठेवला तर ते मात्र चालणार नाही; म्हणजेच, 'मी देतो' ही भावना राहिली तर सर्वच देणे वाया जाते. मुख्य म्हणजे त्यातली वासना गेली पाहिजे, तर खरे सुख लागते. देह हा पाया धरून त्यावर इमारत बांधू लागलो तर इमारत पक्की कशी होणार ? मी 'माझा' देह म्हणतो, पण ताप येणे न येणे, इजा होणे न होणे, हे आपल्या हातात आहे का ? 'मी माझे रक्षण करीन' असे म्हणतो, पण वाटेत ठेच लागून पडल्यावर लोकांनी मला घरी आणावे लागते; म्हणजे जीवित किती परस्वाधीन आहे ! देहाने कितीही कार्य केले तरी ते कळसाला नाही पोहोचणार. अभिमानाने केलेले कार्य कसे कळसाला पोहोचणार? एक भगवदिच्छेने कार्य केले तरच ते शेवटाला जाते.

गांवकरी®
('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह)
गांवकरी प्रकाशन
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय : 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

## बाजार - कंपन्या - मनोरंजन

### महाराष्ट्र दिनी प्रवाहवर 'बनवाबनवी)

**मुंबई :** गेली ३६ वर्ष महाराष्ट्राचं भरभरुन मनोरंजन करणाऱ्या अशी ही बनवाबनवी सिनेमाची जादू जराही कमी झालेली नाही. प्रेक्षकांचा हा लाडका सिनेमा १ मे ला म्हणजेच महाराष्ट्र दिनाला




प्रवाह पिक्चरवर पहाता येणार आहे. अशी ही बनवाबनवी सिनेमातले धनंजय माने इथेच रहातात का, सत्तर रुपये वारले, हा माझा बायको पार्वती हे संवाद आजही प्रेक्षकांच्या मनात घर करुन आहेत. याचं श्रेय जातं ते दिग्दर्शक आणि अभिनेते सचिन पिळगांवकर, पद्मश्री महाराष्ट्र भूषण अशोक सराफ, अभिनेत्री निवेदिता जोशी, सुप्रिया पिळगांवकर, अश्विनी भावे आणि दिवंगत अभिनेते लक्ष्मीकांत बेर्डे, सुशांत रे आणि सुधीर जोशी यांना. या दिग्गजांनी आपल्या सहजसोप्या अभिनयाने या कलाकृतीला अजरामर केलं.

### पुरवठा थांबल्याने सुकामेव्याचे दर वाढले

**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने अमृतसरमधील अटारी-वाघा सीमा बंद केली आहे. सीमा बंद झाल्यामुळे भारत आणि अफगाणिस्तानमधील व्यापारावरही परिणाम होऊ लागला आहे. या सीमा बंदमुळे गेल्या चार दिवसांपासून अफगाणिस्तानातून येणाऱ्या सुक्या मेव्याचा पुरवठा थांबला आहे. याचा परिणाम बाजारपेठेत दिसून येत आहे. व्यापाऱ्यांच्या मते, अफगाणिस्तानातून होणाऱ्या पुरवठ्यात अडथळा आल्यामुळे सुक्या मेव्याच्या किमती १० ते १५ टक्क्यांनी वाढल्या आहेत. पुढील एक महिना हीच परिस्थिती राहिली, तर सुक्या मेव्याचे भाव गगनाला भिडू शकतात, असा व्यापाऱ्यांचा दावा आहे. अफगाणिस्तान, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, इराण आणि दक्षिण आफ्रिका यासह अनेक देशांमधून खारी बाओलीला सुकामेवा पुरवला जातो. एका व्यावसायिकाने दिलेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून अफगाणिस्तानातून येणारा सुक्या मेव्याचा पुरवठा थांबला आहे. त्यामुळे बाजारात खळबळ माजली आहे. आंतरराष्ट्रीय फळं आणि काजू संघटनेचे संचालक रवींद्र मेहता म्हणाले की, पहलगाममधील घटना अत्यंत दुःखद आहे. सीमा बंद झाल्याने अफगाणिस्तानसोबतचा व्यापार ठप्प झाला आहे. अफगाणिस्तानातील सुमारे ९० टक्के माल भारतात येतो. यामध्ये अंजीर, हिंग, पिस्ता, मनुका, जिरं, मनुका यांचा समावेश आहे. चार दिवसांपासून पुरवठा बंद झाला आहे.

### अनंत अंबानी रिलायन्स इंडस्ट्रीजचे कार्यकारी संचालक

**मुंबई :** देशातील सर्वात मोठी खासगी कंपनी, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडने अनंत अंबानी यांची कंपनीच्या कार्यकारी संचालकपदी नियुक्ती केली आहे. १ मे पासून पुढील ५ वर्षांसाठी अनंत हे पद



भूषवतील. ते मुकेश अंबानी यांचे धाकटे पुत्र आहेत. अनंत अंबानी २०२३ पासून कंपनीत नॉन-एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर आहेत. रिलायन्सने एक्सचेंज फाइलिंगमध्ये ही माहिती दिली. कंपनीने म्हटले आहे की, रिलायन्सच्या संचालक मंडळाने २५ एप्रिल रोजी झालेल्या बैठकीत मानव संसाधन, नामांकन आणि मोबदला समितीच्या शिफारशींचा विचार केला आणि नॉन-एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर अनंत एम. अंबानी यांची पूर्णवेळ कार्यकारी संचालक म्हणून नियुक्ती केली.

### सुरक्षेसाठी महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल स्थापणार

#### पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांची माहिती

**मुंबई :** पर्यटन क्षेत्राला चालना देण्यासाठी आणि पर्यटकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यासाठी राज्य शासनाने 'महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल (पर्यटन मित्र)' स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. पर्यटन क्षेत्रातील वाढत्या संधी, नैसर्गिक, सांस्कृतिक विविधतेचा विचार करता या सुरक्षा दलाच्या माध्यमातून पर्यटकांना सुरक्षित पर्यटनाचा अनुभव देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली. पर्यटन मंत्री देसाई म्हणाले की, राज्यातील पर्यटन स्थळे, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा यांची माहिती पुरविणे हा या पर्यटन सुरक्षा दलाचा मुख्य उद्देश असणार आहे. १ ते ४ मे, २०२५ दरम्यान पार पडणाऱ्या सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर महोत्सवात 'महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल' प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात येणार आहे. राज्यात येणाऱ्या पर्यटकांच्या मनात सुरक्षितेची भावना निर्माण व्हावी, तसेच राज्यातील संस्कृती, इतिहास, पर्यटनस्थळे, कायदा, नियम, पर्यटनाविषयी आवश्यक माहिती देण्यासाठी राज्यात पर्यटन स्थळावर पर्यटकांच्या सेवेसाठी पर्यटन पोलिसांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्यात येणार आहे. यासाठी राज्य सुरक्षा मंडळाने व मेस्कोने त्यांच्याकडे असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती लवकरात लवकर सादर करण्याचे निर्देश पर्यटन विभागाने दिले आहेत. 'पर्यटन पोलीस' या संकल्पनेमुळे पर्यटन स्थळावरील शाश्वत पर्यटन पद्धती टिकवून ठेवण्यासाठी व शाश्वत पर्यटनच्या संवर्धनासाठी प्रयत्न करतील.

### पाकिस्तानमध्ये १ कोटी लोक उपासमारीच्या उंबरठ्यावर

**नवी दिल्ली :** एकीकडे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकिस्तानचा विकास दर कमी राहण्याची शक्यता वर्तवली असतानाच दुसरीकडे जागतिक बँकेने पाकिस्तानला मोठा इशारा दिला आहे. चालू आर्थिक वर्षात सुमारे १ कोटी लोकांना उपासमारीचा सामना करावा लागेल, असा इशारा जागतिक बँकेने दिला आहे. यासोबतच गरिबीची पातळीही झपाट्याने वाढणार असल्याची माहिती अहवालात दिली आहे. पाकिस्तानातील वाढत्या गरिबीचा इशारा देण्यापूर्वी जागतिक बँकेने आपल्या अहवालात तेथील आर्थिक विकास दर २.७ टक्के राहील असा अंदाज व्यक्त केला होता. जागतिक बँकेने यासाठी पाकिस्तानातील कठोर आर्थिक धोरणांना जबाबदार धरले आहे. जागतिक बँकेने आपल्या अहवालात म्हटले आहे की, शाहबाज शरीफ यांचे सरकार वार्षिक वित्तीय तुटीचे लक्ष्य पूर्ण करण्यात अयशस्वी ठरले आहे आणि यामुळे जीडीपीच्या तुलनेत पाकिस्तानवरील कर्जाचा बोजा आणखी वाढण्याची अपेक्षा आहे. अहवालानुसार, जागतिक बँकेने म्हटले आहे की हवामानामुळे पाकिस्तानच्या संपूर्ण कृषी उत्पादनावर परिणाम होईल आणि तांदूळ, बाजरी यासारख्या प्रमुख पिकांवर वाईट परिणाम होईल. यामुळं पाकिस्तानमधील सुमारे १० दशलक्ष लोक (बहुतेक ग्रामीण भागात) उपासमारीच्या उंबरठ्यावर पोहोचतील. अन्नटंचाई, गरिबी, बेरोजगारीमध्ये वाढ होणार असल्याची माहिती अहवालात देण्यात आली आहे. कृषी, उत्पादन आणि इतर कमी वेतनाच्या सेवांसारख्या प्रमुख क्षेत्रांवर नकारात्मक परिणाम होईल, ज्यामुळे दैनंदिन वेतन देखील वाढू शकणार नाही अशी माहिती अहवालात देण्यात आली आहे. जागतिक बँकेने पाकिस्तानसाठी आणखी एक चेतावणी दिली आहे, की चालू आर्थिक वर्षात त्यांच्या लोकसंख्येपैकी सुमारे २ टक्के किंवा १९ लाख लोक दारिद्र्यरेषेखाली येतील. शिवाय, पाकिस्तानचे रोजगार-ते-लोकसंख्येचे प्रमाण ४९.७ टक्के आहे, जे विशेषतः तरुण आणि महिलांमधील कमी श्रमिक बाजारातील सहभागाचे प्रमाण दर्शवते. पाकिस्तानची सध्या आर्थिक स्थिती बिकट झाली आहे. मोठ्या प्रमाणात लोकसंख्या ही दारिद्र्यरेषेखाली असल्याचे समोर आले आहे.

# पाकिस्तानच्या नाड्या आवळल्या! भातासह कापूस शेती संकटात

**नवी दिल्ली :** सिंधू जल करार स्थगित करण्याच्या भारताच्या निर्णयाचा पाकिस्तानवर मोठा परिणाम होणार आहे. यामध्ये नैऋत्य मान्सूनमधील कृषी उत्पादनाचाही समावेश होतो. भारताच्या निर्णयामुळं बासमती तांदळासह कापूस आणि गहू पिके पाकिस्तानमध्ये धोक्यात येणार आहेत.

सिंधू जल करार हा स्थगित करणं हा भारताचा मास्टर स्ट्रोक असल्याचं तज्ज्ञांनी म्हटलं आहे. सिंधू नदीवरील जलाशय त्यांच्या क्षमतेच्या ३० टक्क्यांपेक्षा कमी भरले आहेत. पाकिस्तानच्या खैबर पख्तुनख्वा प्रांतात असलेल्या तरबेला धरणात सध्या फक्त ३० फूट पाणी शिल्लक आहे. महिनाभरापूर्वी धरणात मृतसाठ्याच्या पातळीपेक्षा केवळ नऊ फूट पाणीसाठा होता, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. कालवे कोरडे पडू नयेत यासाठी पाकिस्तानने वरच्या भागातील मंगला धरणातून २१ फूट पाणी भरले आहे. जूनच्या शेवटच्या आठवड्यात किंवा जुलैच्या पहिल्या आठवड्यातच उपखंडाच्या वायव्य भागात पाऊस सुरू होईल. यावेळी भारताच्या निर्णयाचा



पाकिस्तानमधील शेतीवर मोठा परिणाम होऊ शकतो.१५ मे च्या सुमारास हिमालयातील हिमनद्या वितळण्यास सुरवात होईल. भारतात, हिमनदीतील पाणी आणि पाऊस यांच्यातील जलाशयाची साठवण क्षमता ५९:४१ आहे. भारत आपल्या जलाशयातील पाणी पाकिस्तानला न सोडता किमान सप्टेंबरपर्यंत आणि त्यानंतरही राखू शकतो. याचा परिणाम खरीप हंगामात पाकिस्तानातील कापूस आणि तांदूळ उत्पादनावर होणार आहे. पाकिस्तानच्या पंजाब प्रांतात १५ एप्रिलच्या आसपास कापसाची पेरणी सुरू होते. पिकाला उगवण आणि वाढीसाठी पाण्याची आवश्यकता असेल. पाणीटंचाईमुळे कापूस उत्पादनावर परिणाम होणार आहे. पाकिस्तानात दरवर्षी सुमारे ७० लाख गाठी (१७० किलो) कापूस उत्पादन करतो. आधीच कापसाच्या टंचाईचा सामना करत असलेल्या वस्त्रोद्योगावर याचा परिणाम होऊ शकतो. भारताच्या निर्णयाचा तांदूळ उत्पादनावर आणखी परिणाम होऊ शकतो. पाकिस्तानमध्ये दरवर्षी सुमारे १० दशलक्ष टन तांदळाचे उत्पादन होते. पाकिस्तानमध्ये १५ मेच्या आसपास भात पेरणी सुरु होते. पंजाब आणि सिंधसारख्या राज्यांना सिंचनाची गरज आहे. हे भाग कालव्याच्या पाण्यावर अवलंबून आहेत. बोअरवेल असलेले मोठे शेतकरी सोडले तर इतर सर्वांना याचा फटका बसू शकतो. बासमती तांदळाच्या बाजारपेठेतही भारताला फायदा होण्याची शक्यता आहे. पाकिस्तानच्या बासमती पिकाला फटका बसू शकतो.

## सेन्सेक्स ४०० अंकांनी वधारला निफ्टीतही १०० अंकांनी वाढ

**मुंबई :** काल शेअर बाजार तेजीत आहे. सेन्सेक्स ४०० पेक्षा जास्त अंकांच्या वाढीसह ७९,६०० च्या पातळीवर व्यवहार करत आहे. निफ्टी देखील सुमारे १०० अंकांनी वर आहे, तो २४,१५० च्या पातळीवर व्यवहार करत आहे. आज बँकिंग, ऑटो आणि एनर्जी शेअर्समध्ये वाढ होत आहे. दुसरीकडे, एफएमसीजी आणि आयटी शेअर्स दबावाखाली व्यवहार करत आहेत.

जपानचा निक्केई १८२ अंकांनी (०.५१%) वाढून ३५,८८७ वर आणि कोरियाचा कोस्पी ४ अंकांनी (०.१५%) वाढून २,५५० वर बंद झाला. चीनचा शांघाय कंपोझिट ३,३०० वर स्थिर व्यवहार करत आहे. हाँगकाँगचा हँग सेंग निर्देशांक ०.०७% वाढला आणि २१,९९५ वर व्यवहार करत होता. २५ एप्रिल रोजी, अमेरिकेचा डाऊ जोन्स २० अंकांनी (०.०५०%), नॅस्डॅक कंपोझिट २१६ अंकांनी (१.२६%) आणि एस अँड पी ५०० निर्देशांक ४० अंकांनी (०.७४%) वर बंद झाला.

भारतीय इलेक्ट्रिक दुचाकी उत्पादक कंपनी एथर



एनर्जीचा आयपीओ आज म्हणजे २८ एप्रिल रोजी उघडणार आहे. गुंतवणूकदार ३० एप्रिलपर्यंत यासाठी बोली लावू शकतील. या आयपीओची इश्यू किंमत प्रति शेअर ३०४-३२१ अशी निश्चित करण्यात आली आहे. या सार्वजनिक विक्रीद्वारे कंपनीला ८.१८ कोटी शेअर्स विकून ८,७५० कोटी रुपये उभारायचे आहेत.

**शुक्रवारी बाजारात घसरण झाली**

यापूर्वी २५ एप्रिल रोजी शेअर बाजारात घसरण दिसून आली होती. सेन्सेक्स ५८९ अंकांनी (०.७४%) घसरून ७९,२१२ वर बंद झाला. निफ्टी देखील २०७ अंकांनी (०.८६%) घसरून २४,०३९ वर बंद झाला.

## अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर आंबा स्वस्त

**पुणे :** साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर मोठ्या प्रमाणावर आंब्याच्या पेट्या दाखल झाल्या आहेत. दरम्यान, ज्या आंब्याचे भाव हे मोठ्या प्रमाणावर वाढले होते, ते आता स्वस्त झाल्याचं पाहायला मिळत आहे. पुण्यातील मार्केटयार्डात मोठ्या प्रमाणात हापूस आंब्याच्या पेट्या दाखल झाल्या आहेत. बाजारात ४०० रुपयांपासून ते ८०० रुपये डझन अशा दराने आंबे मिळत आहेत.

काही दिवसांपूर्वी आंबे हे महाग झाले होते. जवळपास ९०० रुपये डझन अशी आंब्याची किंमत मार्केटमध्ये होती. मात्र आता विविध ठिकाणाहून आंबे हे बाजारात दाखल झाले असल्यामुळे अक्षय तृतीयाच्या मुहूर्तावर आंबे हे स्वस्त झाले आहेत. मोठा आंबा हा ५०० पासून ते ९०० रुपयांपर्यंत एक डझन मिळत आहे. सोमवारी मार्केटमध्ये आमच्या जवळपास ४५० ते ५०० डझन आंब्यांच्या पेट्या आल्या होत्या आणि त्या सर्व संपल्या आहेत.

सध्या मार्केटयार्डमध्ये कोकण आणि राज्याच्या इतर भागांसह विविध राज्यातून मोठ्या प्रमाणावर दाखल झाला आहे. अक्षय तृतीयाच्या मुहूर्तावर मार्केटमध्ये आवक वाढल्याने दर हे सर्वसामान्यांच्या आवाक्यात आले आहेत. मार्केटयार्डात ४०० ते ८००



रुपये डझनपर्यंत आंब्याची किंमत असून नागरिकांची आंबे खरेदीसाठी गर्दी वाढत आहे. दरम्यान, पणन मंडळ व वखार महामंडळ आधी भागात राज्य पणन महामंडळाच्यावतीने पुण्यातील मार्केटयार्ड फळ बाजारात शेतकऱ्यांचा थेट माल ग्राहकापर्यंत पोहोचविण्याची सुविधा उपलब्ध केली आहे. त्यामुळे मार्केटयार्ड परिसरात आंबा खरेदीसाठी ग्राहकाकडून गर्दी होत आहे. तसेच, मार्केटमध्ये आंब्याची आवक ही वाढल्याने दरही सामान्यांच्या आवाक्यात आले आहेत.

## बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाच्या ऑडिटोरियमचा पुनर्विकास करावा

### उपमुख्यमंत्री पवार : हेरिटेज दर्जा राखून साजेसे काम व्हावे

**मुंबई :** पुण्यातील बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय हे स्वातंत्र्यापूर्वीपासूनचे राज्यातील नामवंत असे शासकीय महाविद्यालय आणि रुग्णालय आहे. त्यामुळे येथील ऑडिटोरियमचा पुनर्विकास करताना त्याचा हेरिटेज दर्जा कायम राखून तो महाविद्यालयाच्या लौकिकास साजेसा व्हावा. त्यासाठी तातडीने एकात्मिक विकास आराखडा सादर करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी दिले.

पुणे येथील बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाच्या ऑडिटोरियमच्या पुनर्विकासाबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या मंत्रालयातील समिती कक्षात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, येथील महात्मा गांधी सभागृहामध्ये (ऑडिटोरियम) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे विविध सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रम तसेच राज्यस्तरीय कार्यक्रम घेण्यात येतात. परंतु सद्यस्थितीत या कार्यक्रमांसाठी महात्मा गांधी सभागृहाची आसन क्षमता अपुरी पडत आहे. या सभागृहात ५०० विद्यार्थ्यांची आसनक्षमता आहे. तथापि या ठिकाणी सुमारे १,५०० विद्यार्थी शिकत आहेत. त्यामुळे या सभागृहाचा पुनर्विकास करून पंधराशे आसन क्षमतेचे सुसज्ज सभागृह निर्माण करण्यात यावे.

वैद्यकीय महाविद्यालयाच्या परिसरातच एक हजार विद्यार्थी क्षमतेचे पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठीचे वसतिगृह बांधण्यासही या बैठकीत तत्वतः मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय होणार आहे. बैठकीस नियोजन



विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव राजेश देशमुख, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरजकुमार, वैद्यकीय शिक्षण विभागाचे संचालक डॉ. अजय चंदनवाले, बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार, पुणे येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण उपस्थित होते तर पुण्याचे विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार आणि जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी हे दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

## राज्यात आता कुठूनही करता येणार घरांची नोंदणी

### महाराष्ट्र दिनापासून होणार निर्णायक बदल

**मुंबई :** दुसऱ्या शहरांत एखादी जमीन, घर किंवा फ्लॅट घेतले तर त्याच्या रजिस्ट्रेश म्हणजे नोंदणीसाठी त्या शहरात जाणे अनिवार्य होते. पण, आता लोकांचा हा त्रास कमी होणार आहे. मालमत्ता खरेदी करणाऱ्यांच्या अडचणीची दखल घेत राज्य सरकार मालमत्ता नोंदणी (प्रॉपर्टी रेजिस्ट्रेशन) अपग्रेड करणार आहे. राज्यात १ मे पासून 'फेसलेस रजिस्ट्रेशन', 'स्टॅम्प रजिस्ट्रेशन' आणि 'एक राज्य, एक नोंदणी' प्रणाली लागू केली जाणार आहे.

**'एक राज्य, एक नोंदणी' प्रक्रिया**

या निर्णयामुळे भ्रष्टाचार कमी होईल, नागरिकांचा वेळ वाचेल आणि डिजिटल प्रक्रियेमुळे महसूल व्यवहार अधिक पारदर्शक होतील. नवीन महसूल प्रणालीमुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून महाराष्ट्र सरकारच्या या निर्णयामुळे भविष्यात घरे खरेदी-विक्री, जमीन व्यवहार आणि नोंदणी अधिक सुलभ आणि सुलभ होईल. महसूल विभागाच्या एका अधिकाऱ्याने उदाहरण देताना सांगितले की, मुंबईत राहणाऱ्या एका व्यक्तीने नागपूरमध्ये मालमत्ता खरेदी केली. त्या मालमत्तेची नोंदणी करण्यासाठी नागपूरला जावे लागते त्यामुळे, त्या व्यक्तीचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जातो पण, १ मे पासून असं होणार नाही. नागपूरमध्ये खरेदी केलेल्या मालमत्तेची नोंदणी यापुढे मुंबईत करणे शक्य होणार आहे. या नवीन प्रयत्नाचे उद्दिष्ट मालमत्ता व्यवहार सुलभ करणे आणि नोंदणी प्रक्रियेत कार्यक्षमता सुधारण्याचा आहे जेणेकरून लोकांचा वेळ आणि पैसा दोन्हीची बचत होईल.

सरकारच्या या नवीन उपक्रमाचे मालमत्ता विश्लेषकांनी



स्वागत केले. त्यांनी म्हटले की यामुळे मालमत्ता खरेदीदारांच्या अडचणी कमी होतील आणि मालमत्ता नोंदणी कार्यालयात होणारी अनावश्यक गर्दी कमी होईल. मात्र, विश्लेषकांनी गैरवापर रोखण्यासाठी कडक तपासणीची गरजही अधोरेखित केली आहे.

## अपघाती मृत्यू अन् भरपाई

**मोटार व्हेईकल कायद्यानुसार एखाद्या व्यक्तीचा अपघाती मृत्यू झाल्यास आणि त्या व्यक्तीने आयकर विवरणपत्र भरलेले असल्यास, त्याच्या वार्षिक उत्पन्नाच्या अंदाजे १० पट नुकसानभरपाई त्याच्या कुटुंबाला मिळू शकते.**

(उत्तरार्ध)

साधारण ६ महिन्यांच्या आत अर्ज करणे बंधनकारक. अर्जात मृत व्यक्तीचे आयटीआर उत्पन्नाचा पुरावा, अपघाताची कागदपत्रे, मृत्यू प्रमाणपत्र, आणि कुटुंबातील वारसदारांची माहिती आवश्यक. सदरचा अर्ज कोर्ट, डीएसओ कार्यालय, किंवा बीडिओ/तहसील कार्यालयात सादर करता येतो.

**अर्ज कोण करू शकतो?**

मृताचे कुटुंबीय (पत्नी, पती, मुलगा, मुलगी, आई, वडील), मुलगा/मुलगी अल्पवयीन असल्यास त्यांच्या वतीने पालक.

**उत्पन्न कमी दाखवल्यास फटका:**

आयकर विवरणपत्रात कमी उत्पन्न दाखवल्यास १० पट नुकसानभरपाईची रक्कम देखील कमी मिळते. म्हणूनच नेहमी प्रामाणिक आणि योग्य उत्पन्न दाखवणे फायदेशीर.

**आवश्यक कागदपत्रे :**

मृत व्यक्तीचे आयटीआर , मृत्यू प्रमाणपत्र, अपघाताचा एफआयआर व इतर पोलिस कागदपत्रे, वारसदारांची माहिती, उत्पन्नाचा पुरावा

मोटार वाहन कायदा १९८८ अंतर्गत अपघातात मृत पावलेल्या व्यक्तीच्या कुटुंबीयांना नुकसानभरपाई मिळावी या दृष्टीने भारतातील विविध न्यायालयांनी वेळोवेळी काही महत्त्वाचे निवाडे दिले आहेत. यामध्ये सुप्रीम कोर्ट आणि विविध उच्च न्यायालयांनी दिलेले निर्णय प्रमुख आहेत. खाली काही निवडक महत्त्वाचे निवाडे :

**अपघाती मृत्यू व नुकसानभरपाई:**

१)नुकसानभरपाईची गणना करताना उत्पन्नातून किती खर्च स्वतःवर केला जातो याचा विचार, तसेच मल्टिप्लायर पद्धत निश्चित केली. तसेच व्यक्तीचे वय, उत्पन्न, अवलंबित्व आणि भावी संभाव्यता या



बाबींचा विचार.

२) कायमस्वरूपी नोकरीत असलेल्या मृत व्यक्तीच्या उत्पन्नात भविष्यकाळात होणारी वाढ नुकसानभरपाईत धरावी असे ठरवले.

नितीन डोंगरे
कर सल्लागार
९११२१२३२६५

३) राजेश राजबीर (२०१३) या केसमध्ये,अपघातात मृत पावलेल्याच्या कुटुंबीयांना भरघोस भरपाई देण्याचा आदेश देण्यात येऊन हा निवाडा आंशिक बदलण्यात आला.

४) नारायणा व्ही मरियामा या केसमध्ये पत्नीचा घरकामात सहभाग हा आर्थिक योगदान मानला जातो आणि त्या आधारे भरपाई देणे योग्य.

५) आर के. मलिक विरुद्ध किरण पाल या केसमध्ये मुलाच्या मृत्यूच्या प्रकरणातही मानसिक दुःख व भावी आर्थिक संभाव्यतेचा विचार करून नुकसानभरपाई दिली जाऊ शकते.

६) इन्शुरन्स कंपनी विरुद्ध सतिंदर कौर या निवाड्यात स्पष्ट दिशा दर्शविण्यात आल्याचे दिसून येते.

७) युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड विरुद्ध शिला दत्ता व इतर या खटल्यात विमा कंपनीच्या जबाबदाऱ्या स्पष्ट केल्या. विमा पॉलिसीतील अटी व अपवादांवर न्यायालयीन स्पष्टीकरण देण्यात आले.

८) न्यू इंडिया कंपनी विरुद्ध व्ही सोमवती या केसमध्ये सहजीवनातून मिळणाऱ्या सानिध्य, प्रेम, आधार, सहकार्य, संवादाचे नुकसान. जेव्हा एखादी व्यक्ती अपघातात मृत पावते, तेव्हा त्याच्या जोडीदाराला (पत्नी/पतीला) किंवा कुटुंबीयांना त्या व्यक्तीच्या सहवासाचा, मानसिक आधाराचा आणि प्रेमाचा तोटा होतो. याच तोट्यासाठी दिली जाणारी नुकसानभरपाई म्हणजेच निवाडा. एकंदरीतच, करपात्र उत्पन्न मिळविणाऱ्या व्यक्तीनेच आयकर विवरणपत्रक दाखल करावे असे नाही. तर कोणत्याही व्यक्तीला ज्या मार्गाने उत्पन्न मिळते, त्यांनी आपले उत्पन्न व्यवस्थितपणे दाखवून, आयकर विवरणपत्रक विहित मुदतीत नियमित सादर करणे त्याच्या हिताचे ठरते.

## महत्त्वाचे

### बाळासाहेब सोनवणे यांना समाजरत्न पुरस्कार जाहीर


**नाशिक : प्रतिनिधी** निफाड तालुक्यातील मांजरगाव येथील भूमिपुत्र, महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी अधिकारी संघटनेचे विभागीय



अध्यक्ष तसेच महिरावणी येथील मातोश्री गि. दे. पाटील माध्यमिक विद्यालयाचे आदर्श व उपक्रमशील शिक्षक बाळासाहेब सोनवणे यांना नाशिक येथील मनु मानसी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे १ मे महाराष्ट्र आणि कामगार दिनानिमित्त समाजरत्न पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. सोनवणे हे निफाड तालुक्यातील मांजरगाव येथील रहिवाशी असून, नाशिक येथील ज्ञान साधना शिक्षण प्रसारक संस्थेत गेली ३० वर्षापासून अध्यापनाचे कार्य करत आहेत. शिक्षकांबरोबरच महाराष्ट्र राज्य दिव्यांग संघटनेच्या माध्यमातून दिव्यांग कर्मचारी तसेच बेरोजगार यांना शासनातर्फे सवलती मिळवून देत २५ वर्षापासून पुनर्वसन करण्याचे काम करत आहे. डॉ. एपीजे अब्दुल कलाम इंटरनॅशनल फाउंडेशनचे जिल्हासमन्वयक म्हणून विद्यार्थी, बालवैज्ञानिक बरोबरच मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करत आहे. त्यांच्या विविध क्षेत्रातील योगदानाबद्दल मनु मानसी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्ष मेघा शिंपी तसेच पदाधिकारी यांनी बाळासाहेब सोनवणे यांना समाज रत्न पुरस्कार जाहीर केला असून, सर्वच क्षेत्रातून कौतुक होत आहे.

### म. बसवेश्वर जयंती शासकीय निम शासकीय कार्यालयातून साजरी व्हावी : जगनराव गवळी

**नाशिकरोड : वार्ताहर** थोर समाज सुधारक जगत ज्योती महात्मा



बसवेश्वर महाराज यांचा जन्मोत्सव अक्षय तृतीयेला असून त्या दिवशी सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयांमध्ये प्रतिमापूजन व विविध सामाजिक उपक्रम राबवावेत अशी मागणी महाराष्ट्र बसवेश्वर परिषद आणि महात्मा बसवेश्वर जयंती उत्सव समितीतर्फे करण्यात आली आहे. नाशिकरोडलाही लिंगायत समाज व लिंगायत गवळी समाज प्रतिवर्षी अक्षय तृतीयेला बसवेश्वर महाराज यांची जयंती साजरी करत आलेला आहे. अनेक वर्षांपासून मुंबईत मंत्रालयासह राज्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये अक्षय तृतीयेला महात्मा बसवेश्वर जयंती साजरी होत असते. त्यानुसार जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीला प्रतिमापूजन आणि विविध सामाजिक उपक्रम साजरे व्हावेत अशी मागणी समाज बांधवांची आहे. गवळी समाजाचे नेते जगन राव गवळी यांनी ही मागणी केली आहे. समाज बांधवांचीही हीच मागणी आहे असेही गवळी म्हणतात. उद्या अक्षय तृतीया असून महात्मा बसवेश्वर जयंतीही साजरे करण्यात येत आहे यापूर्वीच शासनाने देखील या संदर्भात अध्यादेश जारी केलेले आहेत सर्व विभागीय आयुक्त जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या विभागातील सर्वच कार्यालयांमध्ये अंमलबजावणी करण्यासंदर्भात पूर्वीच परिपत्रक पाठवलेले आहे असे जगनराव गवळी म्हणतात.



### इगतपुरी, त्र्यंबक तालुक्यातील पदाधिकाऱ्यांचा शिवसेनेत प्रवेश

**नाशिक : प्रतिनिधी** मुख्यमंत्री पदावर असतांना शिवसेना मुख्यनेते एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्रातील जनतेसाठी केलेले काम, सर्वसामान्यासाठी राबवलेल्या विविध कल्याणकारी योजना या कार्याने प्रेरित होऊन इगतपुरी, त्रंबक तालुक्यातील विविध सरपंच, उपसरपंच, सदस्य यांनी शिवसेनेत प्रवेश केला. उपनेते व जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, माजी खा. हेमंत गोडसे, ग्रामिण जिल्हाप्रमुख अनिल् ढिकले, युवासेना जिल्हाप्रमुख सदानंद नवले यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थितानी शिवसेना पक्षाच्या युवासेना व महिला आघाडी मध्ये प्रवेश केला. यात उपसरपंच व महाराष्ट्र कुस्तीगीर संघटना पदाधिकारी सन्नी मेढे, अनिल भोये, बाळासाहेब मिढे, भाऊ लीलके, राहुल मेढे, बालाजी मेढे यांनी असंख्य कार्यकर्त्यांसह युवासेनेते प्रवेश केला तसेच शालेय समिती अध्यक्ष अर्चना सुभाष पागेरे, सिमा उगले, सविता वाजे, रत्ना झणकर, लीलाबाई ढोकणे, सारिका चव्हाण, मच्छिंद्र भडांगे, सतीश भंडारे, उज्वला गवळी, संगीता गायधनी, श्रद्धा गायधनी यांनी शिवसेना महिला आघाडीत प्रवेश केला. या प्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख शशिकांत कोठुळे, तालुका प्रमुख लकी ढोकणे, रवी भोये, विधानसभा प्रमुख रोषण शिंदे, युवासेना उपजिल्हाप्रमुख मंगेश करंजकर, विधानसभा अमोल चव्हाण, राजू नरवडे, शाम पवार आदी उपस्थित होते.

### सावानात आज मधुकर झेंडे यांची शोकसभा

**नाशिक : प्रतिनिधी** सार्वजनिक वाचनालयाचे माजी अध्यक्ष नाशिकचा ज्ञानकोश स्वर्गीय मधुकर आण्णा झेंडे यांच्या प्रति शोक व्यक्त करण्यासाठी मंगळवार दि २९ रोजी सायंकाळी ५.३० वाजता संस्थेच्या ग्रंथालय भूषण मु. शं .औरंगाबादकर सभागृह येथे शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे . तरी अण्णांवर प्रेम करणाऱ्या सर्व नाशिककर नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन वाचनालयाच्यावतीने करण्यात आले आहे.

### जागतिक टेबल टेनिस दिन उत्साहात

**नाशिक :** नासिक जिल्हा टेबल टेनिस संघटनेच्या वतीने नासिक जिमखाना टेबल टेनिस क्रीडा संकुलात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



या प्रसंगी सर्व वयोगटाचे पुरुष व महिला खेळाडू उपस्थित होते. या प्रसंगी जेष्ठ खेळाडू सतीश शिरसाट यांच्या हस्ते केक कापून साजरा करण्यात आला. या प्रसंगी नासिक जिल्हा टेबल टेनिस संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र छाजेड, उपध्यक्ष शेखर भंडारी व मिलिंद कचोळे, कोषाध्यक्ष अभिषेक छाजेड, सुहास आघारकर, पुनीत देसाई, शिवानंद कुंडाजे, तृप्ती यादव, हिरा कौराणी, प्रवीण पाटील धीरज टोपरे आदी मान्यवर खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी लकी सिंगल्स स्पर्धा आयोजित करण्यात आली. या मधे एकूण ४० पेक्षा जास्त पुरुष, महिला, मुले व मुलींनी खेळाडूंनी सहभाग घेतला. या मधे प्रथम क्रमांक राघव महाले, द्वितीय क्रमांक केशिका पुरकर व तृतीय क्रमांक सुरेश शर्मा मिळविला. विजेत्या खेळाडूंना नरेंद्र छाजेड, अध्यक्ष नासिक जिल्हा टेबल टेनिस संघटना यांच्या हस्ते रोख व पदक देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन शेखर भंडारी यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अभिषेक छाजेड, स्वाती आघारकर, जय मोडक, पुनीत देसाई यांनी परिश्रम घेतले.



# जिल्हा नियोजन समितीस २७० कोटींचा निधी प्राप्त

## सर्व यंत्रणांनी प्रस्ताव सादर करावेत : चौधरी

**नाशिक : प्रतिनिधी** जिल्हा नियोजन समितीला चालू आर्थिक वर्षाकरिता सर्वसाधारण योजनेसाठी नियोजित ९०० कोटींपैकी ३० टक्के निधी म्हणजेच २७० कोटी रूपयांचा निधी प्राप्त झाला. त्यानंतर जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ करीता सर्व संबंधित यंत्रणांनी प्रस्तावित बाबींच्या तांत्रिक मान्यता प्राप्त करून घेत प्रशासकीय मान्यतेसाठीचे प्रस्ताव सादर करावेत, अशा सूचना जिल्हा नियोजन अधिकारी योगेंद्र चौधरी यांनी दिल्या.

सोमवारी (दि. २८) जिल्हाधिकारी कार्यालयात अयोजित जिल्हा वार्षिक योजना आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त देवीदास नांदगांवकर, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुनील दुसाणे, उपप्रादेशिक परिहवन अधिकारी राजश्री गुंड यांच्यासह संबंधित यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हा नियोजन अधिकारी चौधरी म्हणाले की, सन २०२५-२६ मध्ये जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेसाठी रूपये ९०० कोटी, आदिवासी उपयोजनेसाठी रूपये ४४३.४५ कोटी व अनुसूचित जाती उपयोजना रूपये १०१ कोटी रूपयांचा नियतव्यय मंजूर आहे. योजना निहाय अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार अपूर्ण कामांसाठी आवश्यक असलेला देय निधी, दायित्व मागणीचे परिपूर्ण प्रस्ताव वेळेत सादर करणे आवश्यक आहे. जिल्हा विकास आराखडा अंतर्गत सन २०२५-२६ साठी रूपये १९० कोटींचा नियतव्यय मंजूर आहे. जिल्हा वार्षि योजनेंतर्गत निधीतून अधिकाधिक पायभूत सुविधा निर्मितीवर अधिक भर देण्यात यावा, असेही श्री. चौधरी यांनी सांगितले. याबरोबरच सर्व शासकीय कार्यालयांमध्ये सौर ऊर्जेचा वापर वाढवायाचा आहे. त्यासाठी विभागप्रमुखांनी नियोजन करावे, अशाही सूचना जिल्हा नियोजन अधिकारी चौधरी यांनी दिल्या.

# लोकसेवेच्या वचनाचा नवा संकल्प

## 'आदिवासी विकास'च्या अधिकारी,कर्मचाऱ्यांची शपथ



**नाशिक : प्रतिनिधी** 'आपली सेवा-आमचे कर्तव्य' असे सांगणाऱ्या लोकसेवा हक्क कायद्याच्या अंमलबजावणीस १० वर्षे पूर्ण झाली आहेत. यानिमित्त सोमवारी (दि. २८) सर्व शासकीय कार्यालयांमध्ये सेवा हक्क दिन साजरा करण्यात आला. आदिवासी विकास आयुक्तालयात अधिकारी-कर्मचाऱ्यांनी शपथ घेत लोकसेवेच्या वचनाचा नवा संकल्प केला.

सेवा हक्क दिनाचे औचित्य साधून आदिवासी विकास आयुक्तालयातील उपायुक्त शशिकला आहिरराव आणि विनिता सोनवणे यांनी अधिकारी-कर्मचाऱ्यांना नागरिकांचच्या हितार्थ आणि कल्याणार्थ काम करण्याची शपथ दिली.

यावेळी सहायक आयुक्त दिलीप खोकले, सहायक प्रकल्प अधिकारी विनोद करडमारे, सुनील कायंदे, संतोष गायकवाड, अनिता दाभाडे यांच्यासह उदय जोशी, अनिल साळवे, अनिल महाजन, शरद निळे, नंदकिशोर जगताप, तुषार जावळे, ॲड. विशाल महाले, किरण सोनवणे, अमृता भालेराव आदी उपस्थित होते.

### अशी आहे शपथ

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत शासनाच्या सेवा पारदर्शक पध्दतीने विहित कालमर्यादित व सौजन्याने पात्र नागरिकांना देण्याकामी मला सुपुर्द करण्यात आलेली जबाबदारी पूर्ण प्रामाणिकतेने, निष्ठेने, सचोटीने, संवेदनशीलतेने व तत्परतेने पार पाडण्यासाठी मी कटिबध्द राहिन. मी सेवा वितरण प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा विलंब, अडथळा किंवा भ्रष्टाचार होणार नाही, यासाठी आवश्यक पावले उचलेन. मी उक्त कायद्याने नागरिकांना प्रदान केलेल्या सेवेच्या हक्काचा आदर ठेवून व नागरिकांविषयी सेवाभाव ठेवून त्यांच्या हितार्थ व कल्याणार्थ काम करेन.

# जिल्ह्यात १ मे पासून 'कंपोस्ट खड्डा भरा, आपलं गाव स्वच्छ ठेवा!' अभियान

**नाशिक : प्रतिनिधी** ग्रामीण भागात शाश्वत स्वच्छता राखली जावी आणि स्वच्छता ही सेवा या संकल्पनेला प्रत्यक्षात उतरवण्यासाठी शासनातर्फे १ मे पासून 'कंपोस्ट खड्डा भरा, आपलं गाव स्वच्छ ठेवा!' हे राज्यव्यापी विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाद्वारे गावात निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्याचे व्यवस्थापन करून त्यापासून कंपोस्ट खत तयार करण्याबाबत काम करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली.

स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) अंतर्गत ग्रामीण भागात प्रत्येक गावात सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाची काम करण्यात येत आहेत. अनेक गावांमध्ये सदरची काम पूर्ण असून ओल्या कचऱ्यासाठी नाडेप खत खड्डे उभारण्यात आले आहेत. या खत खड्याचा वापर करून खतनिर्मिती करावी यासाठी हे अभियान राबविण्यात येणार आहे. ओला कचरा गोळा करून तो योग्य प्रकारे वर्गीकृत करणे आणि त्यातून जैविक खत तयार करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. या खताचा उपयोग ग्रामपंचायतीमधील वृक्षासाठी तसेच भविष्यात शेतकऱ्यांना करण्यात येणार आहे.

या अभियानाचा प्रारंभ लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ यांच्या उपस्थितित करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दीपक पाटील यांनी दिली. या उपक्रमाच्या माध्यमातून केवळ स्वच्छता नव्हे तर पर्यावरणपूरक खतनिर्मिती, शेतीस मदत व ग्रामस्वच्छतेबाबत जनजागृती हे उद्दिष्ट गाठले जाणार आहे. जिल्ह्यातील प्रत्येक गावाने या मोहिमेत सहभागी व्हावे. घराघरांत ओला व सुका कचरा वेगळा करावा. ओल्यापासून कंपोस्ट किंवा गांडूळ खत तयार करावे व सुक्या कचऱ्याचे पुनर्प्रक्रियेसाठी वर्गीकरण करावे. गाव स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी प्रत्येकाचा सहभाग गरजेचा असून लोकसहभागातून हे अभियान यशस्वी करावे



# बच्छाव यांना बाळासाहेब ठाकरे पुरस्कार

**जळगाव निंबायती : वार्ताहर**

हिंदूहृदयसम्राट शिवसेना सरसेनापती बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ जिल्ह्यातील गुणवंत मुख्याध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना सेना उपनेते विजय करंजकर यांच्या मार्गदर्शनाखाली निवड समितीतर्फे दरवर्षी सन्मानित करण्यात येते.

पांझणदेव येथील माध्यमिक विद्यालयाचे उपक्रमशील विज्ञान शिक्षक संजय बच्छाव यांना विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल खा. भास्कर भगरे, शिक्षक आ. किशोर दराडे व सेना सचिव भाऊसाहेब चौधरी यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

याप्रसंगी एनडीएसटी सोसायटीचे माजी चेअरमन अरुण पवार, शिक्षक नेते शिवाजी निरगुडे, नानासाहेब देवरे, के. के. अहिरे, साहेबराव कुटे, एन. डी. एस. टी. चे चेअरमन शांताराम देवरे, बापू पवार, संग्राम करंजकर, संजय मगर, छत्रे हायस्कूलचे संचालक प्रसाद पंचवाघ, प्रा. अमोल अहिरे, गुणेश गुजर, महेंद्र पवार उपस्थित होते.

बच्छाव हे नांदगाव तालुका विज्ञान अध्यापक संघाचे अध्यक्ष, इन्स्पायर अवॉर्ड मानक समन्वयक, नाशिक जिल्हा समन्वय समितीचे कार्यकारणी सदस्य तसेच नांदगाव तालुका टिडीएफचे प्रसिद्धीप्रमुख आदी संस्था, संघटनावर कार्यरत आहेत. त्यांना १९ पदव्या, नेट-सेटसह सहा विषयात पात्रता परीक्षा, मराठी विषयात पी.एचडीचे संशोधन कार्य केले आहे. तसेच हिवाळी व उन्हाळी सत्रात ४४ वेळेस विद्यापीठ परीक्षा उत्तीर्ण केली आहे.

# अरिजित सिंग यांच्या गीतांची सुरम्य संध्याकाळ




**नाशिक :** नाशिकच्या कालिदास कलामंदिर येथे २५ एप्रिल रोजी संध्याकाळी अरिजित सिंग यांच्या ३८व्या वाढदिवसानिमित्त आणि महाराष्ट्र भांडारच्या ५५व्या स्थापना दिनाच्या (दि. ३०) निमित्ताने एक सुरेल संगीतमय कार्यक्रम पार पडला. हा कार्यक्रम महाराष्ट्र भांडारच्या ग्राहकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आयोजित करण्यात आला होता. यामध्ये दीप्ती देशपांडे (सचिव, गोखले एज्युकेशन इन्स्टिट्यूट), नितीन ठाकरे (सचिव, नाशिक मराठा विद्या प्रसारक समाज), संजय लोढे (सीईओ, अशोका बिल्डकॉन), श्रीकांत पंडित काका (शलाका उद्योग चे संस्थापक) तसेच महाराष्ट्र भांडारचे १९७० पासूनचे ग्राहक आणि मंगेश पिसोळकर व प्राची पिसोळकर (महाराष्ट्र भांडार) यांनी सहभाग घेतला. यानंतर महाराष्ट्र भांडारचे संस्थापक कै. सौ. वीणा पिसोळकर आणि कै. मेजर सुधाकर पिसोळकर यांच्या प्रतिमांना पुष्पांजली अर्पण करण्यात आली. तसेच पद्मश्री अरिजित सिंग यांना त्यांच्या ३८व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाची संकल्पना, निर्मिती आणि दिग्दर्शन मॅव्हरिक एंटरटेनमेंटचे मंगेश पिसोळकर यांनी केले, जे स्वतः अरिजित सिंग यांचे मोठे चाहते आहेत. सुरेल सादरीकरण तिरनेती ब्रदर्स म्युझिकल ग्रुप (हर्ष, करण, आदित्य, सुमुखी) आणि त्यांच्या मुंबईस्थित बँडने सादर केले. बाबाज थिएटरचे प्रशांत जुनरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन व प्रसिद्धी करण्यात आली. महाराष्ट्र भांडार यांनी या कार्यक्रमाला गौरवपूर्ण प्रायोजकत्व दिले. स्वागतपर भाषणात मंगेश पिसोळकर यांनी अरिजित सिंग यांच्याबद्दल आपले प्रेम आणि आदर व्यक्त केला आणि नाशिककर व महाराष्ट्र भांडारच्या सर्व ग्राहकांचे गेल्या पाच दशकांतील सहकार्याबद्दल आभार मानले. तसेच २०१२ ते २०२५ या कालावधीत गाजलेल्या अरिजितच्या गाण्यांचा आस्वाद घेण्याचे आवाहनही केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला लता मंगेशकर, रफी साहेब, मुकेशजी, किशोरकुमार आदींना आदरांजली वाहण्यात आली. हर्षवर्धन वावरे आणि त्यांच्या बँडने सादर केलेल्या तब्बल ४५ ते ५० गाण्यांनी रसिकांची मने जिंकली. प्रेमगीते, विरहगीते, पार्टी साँग्स, भक्तिगीते आणि देशभक्तिपर गीतांचा समावेश असलेल्या या संध्याकाळी लेहरा दो या देशभक्तिपर गीताने कार्यक्रमाचा भावनिक शेवट झाला.



# स्केट नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये होटव्हील स्केटिंग क्लबचे यश

**निफाड : प्रतिनिधी** रोलर सपोर्ट कोचेस फेडरेशन ऑफ इंडिया द्वारा आयोजित स्केट नेशन नॅशनल चॅम्पियनशिप विरार, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत सुमारे ६५९ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला.

स्पर्धेत होटव्हील स्केटिंग क्लब च्या खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले. त्यात अनुक्रमे धैर्य शिंदे २ कास्यपदक, श्रवण यवतकर २ कास्यपदक, पार्थ द्विवेदी १ कास्यपदक, कृतिका परदेशी २ कास्यपदक, माहीम खान २ कास्यपदक, दक्षनी नायर २ सुवर्णपदक, पटकावले आहे. सर्व विद्यार्थ्यांना स्केटिंग प्रशिक्षक शशिकांत मोरे, सौरभ जाधव यांचे मार्गदर्शन लाभले आहे. यावेळी प्रा. देविदास शिंदे उपस्थित होते.

# जिल्हयातील दीड लाख लोकसंख्येसाठी १५९ टँकर फेऱ्या

## ७८ टँकरच्या माध्यमातून ८१ गावे व १७० वाड्यांना पाणी

**नाशिक : प्रतिनिधी** नाशिक जिल्हयाच्या ग्रामीण भागात पाणी टंचाईच्या झळा तीव्र झाल्या आहेत. जिल्हयातील दहा तालुक्यात पाणी टंचाई जाणवत असल्याने प्रशासनाकडून मागणीनुसार टॅंकर सुरू करण्यात येत आहे.

एप्रिल महिन्याच्या सुरूवातील इगतपुरी तालुक्यात टॅंकर सुरू करण्यात आले होते. गेल्या महिनाभरात दिवसेंदिवस पाणी टंचाई वाढत असल्याने आजमितीला जिल्हयाच्या ग्रामीण भागात ७८ टॅंकरच्या माध्यमातून ८१ गावे व १७० वाड्यांना १५९ टॅंकर फेऱ्यांद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.



नाशिक जिल्हयात भीषण पाणी टंचाई जाणवत असल्याचे चित्र आहे. येवला इगतपुरी आणि सिन्नर तालुक्यात सर्वाधिक पाणी टंचाई जाणवत आहे. गेल्या महिनाभरात तापमानात वाढ झाल्याने धरणातील पाण्याचे बाष्पीभवन होऊन पाणीसाठा कमी होत आहे. परिणामी पाणी टंचाई जाणवत असल्याने टॅंकरच्या मागणीत वाढ होत आहे. जिल्हयातील धरण समुहात ३३.६२ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. तर नाशिक शहरातला पाणी पुरवठा करणार्या गंगापूर धरण समुहात ४८ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. प्रशासनाकडून नागरिकांनी पाणी जपून वापरण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

### दीड लाख लोकसंख्येला पाणी पुरवठा

जिल्ह्यातील १० तालुक्यातील १ लाख ४९ हजार ५६३ लोकसंख्येला पाणीपुरवठा करण्यात येत आहे. यात सर्वाधिक गावे ही येवला तालुक्यातील असून तालुक्यात ५५ हजार १६९ लोकसंख्येला पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

### ४४ विहिरींचे अधिग्रहण

जिल्ह्याात पाणी टंचाई जाणवत असल्याने प्रशासनाकडून ४४ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले. १० विहिरींचे अधिग्रहण गावांसाठी तर ३४ विहिरींचे अधिग्रहण टॅकरसाठी करण्यात आले आहे. त्या विहिरीतून पाण्याचा उपसा करून टॅकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

### येवल्यात सर्वाधिक टॅकर फेऱ्या

येवला तालुक्यातील ३१ गांवे व ४१ वाड्यांसाठी २९ टॅकरच्या माध्यमातून ५१ टॅकर फेऱ्यांमार्फत नागरिकांची तहान भागवली जात आहे.